# माणूस

शनिवार । २२ नोव्हेंबर १९७५ । एक रुपया

बुद्धिजीवी माणसाला हवे ते सारे तरुण वयातच प्राप्त झाले होते.
दोन डॉक्टरेटस्, संगीतक्षेत्रातील कीर्ती, कॉलेजचे प्राचार्यपद,
नदीकाठी सुंदर बंगला, लठ्ठ पगार, विद्वान आणि कलावंत
यांच्याशी गाढ मैत्री....

पण

या शांत आणि सुखासीन जीवनाचा डॉक्टर श्वायत्झरनी
तीनच वर्षांत त्याग केला.

## आणि....



सासाहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : चोवीसावा

२२ नोव्हेंबर १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤

# महाराष्ट्र शासन आणि आदिवासी विकास उपयोजना

आदिवासी समाजाच्या विकासाची महाराष्ट्र शासनाने जी उपयोजना तयार केलेली आहे तिच्यावर 'ग्रामायन'च्या एका शिबिरात व नंतरच्या दोनचार बैठकीत बराच विचारविनिमय झाला. या विचारविनिमयावर आधारित एक टिपण महाराष्ट्र शासनाकडे विचारार्थ पाठवावे असेही ठरले. त्याप्रमाणे शासनाकडे पाठविले गेलेले हे टिपण. हे दत्ता सावळे यांनी तयार केलेले आहे.

दत्ता सावळे हे आबा करमरकर यांचे सहकारी म्हणून मनोर भागात हल्ली आदिवासी शिक्षणाचे कार्य करीत आहेत.

आदिवासी विकास उपयोजनेची सर्व भिस्त नोकरशाही यंत्रणेवर आहे. या यंत्रणेची नेमकी कार्यक्षेत्रे कोणती, मर्यादा कोणत्या, स्वयंस्फूर्त लोकसंस्थांचे या परिवर्तन योगात स्थान काय? या दृष्टीनें टिपणाचा सर्वच क्षेत्रातील कार्यकर्त्यांकडून विचार व्हावा.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या विकासाचा वेग गेल्या २५–३० वर्षांत खूपच कमी राहिला याची प्रांजल कबुली महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकासासाठी जी उपयोजना बनविली आहे त्यात दिली आहे. ही योजना पाच वर्षांसाठी आहे. अशा तीन पंचवार्षिक योजनांच्या अखेरीस आदिवासी बांधव देशाच्या अन्य नागरिकांच्या बरोबरीने विकासक्षम होतील अशी अपेक्षाही ह्या उपयोजनेने गृहीत धरली आहे.

या उपयोजनेविषयी समग्र चर्चा करण्याचा येथे हेतू नाही. ही उपयोजना वाचल्यानंतर ज्या एका महत्त्वाच्या भागाकडे ह्या योजनेत दुर्लक्ष झाले आहे असे वाटते त्याविषयी काही मते मांडावीत असा मर्यादित उद्देश या टिपणाचा आहे.

ह्या उपयोजनेमध्ये आदिवासी समाजाच्या मागासपणाची जी चिकित्सा केली आहे, ज्या कारणांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे तो वस्तुनिष्ठ आहे. त्यांच्या मागासपणाची मुख्यतः दोन कारणे दिली आहेत. त्यांतील पहिले कारण सर्वसामान्य भारतीय समाजापासूनचे त्यांचे अलगत्व. ह्या अलगत्वाचे कारणही दळणवळणाचा अभाव व या अभावातून निर्माण झालेले किंवा पूर्वीचेच कायम राहिलेले मागास उत्पादनतंत्र हे आहे. नवीनवी उत्पादनतंत्रे आत्मसात करण्याच्या इच्छाशक्तीचा अभावही ह्या अलगत्वातूनच निर्माण झाला आहे. आदिवासही समाजघटक सर्वसाधारण भारतीय समाजाच्या ५० वर्षे मागे आहे. त्यांच्यातील काही अत्यल्प गट तर पाषाणयुगातील मानवाइतके मागास आहेत. अशा सर्वांना येत्या १५ वर्षांत इतरांबरोबर आणावयाचे आहे.

त्यांच्या मागासपणाचे दुसरे कारण म्हणजे सावकार, व्यापारी व नोकरशाहीकडून त्यांचे होत असलेले आत्यंतिक शोषण! त्यांच्या शोषणाचे आधारही पुन्हा त्यांच्या आर्थिक व सामाजिक मागासपणात आहेत. शोषण व

मागासलेपणा एकमेकांना पोशीत आहेत. आदिवासींची सर्व दृष्टींनी अधिकाधिक धुपणी होत आहे.

या जडतेवर दोन अंगांनी हल्ला करावयास हवा याची संपूर्ण जाणीव उपयोजनेत दिसून येते. आदिवासी समाजघटकांच्या तात्कालिक गरजा भागविणे, त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभी करणे, त्या यंत्रणेद्वारा आवश्यक त्या संधी व सोयी यांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोचविणे हा त्यातील एक भाग. तसेच त्यांना नव्या उत्पादनतंत्राचा बोध करून देणे, नवी उत्पादनतंत्रे, आर्थिक घडामोडींचा व विकास-योजनांचा लाभ घेण्यास त्यांना सक्षम बनविणे हा भागही महत्त्वाचा आहे. हे दुसरे अंग मुख्यत: शैक्षणिक स्वरूपाचे आहे.

यासाठी जास्तीत जास्त खालच्या व शेवटच्या समाजघटकापर्यंत हे पोचविणे व तयार करणे पोहोचविले पाहिजे. पाडा-पाडा, घर–घर, व्यक्तीव्यक्तीपर्यंत हे पोचविले गेल्याखेरीज ह्या उपयोजनेने ठरविलेली उद्दिष्टे गाठणे अशक्य आहे. या अंतिम घटकापर्यंत आर्थिक अडचणींमुळे पोचता येईल की नाही याविषयीची साशंकता या योजनेत व्यक्त झाली आहे.

विकासकेंद्र, त्याखालील दोन आर्थिक संस्था, त्या दोन आर्थिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येकी तीन आश्रमशाळा–कॉम्प्लेक्स असे मुख्यत: या उपयोजनेच्या यंत्रणेचे स्वरूप आहे. तीन ते चार हजार लोकसंख्येस एक आश्रमशाळा हे ह्या यंत्रणेचे अखेरचे युनिट आहे. हे युनिट शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचून आवश्यक त्या गोष्टी त्यांच्या बाबतीत करू शकेल काय ?

या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी सरकारी यंत्रणेवर सोपविली आहे. अंमलबजावणीत अन्य बिगरसरकारी संस्थांचा सहभाग गृहीत धरलेला नाही. राज्य, जिल्हा व पंचायत समिती–पातळीवरील लोकसमित्यांचे स्वरूप मार्गदर्शक स्वरूपाचे आहे. यापूर्वी आदिवासी जनतेची दयनीय स्थिती लक्षात घेऊन त्या स्थितीत बदल करण्यासाठी या बिगर सरकारी संस्थांनी बजावलेली कामगिरी अगदीच उपेक्षणीय नाही. आदिवासींच्या मागासपणाची जी कारणे आहेत, त्यांत त्यांच्यातील आत्मविश्वासाचा अभाव, तसेच सावकार, व्यापारी व सरकारी नोकर यांच्याशी आलेल्या त्यांच्या संबंधातून निर्माण झालेले परकीयांविषयीचे भय या कारणांचाही समावेश करावा लागेल. या उपयोजनेत आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी सुचविलेल्या उपायांचे मुख्य सूत्र असे–ह्या योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्वसामान्य आदिवासी नागरिकांचे व त्यांच्या नेतृत्वाचे या उद्दिष्टानुवर्ती शिक्षण करणे; पण हे शिक्षण देणार कोण ? याविषयी ह्या उपयोजनेत काही खुलासा नाही. बहुधा एखादी सरकारी यंत्रणा, नेतृत्व शिक्षणाची तसेच सामान्य जनांच्या अशा शिक्षणाची जबाबदारी नोकरशाहीवर सोपविणे अनेक दृष्टींनी अयोग्य ठरणार आहे. वस्तुत: या क्षेत्रात बिगरसरकारी संस्थांना महत्त्वाची जबाबदारी स्वीकारता येईल. या संस्थांच्या उद्दिष्टांची, व्यवहाराची व कार्य-क्षमतेची कसोशीने पहाणी करूनच अशी जबाबदारी त्यांच्यावर सोपवावी.

बिगरसरकारी संस्थांच्या या उपयोजनेतील सहभागाला दुसरेही परिमाण आहे. आदिवासी व अन्य भारतीय जनतेचा फक्त नोकरशाहीमार्फतच संबंध येऊ देणे, एकात्म भारत समाज–निर्मितीच्या दृष्टीने उचित होणार नाही. तसेच शोषक सावकार, व्यापारी व सरकारी नोकर एवढाच अन्य भारतीय समाज आहे. तसेच त्यांचे व आदिवासी समाजाचे संबंध फक्त शोषक व शोषित असेच आहेत ही भावना त्यांच्या मनात कायम राहू देणे अयोग्य होईल. या शोषक–शोषित संबंधापेक्षाही वेगळा बंधुत्वाचा संबंध त्यांच्यात व अन्य भारतीय समाजघटकांत प्रस्थापित करणे आवश्यक आहे. ह्या दृष्टीने त्यांच्यात नि:स्वार्थ हेतूने व या उपयोजनेच्या उद्दिष्टांच्या मर्यादेत काम करण्याची संधी अशा बिगरसरकारी संस्थांना दिली गेली पाहिजे. त्यांच्या कामाचे उद्दिष्टपूर्तीच्या संदर्भात सतत कटाक्षाने मूल्यमापन होत राहावे हेही तेवढेच आवश्यक आहे.

अशा बिगरसरकारी संस्था ह्या नेहमीच बिगरआदिवासींच्या असतील असे नाही. अशा संस्थांना विकासकेंद्रकक्षेखालील सर्व पातळ्यांवर ह्या उपयोजनेसाठी काम करण्याची संधी असावी. सहकारी संस्था, आश्रमशाळा या पातळ्यांपर्यंतची जबाबदारी जेथे शक्य असेल तेथे अशा संस्थांना घेऊ द्यावी. तसेच त्याखालील कक्षेत काम करण्याची सोयही–म्हणजे गावपातळीवर-त्यांना असावी. विशेषत: प्रत्येक आदिवासी व्यक्तीला ह्या योजनेचा फायदा घेण्यास त्यांनी उद्युक्त करणे, त्याला नव्या नव्या गोष्टी स्वीकारावयास लावणे, त्यांच्या अडचणींची दाद लावून देणे, अशी अनेक कामे ह्या संस्था करू शकतील. तळच्या व्यक्तीपर्यंत त्या पोहोचू शकतील.

या उपयोजनेतील खाली दिलेल्या कामांमध्ये त्यांचा सहभाग हा अत्यंत मोलाचा ठरेल.

(१) शेतीक्षेत्रात नव्या तंत्राचे शिक्षण देणे, त्यांचा प्रसार करणे, त्यांची प्रात्यक्षिके दाखविणे या गोष्टी अशा संस्था अधिक चांगल्या प्रकारे करू शकतील. तसेच नवी तंत्रे अवलंबिली जात असताना येणाऱ्या अडचणी, त्यांतून निर्माण होणाऱ्या समस्या विकासकेंद्रांवरील संशोधनसंस्थांकडे पोहोचविणे, लोकांचे गैरसमज दूर करणे, या कामी अशा संस्थाच अधिक उपकारक काम करू शकतीलसे वाटते. पीकसंरक्षण, मृदसंधारण या बाबतीतही अशा संस्था, तसेच विद्यापीठीय व इतर युवक यांचे सहकार्य घेणे उपकारक ठरेल. शिक्षित युवकांचा ह्या विकासयोजनांशी सततचा संबंध राहील हे पहाणे उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने फार आवश्यक ठरणार आहे.

(२) दूध-व्यवसायाच्या विस्ताराच्या व विकासाच्या कामातही अशा संस्थांच्या सहकार्याला खूप वाव आहे. नव्या जातींच्या पैदाशीची केंद्रे चालविणे, दूधउत्पादनाला प्रोत्साहन देणे, अशा उत्पादकांचे संघटन करणे, त्यांचे प्रशिक्षण करणे, त्यांच्यापर्यंत योग्य वैद्यकीय साहाय्य पोहोचविणे, दूध गोळा करणे, ते शासकीय केंद्रांकडे पोहोचविणे अशी अनेक कामे या संस्था करू शकतात.

(३) प्राथमिक आरोग्यकेंद्रांच्या खालील पातळीवर वैद्यकीय सेवाकेंद्रे चालविणे हे कामही अशा संस्था करू शकतात. त्यामार्फत कुटुंबनियोजन, साथींच्या रोगांचा नायनाट आणि आरोग्यविषयक चळवळीही लोकांपर्यंत पोहोचवू शकतात.

(४) विशेषत: शिक्षणक्षेत्रात अशा संस्थांच्या कार्यास फार वाव आहे व तशी आवश्यकताही आहे. अर्थात ह्या संस्थांचे

पृष्ठ ३१ वर

# दिवाळी अंक

## १९७५

### एका वाचकाची मुलाखत

—वि. शं. पारगावकर

'का हो, प्रकृती वगैरे बरी नाही की काय ?'

'चांगली आहे.'

'मग चेहरा असा का दिसतो ?'

'दिवाळी नुकतीच झाली !'

'कशी काय झाली दिवाळी ?'

'बरीच म्हणायची !'

'दिवाळी अंक वाचले ?'

'बरेचसे वाचले.'

'कसे काय वाटले ?'

'तेवढं विचारू नका'

'का हो ?'

'म्हणजे काय, अगोदरच मी दिवाळीत आजारी होतो.'

'असं ?'

'तर काय ?'

'अरेरे, मग दिवाळी एकंदरीनं वाईटच गेली म्हणायची !'

'त्यात पुन्हा दिवाळी अंक—'

'दिवाळी अंकात काय काय वाचलं ?'

'चाळले. वाचलं काहीच नाही !'

'शे-दोनशे दिवाळी अंकात तुम्हाला काहीच वाचनीय वाटलं नाही ?'

'नाही !'

'कमाल आहे !'

'अहो, कमाल कसली ? तेच तेच अनुभव आणि तेच ते शब्द. शिवाय सर्व लेखक आपले जुनेच असल्यामुळे शैलीही तीच. रुळलेली, बेचव, कृत्रिम, टाकाऊ, बोजड, बथ्थड...'

'बापरे ! तुमचा भलताच राग दिसतो आहे !'

'राजकीय व्यक्तीमध्ये आपले यशवंतराव चव्हाण नेहमी छान लिहून जातात; पण या दिवाळी अंकातला त्यांचा लेख फारच मिळमिळीत वाटला.'

'कशात ?'

'ते नेहमी केसरीच्या दिवाळी अंकात लिहितात.'

'काही नाही म्हणता ?'

'आहे. केसरीत एक परिसंवाद आहे. बराच म्हणायचा; पण यशवंतरावांचा लेख दिलखुलास वाटला नाही. फार निराशा झाली. दुसरे पां. वा. गाडगीळ. तेच ते चर्वितचर्वण. अहो, काही नवी दृष्टी. खोल मांडणी, तीव्र निरीक्षण. ताज्या चिंतनातून निघालेला नवा आशय. शुद्ध फसवणूक वाटते.'

'कोणाची ?'

'दोघांचीही !'

'म्हणजे ?'

'स्वतःची आणि वाचकांचीही !'

'अहो, पण प्रत्येक वेळी नवं नवं काय मांडणार ? सांगणार ?'

'कोण म्हणतं सांगा, मांडा ? दर महिन्याला आणि दर वर्षाला मासिकांची पानं काळी झालीच पाहिजेत का ? कथेच्या नावानं तर अगदीच बोंब आहे. एखादी तरी कथा नवीन, खोल, दर्दभरी, कलात्मक जीवनानुभूती देणारी आहे काय ? नाव नको ! तीच तीच जुनी दुःखं, त्याच त्या जुन्या, ओशट, घामट जीवनातून केलेली लोफड उचलेगिरी. बऱ्याच वर्षांचा सराव आहे म्हणून शब्दांच्या उतरंडी. काही खरं नाही !'

'बरं, काही नवे अंक पाहिले ?'

'लक्षातही न भरणारे. तो रसिक. गंगाधर गाडगिळांचा. पूर्वीपासून एक सवय लागलेली आहे. फडक्यांच्या 'अंजली' अंकाकडे पाहायची. फडक्यांचा अंक म्हणजे परिवार अंक. स्वतः ना. सीं. ची कादंबरी, मग कमलाबाईंची गोष्ट, मग अंजली रोहिणीचे काही लेख-बीख. तसेच रसिकचे झालेले आहे. स्वतः गाडगिळांची नव्या प्याल्यातली जुनीच दारू. शिवाय सौ. वासंतीबाई गाडगीळ आणि मग राहिले म्हणजे खुद्द बनहट्टी. असा सारा एकमेकांच्या आग्रहांचा मारा; पण तो वाचकांवर ! आणखी एक विशेष. या अंकास दिवाळी अंक न म्हणता जाहिरात विशेषांक म्हटले तरी चालेल. कारण अफाट जाहिराती आणि त्याही साऱ्या उजवीकडे. फक्त अंकाच्या शेवटीच जाहिरात नाइलाज म्हणून डावीकडे !'

'आणखी काय ?'

'आणखी चुटके, हास्यचित्रे वगैरे वगैरे. तेच तेच रटाळ विनोद, बोजड हास्यचित्रे. त्यांना हास्यचित्रे का म्हणावे ? खरे म्हणजे रडकथाच त्या !'

'वाऽऽ !'

'अहो, वाऽऽ काय ? खरं सांगतोय मी. एक हास्यचित्र आठवतं. सांगतो. डॉक्टर दवाखान्यात येतात आणि स्वतःच्या खुर्चीला अडखळून पालथे पडतात. खाली वाक्य आहे, 'आजही चष्मा विसरले वाटतं !' सबंध रस्त्याने सुखरूप आले आणि खुर्ची मात्र तेवढी दिसली नाही ! काय विनोद !'

'एकंदरीनं तुमचं मत काय ?

'आता आणखी काय सांगू ? सबंध दीड-दोनशे अंकांत दोन-तीन लेख बरे. य. दि. फडके यांचा मौजमधील आगरकर आणि केसरीवरील लेख. सोबतमधील वल्लभभाई पटेल यांच्यावरील नरहर कुरुंदकरांचा लेख आणि माणूसमधील डॉ. लागू. तशी जयवंत दळवी यांची दीपावलीतली कादंबरीही बरी आहे. ग्रेट नाही; पण विषय वेगळा आहे. बाकी सर्व आनंद !

आनंदी आनंद गडे—' □

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
[illegible]
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

# इस्लाममध्ये स्त्री-पुरुष समानता आहे काय ?

प्रा. एफ. एच. बेन्नूर, सोलापूर

'माणूस 'मध्ये इस्लावरील लेखमालिका सुरू झाल्यानंतर उत्सुकतेने अंक वाचण्यास घेतले. मराठीतून 'इस्लाम 'वरील लिखाणाचा असलेला अभाव थोडा तरी भरून निघेल, असं वाटलं; परंतु निराशाच पदरी पडली. कारण एक तर खुद्द संपादकांनीच म्हटल्याप्रमाणे काही ठिकाणी कु. वजिफदार यांचे लेख खरोखर अगदीच बाळबोध वाटले. अर्थात तशी बाळबोध माहितीही कित्येकांना नाही, ही गोष्ट अगदी खरी आहे; परंतु केवळ बाळबोध माहिती असती तर फारसे बिघडले नसते. लेखिकेने मुळात हे निबंध एम. ए. च्या परीक्षेसाठी लिहिल्याचे म्हटलेले असले तरी त्या लेखातून जाणवणारा लेखिकेचा केवळ समर्थनवादी सूर (Justificationist approach) इस्लामच्या प्रेरणा व परंपरांच्या शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ चिकित्सेला मारक असून त्यामुळे सर्वसामान्य वाचकांची दिशाभूल होते. इस्लाममध्ये जे काही आहे, ते चांगलेच आहे व असणारे दोष हे इस्लामचे नसून मनुष्याच्या स्खलनशील वृत्तीमुळे तरी निर्माण झाले आहेत किंवा इस्लामी सत्याचा खरा आविष्कार मुस्लिमांत न झाल्यामुळे निर्माण झाले आहेत, हा समर्थनवादी दृष्टिकोन इस्लामच्या धार्मिक व आध्यात्मिक समस्या आधुनिक संदर्भात सोडविण्यास मारक ठरतो व प्रबोधनाच्या सर्व वाटा बंद करून टाकतो.

'इस्लाम व स्त्री' या आपल्या तिसऱ्या लेखात इस्लाममधील 'स्त्री 'बद्दल असणाऱ्या संकल्पना मांडताना लेखिकेने हीच भूमिका स्वीकारली आहे आणि 'ह्या देशात' इस्लामवर होणाऱ्या टीकेने आपले मन व्यथित होते असे सांगून स्त्रीविषयक विचारासंबंधाने इस्लामचे टीकाकार इस्लामवर कसा अन्याय करीत असतात, हे दाखविण्यासाठी इस्लाममध्ये स्त्रीला पुरुषाप्रमाणेच समान हक्क कसे देण्यात आले आहेत, हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

ही गोष्ट खरी की इस्लामपूर्व अरबस्थानात पुरुषांच्या स्वैराचारी वृत्तीला कसलाच धरबंद नव्हता आणि महमंद पैगंबरांनी एका अर्थाने स्त्रीजीवनाच्या उत्थापनाची चळवळ हाती घेऊन स्त्रीला संरक्षण देणारे धर्मनियम केले. इस्लामने स्त्रीला विवाह, वारसाहक्क, कौटुंबिक दर्जा, स्त्री–पुरुषसंबंध व घटस्फोट या बाबतीत अनेक प्रकारचे संरक्षण देण्याचे प्रयत्न केले असले तरी इस्लामने खरोखरच स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे समान हक्क व अधिकार दिले आहेत असे म्हणणे चुकीचे होईल. इस्लामने त्या काळातील इतर धर्मांच्या व सामाजिक रूढींच्या तुलनेने स्त्रियांना काही दर्जा व संरक्षण देण्याचा प्रयत्न केला याचा अर्थ त्यांना बरोबरीचे हक्क दिले असा होत नाही. किंबहुना कुराणशरिफच्या संबंधित भागाचा अभ्यास केला तर इस्लामला 'स्त्री-पुरुष' समानता अभिप्रेत आहे, असे दिसत नाही.

कुराणशरिफमधील 'सूरत–अन–निसा' प्रकरणाचा व त्यामधील वचनांचा विचार केल्यास इस्लामची स्त्रीबद्दलची मूलभूत भूमिका लक्षात येते. 'पुरुषांना स्त्रियांवर सत्ता प्राप्त होते कारण परमेश्वरानेच पुरुषांना त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ बनविले आहे आणि पुरुष त्यांच्या सांभाळाकरिता आपल्या संपत्तीचा वापर करतात. म्हणून सद्वर्तनी स्त्रिया आज्ञाधारक असतात व स्वतःच्या न दिसणाऱ्या भागांचे रक्षण करतात. कारण ईश्वराने त्यांना संरक्षण दिले आहे आणि ज्या स्त्रिया तुमच्या आज्ञापालन करणार नाहीत, त्यांना ताकीद द्या व त्यांच्याशी शरीरसंबंध टाळा व त्यांना पिटून काढा आणि आज्ञापालन करणाऱ्या स्त्रियांना त्रास देऊ नका !' (४·३८)

तसेच 'सूरत–अल–बकर' या प्रकरणात कुराणातील पुढील वचन आहे: 'तुमच्या स्त्रिया या तुमच्या शेतीसारख्या आहेत. तेव्हा तुमच्या इच्छेप्रमाणे त्यांचा उपभोग घ्या. स्त्री ही तुमची शेती आहे !' (२·२२३) हे वचन कुराणातील स्त्रीविषयक कल्पना स्पष्ट करते. 'सुरा–अल–बकर 'मध्ये 'पुरुषांचा दर्जा हा निश्चितपणे स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ आहे' असे स्पष्टपणे म्हटले आहे. यावरून कुराणशरिफमध्ये स्त्री–पुरुष–समतेचे तत्त्व प्रतिपादन केलेले नाही, हे लक्षात येईल. म्हणजे मूळच्या कुराणप्रणित इस्लाममध्येच स्त्री–पुरुष-समानता मान्य केलेली नाही.

तसेच इस्लामधील विवाहसंस्थेचा अभ्यास केला तर इस्लामची लग्नाची संकल्पना स्त्रीवर अन्याय करणारी, तिला केवळ भोगवस्तूचा गौण दर्जा देऊन स्त्रीच्या अस्मितेचा अनादर करणारी आहे हे लक्षात येईल. इस्लाममध्ये लग्न हा धार्मिक विधी नसून एक व्यावहारिक करार आहे. लग्न म्हणजे ज्यायोगे पती आपल्या बायकोचा ताबा घेतो व तिचा उपभोग घेतो असा दिवाणी करार, अशी लग्नाची व्याख्या इस्लाममध्ये केली गेली आहे. लग्न (निकाह) या शब्दाचा अर्थच मुळात लैंगिक संबंध असा आहे. लैंगिक संबंधाचे वैधानीकरण व प्रजोत्पादन हे लग्नाचे मुख्य उद्दिष्ट मानले गेले आहे. इस्लाममध्ये कायदेशीर लग्नासाठी कोणत्याही विधीची किंवा धार्मिक आचाराची गरज नसते आणि करार म्हटला की संबंधित पक्षांवर काही अटी व त्यांची बंधने येणारच. इस्लाममध्ये त्या संदर्भात काही संरक्षणात्मक हक्क देण्यात आले आहेत. स्त्री ही करारानुसार पुरुषाच्या जीवनात येत असल्याने त्या संदर्भात त्या कराराची एक भागीदारीण या नात्याने स्त्रियांना पुरुषांनी सन्मानाची वागणूक द्यावी, विश्वस्त म्हणून वागवावे, अशी इस्लामची आज्ञा आहे. लेखिकेने दिलेली वचने याच संदर्भात कुराणामध्ये येतात आणि नेमकी स्त्रीला गौणस्थान देणारी वचने लेखिकेने वगळली आहेत आणि इस्लामचे टीकाकार इस्लामला निष्कारणच बदनाम करतात असे दर्शविण्याचा प्रयत्न

केला आहे. व्यावहारिक करारापोटी प्राप्त होणारे संरक्षण म्हणजे स्त्रीला दिलेला समान दर्जा नव्हे, हे लक्षात घेणे आवश्यक काहे. हक्क हे व्यक्तीच्या समान दर्जा व प्रतिष्ठेतून निर्माण होतात. ( Dignity of individual ) परंतु इस्लाममध्ये मुळात स्त्रीचे अस्तित्वच गौण मानले गेले आहे. पैगंबरांच्या कन्येला 'प्रकाशदेवता' किंवा व 'स्वर्गीय कन्या' असे म्हटले गेले. कारण ती प्रेषिताची कन्या होती व तिला व तिच्या पतीला पैगंबरांचा मुख्य वारसदार मानले गेले. व त्यामधूनच पुढे इस्लाम दुभंगला. त्या विशेषणांना एक विशिष्ट ऐतिहासिक संदर्भ आहे; ती विशेषणे सर्व स्त्रीजातीला उद्देशून नाहीत.

त्याचप्रमाणे इस्लाममधील नैतिक व सामाजिक कायद्याचा विचार केल्यास, स्त्रियांना गौण स्थान देणारे इस्लामचे वैचारिक अधिष्ठान लक्षात येईल. इस्लामी रूढी व समाजनियमांनुसार स्त्रियांना सत्तेच्या प्रत्येक स्थानापासून वंचित ठेवण्यात आले आहे व फॅसिस्ट विचार-प्रणालीप्रमाणेच त्यांना चूल व मूल यांना पूर्णपणे जखडून टाकण्यात आले आहे. म्हणूनच वारसाहक्कांच्या बाबतीत तिला पुरुषाच्या निम्म्याने वाटा प्राप्त होतो व वैवाहिक हक्कात तिला केवळ ½ वाटा देण्यात आला आहे. स्त्रियांच्या बाबतीतले इस्लामचे वारसाहक्क तिचे गौणस्थान व्यक्त करतात. इस्लाममध्ये तिला कसलाच सामाजिक दर्जा प्राप्त होत नाही.

इस्लामच्या नैतिक व न्यायविषयक संकल्पनांचा अभ्यास केला तर इस्लाममध्ये स्त्रीच्या संपूर्ण अस्तित्वाचा कसा उपमर्द करण्यात आला; याची धक्काजनक माहिती मिळेल. व्यभिचार व स्त्री-पुरुष विवाह-बाह्य संबंध यासंबंधी स्त्रीला दिली गेलेली वागणूक भयंकर पक्ष-पाती आहे. व्यभिचारी व लैंगिक गुन्हे करणाऱ्या पुरुषांसाठी इस्लाम-मध्ये अनेक पळवाटा आहेत आणि स्त्रियांना मात्र अमानुष शिक्षा सांगण्यात आल्या आहेत. 'सुरा-अल्-निसा' या कुराणातील प्रकरणात म्हटले आहे, 'स्त्रियांच्या व्यभिचाराबद्दल तो सिद्ध होण्यासाठी चार पुरुषांची साक्ष पुरेशी असून त्यांनी तशी साक्ष दिली तर त्यांना घरात कोंडून त्यांचे आयुष्य संपवा !'(४·१९) मूळ कुराणामध्ये व्यभिचारी पुरुषासाठी मात्र काही नियम आढळत नाहीत. 'हदीस'मध्ये मात्र व्यभिचारी पुरुषासंबंधी नियम केलेले आहेत. केवळ इस्लामी राज्या-तील (दारूल-इस्लाम) स्त्रीशी मुस्लिम पुरुषाने व्यभिचार केला तर तो शिक्षेस पात्र होतो आणि बिगर इस्लामी राज्यातील त्याच्या व्यभिचाराबद्दल त्यात काही शिक्षा सांगितलेली नाही. काझीसमोर व्यभिचाराबद्दल चार पुरुष साक्षीदारांची साक्ष व गुन्हेगाराचा कबुली-जवाब हा गुन्हा सिद्ध करण्यास आवश्यक असतो आणि गुन्ह्याची शिक्षा होण्यापूर्वी आरोपीने परमेश्वराच्या शपथेवर चार वेळा शपथ घेऊन गुन्हा नाकारला तर त्याची सुटका होत असे. तसेच एखाद्या व्यभिचारी पुरुषाने गैरसमजुतीने व्यभिचार केला असं म्हटल्यास व इतर सबबी दिल्यास तो मुक्त होतो. ज्या स्त्रीशी त्याने अनैतिक संभोग केला, ती त्याची पत्नी आहे, अशी त्याने बतावणी केल्यास तो शिक्षेस पात्र होत नाही. अशा अनेक पळवाटा पुरुषासाठी आहेत; परंतु स्त्रीला मात्र कोणतीही पळवाट नाही. यावरून इस्लामच्या नैतिक व न्यायविषयक कल्पना कशा मध्ययुगीन व स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या आहेत, हे लक्षात येईल.

तसेच खून व इतर फौजदारी गुन्हे व त्यासंबंधीचे स्त्री-पुरुष-संबंधाचे नियम विचारात घेतल्यास इस्लामचा स्त्रीविषयक संकुचित दृष्टिकोन आणखी स्पष्ट होतो. इस्लाममध्ये स्त्रीला मंद बुद्धीची व अविश्वसनीय मानले आहे. उदा. :

१ : वेश्याव्यवसायासंबंधी चार पुरुषांची साक्ष ही स्वीकारली जाते. स्त्रीची साक्ष चालत नाही. (२४·४)

२ : फौजदारी गुन्ह्यात दोन पुरुष साक्षीदार चालतात; पण स्त्री साक्षीदार चालत नाही. पाखंडी मुस्लिम पुरुषाची साक्ष चालू शकते; पण धार्मिक मुस्लिम स्त्रीची साक्ष चालत नाही.

म्हणजे इस्लामच्या लेखी मुस्लिम स्त्रीला किती सन्माननीय स्थान आहे हे वाचकांनीच पहावे.

तसेच मनुष्यहत्येबद्दल नुकसानीचा मोबदला देण्याचा नियम इस्लाममध्ये आहे. एखाद्या स्त्रीची हत्या केली गेली तर पुरुषवधासाठी जेवढा मोबदला द्यावयाचा असेल, त्याच्या निम्म्याने स्त्रीहत्येबद्दल द्यायचा आहे. एखाद्या स्त्रीने नवऱ्यापासून अलग होण्यासाठी धर्मत्याग केला तर तिला जबरदस्तीने इस्लाममध्ये आणण्यात येते. तिला ७५ फटक्यांची शिक्षा होते व प्रसंगी दुसरे लग्न करण्याची परवानगी मिळत नाही आणि नवऱ्याने जर धर्मत्याग केला तर त्याची सर्व विवाहबंधने नष्ट होतात.

ही सर्व दिलेली उदाहरणे कुराण व शरियतमधील आहेत. यावरून इस्लामची स्त्रीबद्दलची कल्पना स्पष्ट होते. तसेच, लग्नसंस्थेप्रमाणेच घटस्फोटाची तरतूद देखील अत्यावश्यक असते; परंतु इस्लाममधील घटस्फोटाच्या तरतुदी एकतर्फी असून सर्वार्थाने पुरुषांनाच तो अधिकार दिला गेला आहे. जणु तलाक हा पुरुषांचाच खास अधिकार आहे अशी त्या तरतुदींची रचना आहे. तलाकच्या अनेक प्रकारांपैकी तोंडी तलाकच्या तरतुदी पहा. त्यावरून स्त्रीला कसे कस्पटासमान मानले गेले आहे याची कल्पना येईल. पुरुष, लिखित तलाकनामा न देता, तोंडी तलाकही देऊ शकतो. त्या तरतुदीनुसार तलाकचे शब्द हे पुरुषाकडून स्पष्टपणे उच्चारले गेले असतील तर तलाकचे प्रयोजनदेखील जाणून घेण्याची गरज नसते. इतकेच नव्हे, तर पुरुषाकडून त्याच्या वडिलाने किंवा कोणीही बळजबरीने वा सक्तीने तलाक वदविला तर किंवा पुरुषाने थट्टामस्करीत किंवा दारूच्या नशेत ( दारू त्याने स्वेच्छेने घेतलेली असेल तर ) आपल्या बायकोला तलाक दिला तरी तो कायदेशीर ठरतो व स्त्री रस्त्यावर फेकली जाते. तसेच बायकोच्या समक्ष किंवा तिला उद्देशून तलाक देण्याची गरज नसते. काझीकडे जाऊन बायकोच्या परस्पर तलाक दिला तरी तो विवाह रद्द होतो. तसेच बायकोच्या गैरहजेरीत लिखित तलाकनामा देऊन तिला कायमचे हाकलून देता येते. या तरतुदी स्त्रियांना समान स्थान व हक्क देणाऱ्या आहेत काय ? स्त्रीला जर खरोखरच समानता असेल तर तिलाही अशाच प्रकारे घटस्फोट घेता आला पाहिजे.

असे नेहमी म्हटले जाते की 'खुला' पद्धतीच्या तलाकानुसार इस्लामने पत्नीलाही तलाकचे अधिकार दिले आहेत. या तलाकमध्ये दोघांची सम्मती असली तरी प्रत्यक्ष विवाहविच्छेदाची कृती ही पतीचीच कृती असते. सम्मती फक्त स्त्रीची पण तलाक पुरुषच देतो. आणखीन अनेक घटस्फोटाच्या पद्धती आहेत. याहीपेक्षा अन्याय-कारक तरतुदी शिया-पंथाच्या रूढ कायद्यामध्ये आढळतात. केवळ

तलाकचे प्रकार व त्यामधून स्त्रियांवर होणारे अन्याय हा अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय आहे. या सर्व तरतुदीवरून इस्लाममध्ये स्त्रीला प्रत्यक्षात व्यावहारिक पातळीवर किती 'सन्माननीय' स्थान दिलेले आहे हे वाचकांच्या लक्षात येईल. (या संबंधीच्या सर्व तरतुदी मुल्लाकृत 'मोहमॅडन लॉ' मध्ये पहा.) इस्लामपूर्वकाळात अरब समाजामध्ये अनिर्बंध बहुपत्नीत्वाची प्रथा जशी बेफाम होती तसेच अनिर्बंध घटस्फोटामुळे त्यांचे समाजजीवन विस्कळित झाले होते. पैगंबरांना या दोन्ही प्रथा पूर्णपणे बंद करणे शक्य झाले नाही म्हणून त्यांनी बहुपत्नीत्व व घटस्फोटाला थोड्याफार मर्यादा घालण्याचे प्रयत्न केले. यावरून तत्कालीन प्रबळ प्रथांनी इस्लामवर घातलेल्या मर्यादा स्पष्ट होतात. त्या काळातील शेकडो बायकांऐवजी 'चार बायकां'ची दिलेली 'सवलत' किंवा घटस्फोटाची 'सवलत' ही आजच्या काळात समर्थनीय ठरत नाही व २० व्या शतकातील पुरुषाला स्त्रीच्या जीवनाशी घटस्फोटाचा खेळ खेळण्याचा अधिकार समर्थनीय ठरत नाही आणि धर्मनियमांची चिकित्सक वृत्तींनी तपासणी करण्याची आवश्यकता निर्माण होते.

लेखिकेने केवळ सश्रद्ध समर्थनच करण्याचा प्रयत्न केला आहे असे नव्हे; तर कुराणातील वचनांचे संदर्भ बदलले आहेत व काही ठिकाणी वचनांचे अर्धवट भाग उद्धृत करून इस्लामने स्त्री-पुरुषांना समानता दिली आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. विरोधकांच्या व सुधारकांच्या तोंडावर कुराणातील वचने फेकली की त्यांच्या सुधारणेच्या वाटा बंद होतात, असे परंपरावाद्यांना नेहमीच वाटते; परंतु कुराणातील संदर्भ बदलून व अर्धवचने देऊन सर्वसामान्यांची फसगत करता येते; पण सर्वांची फसवणूक शक्य नाही. उदा. लेखिका म्हणते, 'समानतेच्या भूमिकेतून स्त्रियांना देखील समान अधिकार असले पाहिजेत. (२·२२८) या शब्दांत कुराणांनी स्त्रियांना समानता बहाल केली आहे.' आता लेखिकेच्या या उताऱ्यात वाचकांची दिशाभूल करण्याचे प्रयत्न कसे आहेत, ते पहा. लेखिकेने दिलेले २·२२८ हे कुराणातील वचन घटस्फोटित स्त्रियांच्या किमान संरक्षणासंबंधीचे आहे, स्त्रियांच्या नैसर्गिक समतेबद्दलचे नाही. शिवाय ते वचन लेखिकेने सोयिस्करपणे तोडले आहे व अर्धवटपणे दिले आहे. तो पूर्ण सुरा खालीलप्रमाणे आहे : 'घटस्फोटिता स्त्रीने पुढील जीवनाची तरतूद करण्यापूर्वी, तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत थांबणे आवश्यक आहे व त्यांची ईश्वरावर व अंतिम न्यायाच्या दिवसांवर श्रद्धा असेल तर ईश्वराने त्यांच्या पोटी निर्माण केलेले लपविणे (त्यांना गर्भ राहिल्याचे तीन महिन्यांत लक्षात आले तर) हे बेकायदेशीर आहे आणि (त्या अवधीत) त्यांच्या पतींना समेट करून पुन्हा त्यांचा स्वीकार करण्याची इच्छा असेल तर पतींना तसा हक्क निश्चित असतो. अर्थात त्या संदर्भात पत्नीलाही न्याय्य व पूरक हक्क आहेत. (equitable rights) परंतु या बाबतीत पुरुषांना स्त्रीपेक्षा वरचढ हक्क आहेत व ईश्वर न्यायी व सर्वश्रेष्ठ आहे.' (२·२२८ पूर्ण सुरा.)

हे पूर्ण वचन वरीलप्रमाणे आहे व घटस्फोटित स्त्रियांसंबंधीचे आहे. म्हणजे घटस्फोटानंतर तीन महिन्यांच्या कालावधीत घटस्फोटित स्त्रीला गर्भ राहिल्याचे आढळले तर आणि पुरुषाची तिला पुन्हा स्वीकारण्याची इच्छा असेल तर तो तिचा स्वीकार करू शकतो. स्वीकार करावाच असा दंडक कुराणाने घातलेला नाही. फक्त 'अर्थात त्या संदर्भात पत्नीलाही न्याय्य व पूरक हक्क आहेत.' हे त्याने लक्षात ठेवावे असे म्हटले आहे. म्हणजे लेखिकेने दिलेले वचन घटस्फोटित व गरोदर स्त्रियांच्या संरक्षणात्मक हक्काबद्दलचे आहे. लेखिकेने ते सर्वसामान्य विधान (General Statement) अशा अर्थाने उद्धृत करून संदर्भ टाळला आहे; परंतु वाचकांच्या लक्षात येईल की लेखिकेने दिलेले वचन व 'सूरा' लक्षात घेतला तर समानतेचा पुरस्कार करणारा नाही.

तसेच वरील सुऱ्यामधील शेवटचे वचन लक्षात घ्यावे. 'परंतु या बाबतीत पुरुषांना स्त्रीपेक्षा वरचढ अधिकार आहेत.' हे वचन लेखिकेने उद्धृत केलेल्या ओळीनंतर येते व पुरुषश्रेष्ठत्वाचा महिमा सांगून जाते. मग इस्लाममध्ये स्त्री-पुरुष-समानता कोठे आहे? (अर्थासाठी पहा : (१) अल्लामा मौलाना अब्दुल्ला युसूफ अलीकृत कुराण– (२) महमद झाफरुल्लाखान कृत-कुराण (३) बेल कृत कुराण)

म्हणजे इस्लामचे समर्थन करण्याच्या प्रयत्नात इस्लामी कायद्यामध्ये स्त्रीला दिल्या गेलेल्या या गौण स्थानामुळे तिच्यावर होणाऱ्या सामाजिक अन्यायाचे समर्थन होत राहते व मुस्लिम स्त्री ही एक पददलितच राहते. हे एक तर समर्थकांच्या लक्षात येत नाही किंवा आपला धर्म सर्वश्रेष्ठ आहे हे दर्शविण्याच्या प्रयत्नात न्याय, समता व व्यक्तीचे मूल्य यांचा बळी दिला जातो. इतर धर्मांमध्ये वाईट चालीरीती नाहीत, असे जाणकारांनी कधीच म्हटलेले नाही. तसेच इस्लाममध्ये चांगल्या परंपरा व तत्त्वे नाहीत, असेही कोणी म्हटलेले नाही. प्रत्येक धर्म हा काही श्रेष्ठ व चिरंतन मूल्यांवर उभा असतो व तसेच एका विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीत निर्माण होत असतो. साहजिकच काळाच्या मर्यादा त्यावर पडलेल्या असतात. बदलत्या काळाप्रमाणे धार्मिक विचारांचे मूल्यांकन करून धर्म टिकवायचा प्रयत्न करणे महत्त्वाचे असते. नाही तर धर्म हा कालबाह्य बनण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रबोधन अत्यावश्यक असते.

सध्या जागतिक महिलावर्ष साजरे केले जात आहे. सर्वत्र महिला आपल्या हक्कासाठी लढा देत आहेत; परंतु भारतातील अत्याधुनिक अशा मुंबई शहरात राहणारी, मुंबई विद्यापीठाची सर्वोच्च पदवी प्रथम श्रेणीने मिळवणारी सदर लेखिकेसारखी बुद्धिमान महिला मात्र मुस्लिम स्त्रीच्या मुक्तीचा हिरिरीने प्रचार करण्याऐवजी केवळ इस्लाममधील पारंपारिक व अन्याय्य विचारांचे समर्थन करीत राहते, ही गोष्ट मनात खंत निर्माण करते!

□ □

# सोलकढी

## □ सत्यजित रे : अलिकडे आणि पलिकडे

सत्यजित रे हे नाव मी वीस वर्षांपूर्वी प्रथम ऐकले. त्या सुमारास माझे कान लांब होऊन मी पुष्कळ नवी नावे आणि नव्या गोष्टी ऐकू लागलो होतो. त्यातली काही नावे आणि गोष्टी यथाकाल विरून गेल्या. सत्यजित रे यांचे नाव मात्र सारखे कानावर पडत राहिले! तो कोणी एक बंगाली चित्रपट–दिग्दर्शक होता. तोपर्यंत मी मुबलक चित्रपट पाहिले होते. चित्रपटातले आपल्याला फारच कळते असे मला वाटायचे. मी माझे असे एक पाहून ठेवले होते की परक्या भाषेतले चित्रपट मला उमजत नसत. म्हणून असे चित्रपट पाहायचे मी शक्यतो टाळत असे. स्वतःची अभिरुची शहाणी करायच्या उद्योगात रमलेली अनेक वेडी माणसे माझ्या नजिकच्या अवतीभवती होती. सगळेजण त्यांना रसिक म्हणायचे. रसिक चारचौदांपेक्षा वेगळे राहायचे. वेगळे पाहायचे. वेगळे बोलायचे. बोलताना त्यांनी उजव्या हाताची तर्जनी हवेत खुपसली की तिथे पसाभर प्रकाश दर्वळायचा. रसिकांच्या हातात सदाचे एक पुस्तक असायचे. त्यांच्या चपलेचा एक अंगठा कायम तुटलेला असायचा. (तसे खास चप्पलजोड बाजारात विकत मिळायचे, हे मला ठाऊक नव्हते तेव्हा.) रसिकांना कायम सर्दी झालेली असायची. सगळे भोवताल रसिकांपुढे कसे आपले तुच्छ होऊन राहायचे.

हे एकूण फार म्हणजे फारच छान होते. त्यामुळे मी रसिक व्हायच्या उद्योगाला तातडीने लागलो. त्याकरता सत्यजित रे यांचे चित्रपट पाहिले : 'पथेर पांचाली' पाहिला; 'अपूर संसार' पाहिला; 'अपराजितो' पाहिला; 'तीन कन्या' पाहिला; 'जलसाघर' पाहिला; 'चारुलता,' 'महानगर,' 'कापुरुष–महापुरुष' पाहिले; आजपर्यंतचे जवळजवळ सगळे पाहिले. बंगाली भाषा मला ओ म्हटल्या ठो समजत नाही; पण सत्यजित रे यांचे चित्रपट बऱ्यापैकी समजले, असे वाटले. कारण ते चित्रपट सहसा चित्रांच्या भाषेत माझ्याशी बोलले. माझे डोळे भरवशाचे आहेत. चित्रभाषा यायला हवी तेवढी मला येते. सत्यजित रे यांचे चित्रपट पाहून मी अंश-रसिक होऊन बसलो होतो. अन्य काही विषयात मात्र माझ्या प्रप्रयत्नांची नुसती चिकचिक झाली.

तिकडे सत्यजित रे वर्षास नवा कोरा चित्रपट दाखवत होता. बंगालीशिवाय दुसऱ्या कोणत्याही भाषेत आपल्याला चित्रपट काढता येणार नाही, असे सांगत होता. त्याच्या चित्रपटांना देशोदेशी पारितोषिके मिळत होती. इंगमार बर्गमन, फेलिनी, रूफगेत्ती, मॅकरोनी, व्हिटोरियो डी सिका, क्युरोसावा, ऑर्सन वेलेस, डेव्हिड लीन, ह्यूस्टन, बिली वाईल्डर, व्ही. शांताराम, राजा परांजपे, राजा ठाकूर, अनंत माने यांच्यासारख्या विश्वविख्यात दिग्दर्शकांच्या बरोबरीने सत्यजित रे यांचे नाव घेतले जाऊ लागले. त्यांच्यावर लेख-पुस्तके लिहिली जाऊ लागली. थोडक्या अवधीत ते भारतीय अस्मितेचे प्रतीक होऊन बसले. भारताला त्यांचा अभिमान वगैरे वाटायला लागला.

हे ठीकच होते. तथापी रेमोशाय पाचदहा चित्रपट काढतील आणि मग थंड होत विझून जातील असा अनेकांचा अंदाज होता. तसे होते तर त्यांच्याबद्दल काळीकंच हत्तखंत व्यक्त करायची सुबक सोय झाली असती; पण तसे झाले नाही. रेअण्णा वर्षास एक नवा चित्रपट निर्माण करत होते; त्याची दादखल घ्यावीच लागत होती; पण इकडे नव्या–न्यूवेव्हाळीच्या चित्रपटदिग्दर्शकांना एखाददोन झापेत सत्यजित रे यांच्या पलिकडे जायची घाई लागली होती. तपन सिन्हा, मृणाल सेन, मणि कौल, कुमार सहानी, गिरीश कर्नाड, श्याम बेनेगल, सत्यदेव दुबे प्रभृतींचे न्यून्यूगंडी चित्रपट रुजू होत होते; आम्ही ते पाहात होतो; त्यातले काही आम्हाला ठीकपैकी वाटत होते–काहींनी कलात्मक कंटाळासुद्धा दिला होता; पण त्यातल्या कोठल्याच चित्रपटाने सत्यजित रेच्या पलिकडे छलांग मारली नव्हती. कोणाला संवादांचा सोस टाळता आला नव्हता; कोणाची प्रतीके दुर्दुर्बोध राहिली होती; कोणाच्या चित्रपटातले प्रत्येक चित्र देखणे; पण 'पट' मात्र चैतन्यशून्य होता; कोणाची समूह आणि काही असमूह दृश्ये खोटारडी होती; कोणाच्या चित्रपटातली देहाती औरत भुवया कोरून मग हवे तेवढे कावाडकष्ट उपसत होती, अर्धपोटी राहात होती : कोणाचे काय, कोणाचे काय. पाण्यावर काय येईल साय?

सत्यजित रे यांच्या पलिकडे छलांग मारता मारता माती खायची पाळी आली तेव्हा सत्यजितनाच अलिकडे ओढायची युक्ती मंडळींनी काढली. सत्यजित रे कसे कोणतीही एक बाजू न घेण्याइतके भेकड आहेत, त्यांच्याकडे निगेटिव्ह मेरिट्सच कसे जास्त आहेत, त्यांची चित्रे अभिनेते–अभिनेत्रींनी कशी तारलेली आहेत, आपल्या मातृभाषेतच चित्रपट करू शकणे ही त्यांची मोठी मर्यादा कशी आहे–वगैरे बुडबुडीबडबड मी ऐकत होतो; ती देशाबाहेरच्या चित्रपटवाल्यांच्या कानावर जाऊ नये अशी प्रार्थना करत होतो. कारण हे सगळे त्यांना कळले तर ते सत्यजितना मुळीच मानणार नाहीत; त्यांचा कचरा करतील अशी भीती मला वाटली.

सुदैवाने त्यांना हे कळले नाही. 'ब्रिटिश फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटी'ने तर गेल्या अर्धशतकातील (म्हणजे पन्नास वर्षांतील) सर्वोत्कृष्ठ चित्रपटदिग्दर्शक म्हणून सत्यजित रे यांची निवड केली आहे. त्यांचे चित्रपट पाहात असल्यामुळे रसिक म्हणून मिरवायची संधी आम्हाला मिळाली. या खास वैयक्तिक कारणासाठी आम्ही सत्यजित रे यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

आता ते हिंदी चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत : तिथेदेखील कसलीच तडजोड करायची नसल्यामुळे त्यांचा धंदा बऱ्यापैकी चालायला हरकत नाही. □

## नाट्यसंमेलनाचे छप्पन्नावे अध्यक्ष

# चंदुअण्णा पेंढारकर

१४ नोव्हेंबरला छप्पन्नावे मराठी नाट्यसंमेलन झाले. याआधी पंचावन्न मराठी नाट्यसंमेलने होऊन गेली आहेत; इतकेच नव्हे तर पंचावन्नावे गेल्या वर्षी आणि चोपन्नावे त्याच्या गेल्या वर्षी झाले होते आणि

त्या संमेलनांचे अनुक्रमे बलराम विद्याधर गोखले व गजराधर वसंत देसाई हे अध्यक्ष होते, यासुद्धा कितीतरी जगांना नव्या बातम्या वाटतील याची आम्हाला पुरेपुर कल्पना आहे. नाटकवेडा मराठी माणूस अशा गमती नेहमीच करत असतो : तो नाट्य-संस्थांची कदर करतो; पण मराठी नाट्य-परिषदेला ओळखत नाही; प्रायोगिक नाट-काच्या चार रुपये दराच्या तिकिटावद्दल कुथकुथ करतो, पण व्यावसायिक नाटकाला साडेसाताच्या जागी दहा रुपये ऐटीत देतो; झाडून सगळी नाट्यसमीक्षणे वाचतो; पण मत आपलेच खरे मानतो; एखादे नाटक पटले नाही तर ते मनगटी-पद्धतीने बंद पाडायचा, रसिक म्हणून, आपला हक्कच आहे असे मानतो; पण नाट्यगृहात कशाही आणि कितीही गैरसोयी असल्या तरी त्यांच्याकडे क्षमाशील होऊन दुर्लक्ष करणे, हे. रसिक म्हणून आपले कर्तव्य आहे अशी श्रद्धा बाळगतो; नाट्यक्षेत्रातल्या अगदी कोपऱ्या-कुपऱ्या-तल्या चिल्लरचुरमुऱ्या व्यक्तींचे पक्के स्मरण ठेवतो; पण नाट्यसंमेलनाच्या बदामपिस्त्या अध्यक्षमहोदयांची फुटकळसुद्धा दखल घेत नाही. असो !

छप्पन्नाव्या मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून चंदुअण्णा पेंढारकरांची योजना झाली, हे अत्यंत योग्य, अत्यंत उचित, आणि अत्यंत स्वाभाविक होय. प्रत्येक अध्यक्षनिवडीमुळे जसा अध्यक्षपदाचाच गौरव होत असतो तसा तो याही निवडीने झाला आहे, असे मला वाटते. एवढे सोडले तर काही बाकीच्या गोष्टीत या नाटकवाल्या मंडळींचे वर्तन अंमळ बेजबाबदार होते आहेसे दिसते : अध्यक्षपदासाठी चंदुअण्णा पेंढारकरांच्या जोडीला 'नाट्यधंदार'च्या राजाराम शिंद्यांचे नाव होते. मला वाटले, दुर्गा भागवत विरुद्ध वामनराव चोरघडे, हा सामना जसा रंगला-रंगवला तसा पेंढारकर-शिंद-सामनासुद्धा बऱ्यापैकी रंगला-रंगवला जाईल; पण कसचे काय नि कसचे काय, पाण्यामध्ये सुकला पाय ! सगळे सतत पुढे दामटणाऱ्या राजाराम शिंद्यांनी चक्क आपले नाव मागे घेतले. त्यामुळे माझी फार फंफजिती झाली. कारण 'महाराष्ट्र–टाईम्स'मध्ये, चंदुअण्णांनी नाव मागे घ्यावे, असे आवाहन करणारे पत्र मी लिहिणार होतो. असो.

अध्यक्ष पेंढारकरांना मी 'चंदुअण्णा' म्हणतो कारण ते दिसतात 'चंदु'; आणि वागतात 'अण्णां'सारखे. अर्थात अण्णांसारखे वागणे भागच आहे त्यांना. कारण ते एका मराठी नाट्यसंस्थेचे चालकमालकपालक-लालक आहेत. मराठी नाट्यसंस्था चालवण्यापेक्षा आग्नेय आशियातल्या एखाद्या देशाचे राज्य चालवणे कितीतरी सोपे असते, हे सर्वांना ठाऊकच आहे. त्यात पुन्हा चंदुअण्णा केशवराव भोसल्यांनी स्थापन केलेल्या आणि बापुराव पेंढारकरांनी गाजवलेल्या 'ललित-कलादर्श'चे वारसदार आहेत. शिवाय हे थोडे होते म्हणून की काय स्वतः स्वतंत्रपणे ते व्रतस्थ, निष्ठावंत, नाट्यसेवापरायण वगैरे आहेत.– असा पेंढारकराने काय चंदुसारखे वागायचे ? बाकी, अनेकांनी त्यांचा 'चंदु' करायचा प्रयत्न केला असला पाहिजे; नाट्यक्षेत्रातली वाडवडीलधारी मंडळी त्यांच्याशी कशी वागतात ते पाहिलेत म्हणजे मी काय म्हणतो ते खूप उमजेल तुम्हाला.

ज्या सुमारास मी जबाबदार आणि जाणकार नाट्यरसिक व्हायचा विचार पक्का केला त्या सुमारास चंदुअण्णा पेंढारकरांनी 'ललितकलादर्श'चा पडदा नव्याने रंगवून घेतला. नवा पडदा उघडून त्यांनी पहिले नाटक सादर केले : 'स्वामिनी' (लेखक : पु. भा. भावे) कंपनीचे मालक असल्यामुळे 'स्वामिनी'मधली प्रमुख भूमिका चंदुअण्णांनाच करावी लागली. ते नाटक जंतरमंतरछू होते; त्यातली चंदुअण्णांची भूमिकासुद्धा तशीच.त्यानंतर आलेल्या बाळ कोल्हटकरांच्या 'दुरिताचे तिमिर जावो' या नाटकातल्या दिगूच्या भूमिकेने चंदुअण्णांचे नाव सर्वतोमुखी झाले; 'ललितकलादर्श' नव्याने झगझगीत प्रकाशात आली. दिगूची भूमिका चंदुअण्णांच्या दिसण्याला आणि आवाजीला साजेशी होती. परंतु पुढच्या काही नाटकातल्या भूमिका फक्त त्यांच्या मालकीला आणि चालकीलाच साजेशा होत्या. त्यामुळे 'पंडितराज जगन्नाथ' (लेखक : विद्याधर गोखले) या भपकेबाज नाटकात चंदुअण्णा, पंडितराज जगन्नाथाच्या भूमिकेत पंडितराज दिगुन्नाथ दिसायचे नि काय. अर्थात महामामा पेंडसे शहाजहानच्या भूमिकेत चंदुअण्णांपेक्षाही नामांकित किंवा मामांकित दिसत होते; त्यामुळे चंदुअण्णा सुटले. स्वतः चंदुअण्णांना मात्र तसे वाटत नाही. ते म्हणतात : 'मामा त्या भूमिकेत तेजःपुंज दिसतील याबद्दल माझ्या मनात संदेह नव्हता.' (जपुन टाक पाऊल जरा : पृ. १०२) आपण स्वतः पंडितराज जगन्नाथाची भूमिका का केली याबद्दलचे चंदुअण्णांनी त्याच पुस्तकात केलेले समर्थन मुळातूनच वाचावे अशा थोर्थोर लायकीचे आहे. तसेच शहाजहानच्या भूमिकेच्या संदर्भात नटश्रेष्ठ मामा पेंडशांनी जो हुतुतुहमामा घातला त्याचे, त्या पुस्तकातले रंगीत वर्णन पाहिले की मराठी नटवर्गाबद्दलचे कौतुक उरात दाटते आणि ऊर ठणकू लागतो. असो.

'ललितकलादर्श' नव्या जोमाने सुरू करण्यापूर्वी चंदुअण्णांनी योगवशात एका चित्रपटात भूमिका केली होती : शांताराम-बापूंच्या 'अमर भूपाळी'तला बाळा कारंजकर. पुढे 'साहित्यसंघा'ने केलेल्या चि. य. मराठ्यांच्या 'होनाजी बाळा' नाटकातसुद्धा बाळाची भूमिका चंदुअण्णांकडे आली. बाळाच्या नटखट भूमिकेत चंदुअण्णांनी भलेबहार करून सोडली. मुळात मराठ्यांनी अनेकविध छटांनी बाळाची भूमिका मोठी गहिरी लिहिली आहे : आणि पेंढारकरांनी ती गहिराई रंगभूमीवर विलक्षण कौशल्याने मांडली. चंदुअण्णा म्हणजे दिगू, असे ज्या अजाणूंना मानायचे असेल त्यांना तसे खुशाल मानू दे; मी आपला जाणकार असल्यामुळे चंदुअण्णा म्हणजे 'बाळा' असे


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

मानतो. अलिकडे नव्या संचात सादर झालेल्या 'अमर भूपाळी' नाटकात प्रकाश इनामदारने रंगवलेला बाळा पाहताना डोळे हुडबडले.

पेंढारकरांनी 'जगन्नाथा'नंतर 'जयजय गौरीशंकर', 'रंगात रंगला श्रीरंग', 'पडछाया', 'बहुरूपी', 'आकाशगंगा' अशी अनेक नाटके रंगभूमीवर आणली; पण ती तशी चालली नाहीत. नव्याने घडलेल्या नाट्यसंस्थांच्या निर्मितींशी पेंढारकरांना स्पर्धा करता आली नाही. 'ललितकलादर्श' रुटुखुटु चालू राहिली. १९६८ साली संस्थेचा हीरक-महोत्सव झाला. महोत्सवात चंदुअण्णांनी चक्क विजय तेंडुलकरांचे 'झाला अनंत हनुमन्त' हे नाटक सादर केले; त्यात महत्त्वाची भूमिका केली. हीरक-महोत्सवाच्या निमित्ताने, 'ललितकलादर्शची साठ वर्षे' हा अविस्मरणीय कार्यक्रम आपल्या पु. ल. देशपांड्यांनी दिला. गेल्या काही वर्षांत, शिरगोपीकरांच्या सहकार्याने, चंदुअण्णांनी 'गीता गाती ज्ञानेश्वर', 'शाबास, बिरबल शाबास' अशी साजुक व सुशोभित नाटके बऱ्यांपैकी चालवली. अलिकडे पेंढारगोपीकरांचे डाळपाणी वेगळेवेगळे झाले असावेसे वाटते. एकूण काय, नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष व्हायला चंदुअण्णा पेंढारकर नुसते लायकच नव्हते तर मोकळेसुद्धा होते ! असो.

मराठी नाट्यसंमेलनाचे छप्पन्नावे अध्यक्ष झाल्याबद्दल आम्ही चंदुअण्णांचा जय जय करतो. मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होणे ही गोष्ट सोपी नाही हे आम्ही जाणतो. कारण अध्यक्षाला कधी आलिशान, सर्वसोयींनी सुसज्ज इमारत बांधायचे वासंतिक आश्वासन द्यावे लागते; कधी 'तर आमच्या नाटकसंस्थांना आज ना उद्या गावोगाव भटकणाऱ्या मोबाईल मद्यालयांचेच नव्हे तर फिरत्या कामयज्ञांचेही स्वरूप प्राप्त होईल' असा विद्याधर्मठ इशारा द्यावा लागतो : हे असले काहीतरी 'देणे' चंदुअण्णांना फारसे अवघड जाऊ नये, असा आमचा होरा आहे. 'जपुन टाक पाऊल जरा' (१९६८) हे, 'चि. ज्ञानेशला नाट्यमुशाफिरीतले अनुभव सांगणारे' चंदुअण्णांचे आत्मनिवेदन वाचणाऱ्या कोणालाही हा होरा सहज वर्तवता येईल. असो.

—अनंतराव

# बांगला देश

## दुसऱ्या लष्करीक्रांतीनंतर

वा. दा. रानडे

बांगला देशच्या स्थापनेस पुढील महिन्यात चार वर्षे पुरी होतील; पण जन्मापासूनच या देशाला नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींनी ग्रासल्याने विकासासाठी आवश्यक असलेले स्थैर्य व शांतता लाभलीच नाहीत. या महिन्याच्या सुरुवातीस झालेल्या लष्करी क्रांतीने तर अस्थैर्य व अनिश्चिततेत भरच पडली आहे.

तीन महिन्यांतील ही दुसरी क्रांती. या दोन क्रांत्यांत फरक काय ? त्यामागचे उद्देश काय ? या क्रांत्यांमागे केवळ वैयक्तिक सूडाच्या भावना होत्या की धोरणविषयक मतभेद होते की लष्करातील दोन गटांतील ही सत्तास्पर्धा होती ? या प्रश्नांची निश्चित उत्तरे मिळण्यास आणखी काही काळ जावा लागेल; पण उपलब्ध माहितीच्या आधारे काही निष्कर्ष काढता येतील, काही अंदाज बांधता येतील.

पंधरा ऑगस्टला झालेल्या पहिल्या लष्करीक्रांतीत बांगला देशचे संस्थापक व पहिले अध्यक्ष शेख मुजीबुर रहमान व त्यांच्या कुटुंबियांची निर्घृण हत्या करण्यात आली. मेजर दलीम व काही तरुण लष्करी अधिकारी या क्रांतीचे सूत्रधार होते. दुसऱ्या क्रांतीचे वेळी हे अधिकारी बँकॉकला निसटले व तेथून पाकिस्तान किंवा अमेरिकेकडे त्यांनी राजकीय आसरा मागण्याचा प्रयत्न केला. त्यावरून या देशांना अनुकूल अशी क्रांती त्यांना करावयाची होती असे दिसते. बांगला देशच्या नावात इस्लामी प्रजासत्ताक हे शब्द घालून त्याचे धर्मनिरपेक्ष स्वरूप नष्ट करण्याचा या अधिकाऱ्यांचा उद्देश होता. देशाचे नाव बदलल्याची बातमीही प्रथम प्रसिद्ध झाली होती; पण वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी विरोध केल्याने पूर्वीचेच नाव कायम ठेवण्यात आले. देशाचे धोरण बदलल्यास आपल्याला विरोध होईल याची पहिली जाणीव वरिष्ठ लष्करीअधिकाऱ्यांच्या या विरोधाने तरुण अधिकाऱ्यांना करून दिली. मग त्यांनी आपला पवित्रा बदलला. सर्व सत्ता आपल्या हाती एकवटण्याचे मुजीब यांचे धोरण आणि भ्रष्टाचार व चोरट्या व्यापाराच्या काही प्रकरणात त्यांनी केलेली तडजोड आम्हाला मान्य नव्हती म्हणून आम्ही क्रांती केली. पूर्वीच्या राजवटीची मूलभूत धोरणे पुढे चालू राहाणार आहेत. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद ही उद्दिष्टे यापुढेही अनुसरली जातील. पूर्वीच्या राजवटीने केलेले सर्व द्विपक्षीय आणि आंतरराष्ट्रीय करार पाळले जातील. भारताशी मैत्रीचे संबंध चालू राहतील असे जाहीर करण्यात आले. पंधरा ऑगस्टच्या क्रांतीचे सूत्रधारांचा या धोरणावर खरोखर विश्वास नव्हता. पाकिस्तान आणि चीन यांना अनुकूल अशी राजवटच त्यांना स्थापावयाची होती; पण वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना हे मान्य नव्हते. मुजीब यांनी सर्व सत्ता आपल्या हाती एकवटण्यास तेवढा या अधिकाऱ्यांचा विरोध होता. बाकीची धोरणे त्यांना मान्य होती; पण या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या पाठिंब्याशिवाय आपण सत्ता हाती टिकवू शकणार नाही हे तरुण अधिकाऱ्यांना माहीत होते. म्हणून आपल्या खऱ्या उद्दिष्टांबद्दल त्यांनी लागलीच आग्रह धरला नाही.

आपली सत्ता बळकट करण्यासाठी मेजर दलीम यांच्या गटाचा भर दहशतीवर होता. मुजीब यांच्या कुटुंबातील ४४ जणांची हत्या करून त्यांनी पंधरा ऑगस्टची क्रांती केली; तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. डाक्का तुरुंगात बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यातील चार प्रमुख नेते ताजुद्दिन अहमद, मन्सूरअली नझरुल इस्लाम आणि ए. एच. एम कमरुझ्झमान यांची त्यांनी हत्या केली यापैकी ताजुद्दिन अहमद बांगलादेशच्या हंगामी सरकारचे अध्यक्ष आणि नंतर मुजीब मंत्रिमंडळात मंत्री होते, तर मन्सूरअली पंतप्रधान होते. या चौघांच्या हत्येने देशाला हादरा बसला. या भीषण हत्येचा निषेध करणारी निदर्शने विद्यार्थ्यांनी केली. दलीम गटाच्या हाती सत्ता राहू देणे धोक्याचे आहे हे वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी ठरविले

आणि दुसरी लष्करी क्रांती करून सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. दलीमगटाच्या अधिकाऱ्यांशी संघर्ष व त्यातून होणारा रक्तपात टाळण्यासाठी या गटाच्या पंधरा अधिकाऱ्यांना देशाबाहेर निसटण्याची संधी देण्यात आली. बांगलादेशच्या एका विमानाने त्यांना बँकॉकला नेण्यात आले; पण या गटाचे प्रमुख अधिकारी निसटले असले तरी त्यांच्या बाजूचे काही अधिकारी अजूनही बांगलादेशमध्ये आहेत हे प्रतिउठावाचा जो लागलीच अयशस्वी प्रयत्न झाला त्यावरून दिसून आले. खोंडकर मुश्ताक अहमद यांनी अध्यक्षपदाचा राजिनामा दिला व नवे अध्यक्ष म्हणून मुख्य न्यायाधीश सईम यांची घोषणा झाल्यानंतर हा उठावाचा प्रयत्न झाला होता. लष्करात अजूनही दोन गट असून त्यांच्यात संघर्ष असल्याच्या बातम्या आहेत. हे लक्षात घेता परिस्थिती अजूनही अस्थिर व अनिश्चित आहे आणि आणखी उठाव–प्रतिउठाव होण्याची शक्यता नाकारता येणार नाही; पण सत्तास्पर्धेत मेजर दलीमगटाचा सध्या तरी पराभव झाला असून निर्णायक सत्ता वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांकडे आहे.

नवे अध्यक्ष सईम यांनी पार्लमेंट बरखास्त केली व पंधरा महिन्यांत निवडणुका घेण्यात येतील असे जाहीर केले. देशात कायद्याचे राज्य आणि लोकशाही प्रस्थापित करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आणखी पंधरा महिने तरी बांगलादेशात लष्करी राजवट कायम राहणार असा याचा अर्थ आहे. मुजीब व प्रमुख नेत्यांची हत्या झाल्याने नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. सबंध जनतेला विशिष्ट ध्येयाने राष्ट्रविकासाच्या कार्यक्रमास बांधून घेणाऱ्या चैतन्यदायी नेत्याचा अभाव आज बांगलादेशात प्रकर्षाने जाणवत आहे. नव्या नेतृत्वाची कसोटी येत्या पंधरा महिन्यांत लागणार आहे. लोकशाहीच्या प्रस्थापनेस पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे खुले निर्भय वातावरण. त्यासाठी हिंसा व दहशत पूर्णपणे थांबली पाहिजे. बांगलादेश-युद्धाच्या काळापासून दडवण्यात आलेले शस्त्रसाठे सरकारच्या स्वाधीन करण्यात आले पाहिजेत. हे साठे शोधून काढून जप्त करण्याची मोहीम लष्करी राजवटीने निर्धाराने हाती घेतली पाहिजे. भाषणस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य हे मूलभूत हक्क नागरिकांना मिळाले पाहिजेत. या हक्कांचा दुरुपयोग करून देशाच्या सुरक्षिततेला धोका आणला जात नाही याची दक्षता लष्करी राजवटीने जरूर घ्यावी. लोकप्रतिनिधींच्या हाती सोपविण्यासाठी पूर्वतयारीचा काळ या दृष्टीनेच या पंधरा महिन्यांच्या काळाकडे सध्याच्या लष्करी सत्ताधाऱ्यांनी पहावे.

काही बाबतीत परिस्थिती अनिश्चित व गोंधळाची आहे ती स्पष्ट करण्यात आली पाहिजे. संसदीय लोकशाहीच्या जागी एकपक्षीय अध्यक्षीय लोकशाही मुजीब यांनी प्रस्थापित केली होती आणि बांगलादेश कृषक-श्रमिक अवामी लीग हा एकच पक्ष देशात स्थापन केला होता. ही एकपक्षीय पद्धत रद्द करण्याची घोषणा पहिल्या लष्करी क्रांतीनंतरचे अध्यक्ष खोंडकर मुश्ताक अहमद यांनी केली होती; पण त्याचबरोबर देशात कोणत्याही पक्षाला कार्य करण्यासही त्यांनी बंदी केली होती. पूर्वीच्या अध्यक्षांचे हे निर्णय रद्द केल्याची घोषणा नव्या अध्यक्षांनी अजून तरी केलेली नाही. हे निर्णय चालू असतील तर लोकशाही पद्धतीने कार्य करणे अशक्य आहे. तेव्हा राजकीय पक्षांनी काम करण्यावरील निर्बंध रद्द झाले पाहिजेत. संसदीय लोकशाही की अध्यक्षीय लोकशाही, एकपक्षीय राजवट की अनेक पक्षीय राजवट या घटनात्मक प्रश्नांवर लष्करी राजवटीने कोणतेही निर्णय घेऊ नयेत. निवडणुकांनंतर जी पार्लमेंट निवडून येईल तिनेच घटनासमिती म्हणून काम करून आतापर्यंतच्या अनुभवाच्या आधारे देशाच्या विकासास आणि धर्मनिरपेक्ष लोकशाही समाजवादाचे ध्येय गाठण्यास अनुरूप अशी नवी घटना तयार करावी. बांगलादेशात स्थिर लोकशाही प्रस्थापित करण्याचा हाच मार्ग आहे. □




कथा

# कल्पिताहूनही विचित्र

सौ. उज्ज्वला पिंपळखरे

शनिवारची सकाळची नऊ-सव्वानऊची वेळ. ऑफिसला जाण्यासाठी तयार होण्याच्या गडबडीत मी होते. हातात पर्स आणि पायांत चपला सरकवीत मी मनगटावरच्या घड्याळाला किल्ली देत आमच्या स्वयंपाकाच्या राधाबाईंना सांगत होते, 'वालांना चांगले मोड आलेत हं! संध्याकाळसाठी सोलून ठेवा! पंधरा तारीख आहे आज! रामाकडून आज रेशन आणलंच पाहिजे! टेबलावर पेपरवेटखाली मी आत्ताच पंचवीस रुपये ठेवले आहेत ते, पिशव्या आणि कार्ड त्याला आठवणीनं द्या आणि हो, आज एम्. ई. एस्. ची माणसं येतील आपल्या मागल्या व्हरांड्याला जाळी बसवायची आहे म्हणून. ती व्हरांड्याचं माप घेऊन जातील !'

'आई, आपल्याला इथं येऊन चार दिवस झालेत; पण अजून शाळेत नाव घालायला गेलो सुद्धा नाही आपण! सांग ना कधी जायचं?' माझी सहा वर्षांची मोठी मुलगी शीला मला विचारत होती. धाकटी नीला नुसतीच ऐकत होती.

'बाबा उद्या येतील ना मुंबईहून! मग सोमवारी तुमच्या शाळेचं काम करतील. आता मी जाते. तुम्ही थोडा वेळ गोष्टीची पुस्तकं वाचीत बसा हं! मग दुपारी जेवण झालं की आपल्या घरात खेळायचं. माझी चांगली पातळं नेसून भातुकली खेळायची नाही. बरं, येऊ आता? टाटा!' असं म्हणत मी पायऱ्या उतरून फाटकाबाहेर आले. फाटकाबाहेरच एका गाईला उभी करून एक तरुण मराठमोळा बाई माझ्याकडे मोठ्या आशेने पहात उभी होती. 'अव बाय, शनवारचा चारा घाला ना गायीला!' तिनं आपल्या खांद्यावर पिशवीवजा गाठोड्यातून हिरवा चारा माझ्यासमोर धरला. घाईत असूनही मी जराशी रेंगाळले. पर्स उघडून त्यातलं चार आण्यांचं नाणं काढून बाईच्या हातावर ठेवलं आणि मुलींना हाक मारली, 'शीला, अग, गाईला चारा द्यायला या!'— आणि मी चालू लागले.

नंतरच्या दोन-तीन शनिवारीही नवाच्या सुमाराला याच प्रसंगाची थोड्याफार फरकानं पण उजळणी व्हायची. एका शनिवारी मी त्या गायीला आणणाऱ्या बाईला म्हटलं, 'काय ग, आमच्या इथं तू शनिवारी येतेस. परवा गुरुवारी तुला मी स्टेशनजवळ पाहिलं, तेव्हा तू तिथं गुरुवारचा चारा घाला असं म्हणत होतीस! एकेका भागात एकेका वारी हिंडून गायीवर पैसे मिळवायचे, हो ना?' ती बाई यावर काय उत्तर देणार? ती जराशी हसत मला म्हणाली, 'अव बाय, तुमी हतं नव्यानं ऱ्हायला आलात. तुमच्यापूर्वी हतं रीतावेबी ऱ्हायची. तिलाबी शनवारची साला नसायची. म्हणून म्या हतं शनवारचा चारा घेऊन येत व्हते! फुढं रीताबेबी लई शीक पडली. थोड्या म्हैन्यांनी बरी झाली, पन तिच्या डाव्या पायात लोखंडी बूट घालावा लागला. मंग ती या म्होरल्या वरंड्यात बसून ऱ्हायची. म्या दिसल्यावर मला पुकारायची, आपल्या हातानं गायीला चारायची!' ती बाई आपलं बोलणं मध्येच थांबवून आमच्या व्हरांड्याकडे पहात राहिली. तिच्या नजरेतली रीतावेबी अजूनही तिथंच होती.

मी तिला चार आण्यांचं नाणं पुढं केलं आणि चालू लागले. बसस्टॉपवर पोचल्यावरही मला तो मघाचा प्रसंग आठवत होता.

बदलीनिमित्त खडकीला क्लवरोडवरच्या अठरा नंबरच्या घरात रहायला येऊन आम्हाला थोडेच दिवस झाले होते. आम्ही इथं येण्यापूर्वी आमच्या रहायच्या जागेत कोणी मेजर मर्चंट नावाचे ऑफिसर रहात होते. त्यांना रीता नावाची एक छोटी मुलगी होती. कारण फाटकावर, अंगणातल्या बकुळीच्या खोडावर, घराच्या पायऱ्यांवर, भिंतीवर रीता मर्चंट असं नाव जागजागी आम्हाला वाचायला मिळायचं.

खरं म्हणजे रीता मर्चंट नावासारखं एक नाव होतं! उषा, माया, माधवी या नावांना साजेल असं एक छोटंसं ते नाव होतं; पण इथं रहायला आल्यापासून तर त्या नावाशी माझी सारखीच गाठ पडायला लागली. ह्यांच्या मिलिटरी नोकरीमुळं मी कित्येक गावं आणि घरं बदलली. आम्ही रहायला येण्यापूर्वीची ऑफिसरमंडळी आणि त्यांची नावं आम्ही तिथं रहायला आल्यानंतरही आमच्या कानांवर येत. हेपण तसंच एका मुलीचं नाव आहे झालं'... असं मनाशी मी म्हणत असतानाच माझी बस आली आणि मी आत चढून बसले. वेळ घालविण्यासाठी म्हणून मी हातातलं मासिक चाळू लागले; पण मासिकवाचनात माझं लक्ष लागेना. माझ्या पुढच्या सीटवरचा एक प्रवासी अस्पष्ट आवाजात गुणगुणत होता. "यादों की बारात." बाकीचे सारेजण त्याची गुणगुण ऐकत होते... "तिकिट प्लीज!" बसकंडक्टरनं वेगळाच सूर लावला. शेवटी एकदाची बस थांबली त्या शेवटच्या स्टॉपला! मीही उतरू लागले... इतर प्रवासी उतरत होते; पण पुढच्या सीटवरचा तो आणि ती तशीच बसून राहिली होती. कंडक्टर न राहवून म्हणाला, 'दिलीप और सायराबानू उतर जायिए!' बाकीच्या प्रवाशांनी उतरत असताना बसकंडक्टरच्या बोलण्याला सहास्य दाद दिली.

बसपाशीच एक भिकारीण तान्ह्या मुलाला कडेवर घेऊन उभी होती. 'ईश्वर तेरा भला करेगा", "तुलां खूप पैका मिलल", "साब, पैसा दो!'... आज तिचं नशीब चांगलं असावं. कधी भिकाऱ्याला पैसे न देणारी मी तिला चार आण्यांचं नाणं देऊन पुढे झाले.

ऑफिसात गेल्यावर इकडेतिकडे न पहाता मी सरळ माझ्या टेबलखुर्चीकडेच वळले आणि टेबलावरच्या फाइलीत डोकं खुपसलं. थोड्या वेळानंतर कामतसाहेबांनी मला त्यांच्या केबिनमध्ये बोलावलं आणि दिल्लीला जी दोन-चार पत्रं जायला हवी होती ती गेली का, कधी गेली वगैरे चौकशी केली. मिसेस रावतचं खरं हे काम होतं; पण ती रजेवर होती त्यामुळं माझ्यावर आलं. ही पत्रं आणि इतर दोन-तीन कामं संपवेपर्यंत दीड वाजला.

आज अर्धा दिवस रजा, त्यामुळे मी लगेच ऑफिसबाहेर पडले; पण लगेच घरी जाता आलं नाही. आमच्या ऑफिसातली मिसेस नेरूरकर माझ्याबरोबर आली. ' तुम्ही इथं नवीन आलात का ? ' तिनं विचारलं.

' मी बडोद्याला होते; पण तिथून ह्यांची बदली इथं झाली त्यामुळं मीपण बडोद्याहून माझी इथं बदली करून घेतली. इथं आम्ही खडकीला रहातो. ' मी सांगितलं.

' माझं घर पुणेस्टेशनजवळ आहे. आपली बस आता पुणेस्टेशनवरूनच जाईल. माझ्या घरी चलता का ? चला ना ! ' तिनं आग्रह केला.

मी तिच्या घरी गेले. तिथून नंतर थोडं शॉपिंग करून बसनं खडकीला आले. बस खडकीच्या क्लबापाशी आली तेव्हा पाच वाजले होते. उन्हं उतरली होती. क्लबाशेजारच्या मोकळ्या जागेत पिंपळाच्या पारावर आयालोक आणि छोटी छोटी मुलं यांचा घोळका होता. त्यांच्याकडे पहात पहात मी हळूहळू पावलं टाकीत जाऊ लागले. सकाळचा उत्साह आता मंदावला होता. चालणंही मंदावलं होतं.

समोरून कुणी एका ऑफिसरची बायको चार वर्षांच्या मुलीला बरोबर घेऊन जात होती. चेहेऱ्यावरून बाई पंजाबी वाटली.

' न्युली पोस्टेड है क्या ? ' तिनं विचारलं.

' हां हां ! क्लबरोडपर अठरा नंबर के क्वार्टर्समें हम रहते हैं ! ' मी म्हणाले.

' अच्छा अच्छा ! रीता बेबीके घरमें–' तिनं खुलासा केला.

' हमारे बबलीकी और रीताकी गहरी दोस्ती थी ! रीताकी मम्मी–मिसेस मर्चंट बहोत अच्छी थी ! अब आप मेरे घर भी आना हां ! ' तिनं मला येण्याचं आमंत्रण देत सांगितलं, ' मैं मिसेस बात्रा, बीस नंबरके क्वार्टर्स में रहती हूँ ! ' ती चालू लागली... मी कोपऱ्यावर वळले.

' तुम्ही इथे नवीन आलात का रहायला ? ' कोपऱ्यावर कुणी महाराष्ट्रीय ऑफिसर रहात असावे. तिथल्या फाटकापाशी ती महाराष्ट्रीय ऑफिसरची बायको मला पाहून पुढे येऊन बोलू लागली, ' तुम्हाला एक वॉर्निंग देते. अत्ता ती मिसेस बात्रा बोलली ना तुमच्याशी ? तिच्याशी तुम्ही फारसा संबंध येऊ देऊ नका. सुरुवातीला ती तुमच्याशी खूप चांगलं वागेल, तुम्हाला चहाला–जेवायला बोलावील, तुमची खूप कामं करील; पण मग मात्र इतकी वाकड्यात शिरेल की तुमच्या यजमानांवर नाही नाही ते संशय घेईल ! चार लोकांत तुम्हाला रहाणं कठीण करील ! मी आपली धोक्याची सूचना देऊन ठेवते. राग मानू नका हं ! तुमचं आडनाव काय ? नोकरी करता वाटतं ?'

'अं ? हो ! ' गुजराथ फर्टिलायझर्स ' मध्ये आहे मी ! माझं नाव मिसेस खरे ! सांगितलंत हे चांगलं केलंत ! राग का म्हणून येणार ?' मी म्हणाले आणि तिचा निरोप घेतला.

मिसेस बात्रा कशी वागते यापेक्षाही मला जाणवलं ते हे की ती सुद्धा स्तुती करते त्यावरून रीता किंवा तिची मम्मी–मिसेस मर्चंट किती सुस्वभावी असाव्यात ! साऱ्यांनाच रीताची किती आठवण यायची ! शेजाऱ्यापासून ते दारी येणाऱ्या फेरीवाल्यांनाही रीताबद्दल माया वाटायची.

दारी मोसंबीचं टोपलं घेऊन येणारा फळवाला मला बहुधा रविवारी भेटायचा. फळं देताना तो सांगायचा,' बाईसायब, मागं हतं रीताबेबी नावाची लई गोड पोरगी न्हायची. माज्याकडनं त्यी मानसं लई फ्रुट इकत घ्यायचे. तिच्या आजारपनात तर म्याच मुसंब्याचं करंडं आनून द्येत व्हतो. '

' अरे वा, मग आता आम्हालापण चांगली फळं आणून देत जा ! इथं आमच्या बागकामासाठी आम्हाला एखादा माळी हवाय. तुझ्या माहितीत असला कोणी तर बघ ! '

चार दिवसांनी त्या फळवाल्यानं बरोबर एकजण आणला. 'बाईसायब, हा शंकर माळी. पूर्वी हा हतंच कामाला व्हता ! '

' काय रे इथं कोणकोणत्या घरी तू माळीकाम करतोस ? तू राहतोस कुठं ? ' मी विचारलं.

' अव बाय, म्या पूर्वी हतंच मर्चंटसायबाकडं कामाला व्हतो. सामनेच्या कलपात (क्लबात) म्याच गुलाबाचं ताटवं लावलेले हायेत ना ! नदीपल्याडच्या गोऱ्या सायबाकडं पन मीच काम करतो. मर्चंटसायबाच्या बागेला दर वरीसाला पयल्या नंबराचं बक्षीस लागायचं ! समदं मला ठावं हाय. काम कसं करावं ह्यो मला सांगाया नको ! दुसरी बात ही हाय की ह्यो आवारात पघा एक साप हाय. त्येच्या अंगावर सफेत सफेत केस हायेत. त्येच्या वाटंला आपुन जायचं नाय म्हंजे त्यो पन काई बी करनार नाय ! पन मर्चंटसायबानं त्या सापाला मारायचा बेत केला. सापाची शेपटीच तुटली. त्याचा परिणाम पघा की ! रीताबेबीचं पाय ग्येलं. लोखंडी बूट डाव्या पायात घालावा लागला ! '

' आम्हाला आवारात ४ कुंड्या आणि समोरचं बकुळीचं झाड याखेरीज काही नको. आवार अगदी स्वच्छ ठेव. समोरचा हा ताटवा काढून टाक ! '

माळीबुवा माझ्याकडे पहातच राहिला. ' अवो, म्या हतं, अक्षी सुंदर बाग फुलवली. जाईची कमान चडवली, आता तुमी सांगता ह्यो सारं शाप कर ! रीताबेबीच्या मम्मीला रोज गुलाबं लागायची.'

' हे बघ, सांगितलं ते कर ! जास्त बोलू नकोस ! ' मी त्याला दम दिला.



VP-735

तो कुदळ, फावडं घेऊन त्याच्या कामाला लागला. काम करून गेला. संध्याकाळी हे घरी आल्यावर मी त्याना सांगितलं, 'मघाशी इथं पूर्वीच्या मर्चंटच्या वेळचा माळी आला होता. आता तो आपल्याकडेही बागकाम करणार आहे. तो सांगत होता की इथं आवारात एक पांढऱ्या केसांचा साप वावरतो.'

'अस्सं होय ? मग आमच्या ॲम्युनिशन फॅक्टरीतली चार माणसं आणून त्या सापाला ठोकतो.आपल्या मुली आवारात खेळायच्या!'

'नको, नको ! माळ्यानं सांगितलंय् की तो साप या वास्तूचा रक्षणकर्ता आहे. त्याला काही करायचं नाही. त्याला मारलं ना तर तो आपल्यावरच उलटतो !'

'अग, तू कोणत्या काळात वावरतेस ? एका आर्मी-ऑफिसरची तू बायको आहेस आणि अशा खुळचट कल्पनांवर विश्वास ठेवतेस ?'

मी गप्प बसले. त्या दिवशी तो विषय तितकाच राहिला. मनातून का होईना मला आमच्या आवारातल्या त्या सापाबद्दल कुतूहल होतं; पण विचारायचं कोणाला त्या सापाबद्दल ? एक तर माझ्या शेजारी फारशा ओळखी झाल्या नव्हत्या. शेजारच्या सतरा आणि एकोणीस नंबरच्या क्वार्टर्समध्ये रहाणारे ऑफिसर बदली झाल्यामुळे जागा सोडून गेले. त्यामुळे माझं सापाबद्दलचं कुतूहल मनात तसंच जागं होतं. एवढं मात्र झालं की रोज मला रीताबद्दलची माहिती कुणाकुणानं मिळत रहायची. रोजच तिचं नाव माझ्या कानांवर पडायचं. त्या टीचभर अक्षराच्या नावात इतकं गोंडस, लाघवी व्यक्तिमत्त्व सामावलं होतं की रीता, तिची माहिती हाच माझा रिकामपणाचा छंद बनला.

सुरुवात कशी झाली ? मला वाटतं एका लहानशा प्रसंगानं ! एका संध्याकाळी ऑफिसातून येताना ह्यांनी एका तरुण ऑफिसरला आमच्या घरी आणलं. ते दोघं गप्पा मारीत बसले असताना मीही तिथं गेल्यावर ह्यांनी ओळख करून दिली, "अग, हा लेफ्टनंट खन्ना. आमच्याच ऑफिसात आहे. पूर्वीच्या मेजर मर्चंटचा हा टूआय सी होता. आता हा सांगत होता की तो पूर्वी या घरी मर्चंट फॅमिली रहायची तेव्हा खूपदा यायचा.'

'खूपदा कशानं, अगदी रोज यायचा ना ! तीन वर्षं होतील पुढच्या महिन्यात, मला खडकीला पोस्ट होऊन ! मी इथं आलो तेव्हा माझं घरापासून दूर रहाणं हा पहिलाच प्रसंग होता. माझं आईवडिलांचं घर देहरादूनला आहे. घराची, भावावहिणींची खूप आठवण यायची आणि इथं मेसमध्ये रहायचा कंटाळा यायचा; पण मेजर मर्चंटनी मला खूप चांगली वागणूक दिली. ते मला रोज इथं घेऊन यायचे.'

'मग, अजूनही आमच्याकडे येत जा की ! मर्चंट नसले म्हणून काय झालं ?' मी म्हणाले.

'सो नाइस ऑफ यू !' खन्ना मला म्हणाला. त्याची नजर समोरच्या कोचावरून शेजारच्या जेवायच्या खोलीकडे, तिथून पुढल्या जाळीदार व्हरांड्याकडे वळली. 'मेजर मर्चंटची सात-आठ वर्षांची मुलगी रीता त्या तिथे व्हरांड्यात बसलेली असायची. तिची मम्मी पलीकडेच खुर्चीवर बसलेली असायची. हातात लोकरीचं विणकाम ! मला अजूनही त्या दोघी असल्याचा भास होतोय्.' खन्ना त्या आठवणीनं प्रसन्नपणानं हसत होता.

तेवढ्यात आयानं चहाचा ट्रे माझ्यासमोर आणून ठेवला. मी कपात चहा गाळत असताना सहज विचारलं, 'मर्चंट म्हणजे गुजराथी का ?'

'नाही, ही फॅमिली तरी पारशी होती. मेजर रुस्तुम मर्चंट आणि मिसेस फ्रेनी मर्चंट' खन्ना म्हणाला.

ह्यांनी बिस्किटांची बशी खन्नांसमोर धरली.

त्यातलं एक बिस्किट घेऊन तो सांगत होता,

'मिसेस मर्चंट अतिशय चांगल्या स्वभावाची आहे हं ! तिच्याइतकी एफिशियेंट बाईच पाहिली नाही मी ! ती स्वतः सोशॉलॉजो घेऊन डबल ग्रॅज्युएट झाली आहे, शिवाय बॅडमिंटनची चॅंपियन ! तिच्या वागण्यात, बोलण्यात इतका गोडवा होता. कधीही जा, सदा प्रसन्न ! सारा वेळ वाचन आणि बागकाम करायची. घरात काम स्वतः करायची. मी पंजाबी. मला त्यांचं पारशी पद्धतीचं जेवण आवडायचं नाही फारसं ! हे पाहून ती आमचे आलूभटुरे, राजमा, तन्दुर की रोटी बनवायचं शिकली. तिनं बनवलेले मेथी परोठे, आलूभटुरे तर मी इतक्या वेळेला खाल्ले की गणनाच नाही ! तिच्याकडची पार्टी म्हणजे एक अपूर्व मेजवानी असायची !'

'परवा ती मिसेस टंडन भेटली होती ना आपल्याला, ती सुद्धा मिसेस मर्चंटच्या चवदार पदार्थांची स्तुती करीत होती.' मी ह्यांना मध्येच म्हणाले.

'मागे एकदा गंमतच झाली. इथं ब्रिगेडियर लोबो टेंपररी ड्युटीवर आला होता. मेसमध्ये उतरला होता. मर्चंट आणि हा ब्रिगेडिअर एकाच शाळेतून 'डॉन बास्को 'तून सीनिअर केंब्रिज पास झालेले, जुन्या ओळखीचे होते. म्हणून मेजर मर्चंटनी ब्रिगेडियरला डिनरचं आमंत्रण दिलं. मला पण त्या वेळेला बोलावलं होतं. मी संध्याकाळी जरा लौकर आलो. इथं अगदी जय्यत तयारी होती. सगळीकडे अगदी लख्ख होतं. चील्ड (chilled) बीअर तयार ठेवली होती. ठरल्या वेळी ब्रिगेडियर आणि त्यांच्याबरोबरचा एक यंग ऑफिसर असे दोघेजण इथं आले. त्या यंग ऑफिसरनं मला हळूच एका बाजूला सांगितलं की 'ब्रिगेडियर लोबोला स्कॉच लागतेच. दुसरी-तिसरी नको !' मी हळूच मेजर मर्चंटना सांगितलं. पाहिलं तर त्यांच्याजवळ ब्लॅक नाइट (व्हिस्की) होती. आता काय करावं ? पार्टीचा जरा बेरंग होतोय् असं वाटू लागलं. मी भरर्कन माझी स्कूटर बाहेर काढली आणि माझ्या मेसमध्ये गेलो. तिथे दिवे गेले होते, त्यामुळे काळोख होता. बारमन कुठं बाहेर गेला होता. मेस-हवालदारजवळ सेलरच्या किल्ल्या होत्या. त्याच्याबरोबर मी सेलरमध्ये गेलो. टॉर्चच्या प्रकाशात स्कॉचची बाटली उचलली आणि दौडत मेजर मर्चंटच्या घरी आलो.'

'स्कॉच पाहून मर्चंटला सुटल्यासारखं वाटलं. मग पार्टी छानच रंगली. सारं काही आनंदात पार पडलं. दुसरे दिवशी मी त्यांच्या घरी गेलो. मेजरनी मला स्कॉचच्या दोन बाटल्या भेट म्हणून हातात दिल्या. मिसेस मर्चंटनं त्या लेबलवर लिहिलं होतं, 'कालच्या यशस्वी पार्टीबद्दल सप्रेम भेट !'

आम्ही यावर तिघंही हसलो !

ह्यांना मिसेस मर्चंट या विषयाचा कंटाळा आला असावा. 'मी जरा बाहेर जाऊन येतो हं !' हे मला म्हणाले.

'अच्छा, मी पण आता निघू का सर ? मला आज 'सी. एम्. ई 'त जायचंय. अच्छा,

थँक्स हं चहाबद्दल !' तो उठत म्हणाला. झरर्कन स्कूटरवरून तो तीरासारखा गेला-सुद्धा !

त्यानंतर खन्ना आमच्याकडे मधनं यायचा. आम्हा सर्वांशी खूप मोकळेपणानं गप्पा करायचा. माझ्या मुलींसमोर नाना नकला करून दाखवायचा. एकदा आमच्या शीलाची सकाळी शाळेची बस थोडक्यानं चुकली होती. ती एवढंसं तोंड करून माघारी येत होती. कोपऱ्यावर खन्ना स्कूटरवरून जात होता. त्यानं थांबून तिला विचारलं आणि लगेच तिला तिच्या शाळेत पोचविलं. मला तरी हे कसं कळलं ? संध्याकाळी मी ऑफिसातून घरी आल्यावर ! खन्ना, आज तुझी खूपच मदत झाली हं शीलाला ! उद्या लंचला येशील का ?' मी म्हणाले.

'उद्या मला २ दिवसांच्या टेंपररी ड्यूटी-साठी मुंबईला जायचंय् ! नाही तर आलो असतो !' तो म्हणाला.

त्यानंतरही आम्ही त्याला कितीदा तरी जेवणाचं आमंत्रण दिलं असेल. कधी सण म्हणून तर कधी मुलींचा वाढदिवस म्हणून ! पण दरवेळेला त्याने आमच्याकडच्या जेव-णाचं आमंत्रण आमची मनं न दुखवता टाळलं !' भाभीजी, मी इतक्या वेळेला अगदी हक्कानं इथं येतो. मग जेवायचं आणखी वेगळं आमंत्रण कशाला ?' असं म्हणून तो इकडेतिकडे पहात गप्प बसायचा.

एकदा खन्नाला आणि ह्यांनाही मेसमध्ये डिनरचं आमंत्रण होतं. मेस-नाइट होती, त्यामुळं मी घरीच होते. ठरल्याप्रमाणं खन्ना ह्यांना स्कूटरवरून नेण्यासाठी आमच्या घरी संध्याकाळी आला. त्यानं घातलेल्या सूटाचा स्टील ग्रे रंग, सूटाची शिलाई फारच सुरेख होती.

'सूटाचं कापड इंपोर्टेड आहे का ?' मी विचारलं.

'बहुतेक इंपोर्टेडच असावं ! गेल्या वर्षी समोरच्या क्लबमध्ये ३१ डिसेंबरला मोठा बॉल होता. त्या वेळेला एक कॉंपिटिशन होती. जी पेअर रात्री नऊपासून सकाळी सहापर्यंत फ्लोअरवर नाचत राहील तिला बक्षीस ! बाईला कांजीवरम् साडी आणि तिच्या पार्ट-नरला सूटाचं कापड बक्षीस ! त्यात मला हे कापड मिळालं !'

'असं का ? मग तर फारच छान !' हे म्हणाले.

'तुमची पार्टनर कोण होती ?' कारण खन्ना तर चोवीसएक वर्षांचा बॅचलर होता.

'मिसेस मर्चंट माझी पार्टनर होती. तिच्या नाचण्यात अशी ग्रेस होती. खन्ना म्हणाला... थोड्याच वेळात हे आणि खन्ना स्कूटरवरून बाहेर पडले.

खन्नाशी बोलताना एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती. त्याच्याशी बोलताना विषय कोणताही असला तरी शेवटी त्याचे बोलणे मिसेसच्या मर्चंटवर येऊन थांबायचं ! त्या दिवशी असंच झालं. मी खन्नाला म्हणाले, 'उद्या आमच्या शीलाचा वाढदिवस आहे. उद्या तरी आमच्याकडे लंचला येशील का ?'

'वा वा येईन की ! भाभीजी, गेल्या वर्षी इथं काय झालं सांगू ?' मिसेस मर्चंट मला म्हणाली होती,' अरे, रीताचा वाढदिवस आठ सप्टेंबरला आहे. तुझा कधी ?'

मी म्हणालो, '१५ सप्टेंबरला.'

मग असं कर, दोन्ही दिवशी लंचला आमच्या घरी ये !' मी म्हणालो, 'वा, वा ! मी तुम्हाला तिघांना लंच देणार आहे, १५ सप्टेंबरला !' 'बाय चान्स, १५ सप्टेंबरला रविवार होता, त्यामुळं मी त्या तिघांना कँपमधल्या 'टू कॉइन्स'मध्ये सुरेख लंच दिलं ! लंचही छान झालं आणि तो दिवसही छान गेला. दुसरे दिवशी रीताला सडकून ताप भरला. तेव्हापासून मी 'टू कॉइन्स' मध्ये गेलोच नाही !'

'एखादे वेळेला येतो ताप; पण 'टू कॉइन्स'ने काय केलंय् ?' मी बोलले.

पण खन्नाचं माझ्या बोलण्याकडे लक्ष नसावं. तो सांगत होता,' रीता इतकी निरोगी मुलगी होती हो. तिची मम्मी पण तिच्या तब्येतीची इतकी छान देखभाल घ्यायची; पण 'टू कॉइन्स'च्या लंचनंतर रीताला अगदी हाय फीव्हर आला. चार दिवस आम्ही तिघं सतत आळीपाळीनं रीताच्या बेडपाशी बसत होतो. चौथे दिवशी डॉक्टरांनी सांगितलंच की रीताला पोलिओ झाला आहे. तिलाही डावा पाय टाकताना त्रास व्हायचा. रीताला पोलिओ झाला असं ऐकल्यावर मिसेस मर्चंट तर एकदम कोसळलीच ! तिची तडफड तडफड पाहून आम्हालाच वाईट वाटायचं. 'पोलिओ'वर जे काही छापील लेख, पुस्तकं प्रसिद्ध होती ती सारी मिसेस मर्चंटने वाचून काढली, 'पोलिओ'चा अभ्यास केला आणि स्वतः रीताला ती नाना मसाजव्यायाम करायला लावायची. एवढंच नाही तर तिनं अमेरिकेतल्या दोघा-तिघा सर्जनशी पत्र-व्यवहार करून रीताच्या पायाचं ऑपरेशन करण्यासंबंधी खटपट सुरू केली. तिकडून सर्जननी पण तिला कळविलं की रीताच्या केसमध्ये सर्जरीचा फारसा उपयोग व्हायचा नाही !'

मी तर रोजच येत होतो. 'अंकल, टेल मी अ स्टोरी !' ही तर तिची रोज मागणी असायची. किती तरी जनावरांच्या, माणसांच्या, राजेराण्यांच्या गोष्टी सांगून संपल्या. एकदा मेजर मर्चंट कुठे तरी बाहेरगावी गेले होते. संध्याकाळी मी रीताच्या पलीकडे बसून गोष्ट सांगत होतो. रीताला झोप लागली म्हणून ती पलंगावर गोष्ट ऐकता ऐकताच झोपली.

'मिसेस मर्चंट उदासपणानं बाहेर पहात होती. ती अचानकपणानं मला म्हणाली, 'तुझ्या स्टोरीत बरं असतं रे. राजाला राज-कन्या भेटते आणि त्यांचं लग्न होतं!'

'मग तुमचा विरोध कुठं आहे ? मी विचारलं.

'काय करू, मला रीताची काळजी आहे. तिचं लग्न कसं व्हायचं ? पायात तर केवढा दोष आहे!' ती हलक्या आवाजात म्हणाली होती.

'डोंट वरी मिसेस मर्चंट ! काळजी करून तरी तुमचा प्रश्न सुटेल का ? अगदी लिहू ठेवा. रीताचं लग्न चांगल्या तऱ्हेने होईल

'काय म्हणतोस ? परत म्हण !' ह म्हणाली.

'तिचं लग्न चांगल्या तऱ्हेनं होईल. करीन तिच्याशी लग्न !' मी हसत म्हणाल

'पुरे तुझी थट्टा !' ती पण माझ्या ्या हसली होती. खन्ना हे सांगत असताना वस देखील खूप हसला. एक

'बरं बरं ! मग ठरलं हं, उद्या च्या लंचला आमच्या इथं यायचं हं खन्नानंतर म्हणाले.

पण दुसरे दिवशी आमच्या लं असता तर तो खन्ना कसला ! ' आमची एक इन्क्वायरी-केस सुरू त्यामुळं मला आज लंचला येणं तरी सोबत शीलासाठी बर्थडे- आहे. उद्या पण मला येता येगून प्रसि असं पत्र व सुंदर भावलीन विडॉरना

ऑर्डलीच्याबरोबर आमच्याकडे धाडली.

पाच-सात दिवसांनंतर एक दिवस खन्ना आमच्या घरी आला. 'आज वेळ झाला वाटतं?' मी जरा मुद्दाम टोचून म्हणाले.

'भाभीजी, कालपर्यंत ती इन्क्वायरी चालू होती ना! आज सकाळी जेव्हा निकाल लागला तेव्हा मी आलो. बरं, पण एक विनंती आहे मेजरसाहेबांना! ते आले नाहीत का अजून?' त्यानं विचारलं.

'मला विनंती कशाबद्दल? तुम्ही दोघं रोज ऑफिसात एकमेकांना भेटता की!' मी म्हणाले.

'भाभीजी, माझी इथं तीन वर्षं पुरी झालीत. आता माझं पोस्टिंग ड्यू आहे. तुम्ही स्वत: मेजरसाहेबांना सांगा ना—नुकतीच जबलपूरच्या अॅम्युनिशन फॅक्टरीत एक कॅप्टनची व्हेकन्सी झाली आहे. माझं प्रमोशनही ड्यू आहे. मला हे जबलपूर मिळालं ना तर फार उत्तम होईल! मला अॅम्युनिशनमध्येच स्पेशलाईज्ड् व्हायची इच्छा आहे. माझ्यासाठी एवढं कराल ना?' त्यानं आर्जवी स्वरात म्हटलं.

शीलाशी जरा गप्पा करून तो बाहेर पडला.

रात्री हे घरी आल्यावर मी खन्नाची विनंती ह्यांना सांगितली. 'अग, त्याला जबलपूर का हवंय माहीत आहे? तो म्हणतो तसं स्पेशलाईज्ड् वगैरे काही नाही. मेजर रोजवेंट जबलपूरला आहे म्हणून खन्ना जातोय्. मिळलं!'


फत! मोफत! मोफत!

# पांढरे डाग

चे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिव- पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग गतो. आमचे औषध अतिप्रभावी ताचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. करून, एक औषधाची कुपी ट्रायल- मध्ये दिली जाते. रोगाचे सविस्तर टेच, संपर्क साधून त्वरित औषध ता क.

ची चिकित्सा केन्द्र १०५

तरीसराय (गया)


कुणामुळं काम झालं माहीत नाही पण खन्नाला जबलपूरचं पोस्टिंग मिळालं. खन्नाच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. आमची उडती भेट घेऊन त्यानं जॉइनिंग पीरिअड संपेपर्यंत वाट न पहाता तातडीनं खडकी गाव सोडलं!

जबलपूरला गेल्यावर त्याची दोनतीन पत्रं आम्हाला आली. त्याचं पहिलं पत्र तिथं पोहोचल्याचं होतं. नंतरच्या एका पत्रात होतं, मेजर मर्चंटच्या घरी ती सारी चहा घेत होती. डायनिंग टेबलावर मिसेस मर्चंटनं प्लास्टिक मॅटवर गरम दुधाचं भांडं ठेवल्याबरोबर खालची प्लास्टिक मॅटही तापली आणि त्यातून दोन तीन स्पार्क निघाल्या. हे प्लास्टिक काही तरी वेगळं आहे असं वाटून मी त्या प्लास्टिक-वर संशोधन करू लागलो. अॅम्युनिशनमध्ये आपल्याला प्लास्टिकचा उपयोग करता येईल यावर मी खूप संशोधन करीत आहे. यश येईल असं वाटतं...त्यानंतरच्या एका पत्रात त्यानं लिहिलं होतं, 'दिल्लीला एक सेमिनार भरणार आहे 'अॅम्युनिशन' तर्फे, त्यात मी माझा पेपर वाचणार आहे, अॅम्युनिशन फॉर पीस!'

मला त्याचा हा पेपर—'अॅम्मुनिशन फॉर पीस' आमच्या 'अॅम्युनिशन जर्नल'च्या अंकात वाचायला मिळाला. पेपरची भाषा फार सोपी आणि मुद्देसूद विचारांनी रेखीव अशी वाटली. ह्यांनी त्याला अभिनंदनाचं पत्र पाठवलं.

त्यावर त्याचं उत्तर आलं, 'संशोधन माझं असलं तरी पेपरांची भाषा, पॅरेग्राफची मांडणी मिसेस मर्चंटची आहे. ते श्रेय तिला द्यायला हवं!'

या पत्रानंतर मात्र आमचा पत्रव्यवहार पूर्णपणे बंद झाला. आमची बदली खडकीहून रांचीला झाली. रांचीहून रामगड, पानागड, कानाकिनारा अशा विविध गावी बदल्यांमध्ये जवळजवळ १० वर्षांचा कालखंड गेला. या दहा वर्षांत आम्हाला नवनवी माणसं भेटली, नवनवे भलेबुरे अनुभव मिळाले. या सर्वांचं गाठोडं मनाच्या तळाशी साठवत मीही खूपसं पाहिलं, शिकले. माझ्या मुलीपण मोठ्या झाल्या. शीला सीनिअर केंब्रिज पास झाली आणि नीला दहावीत गेली असताना ह्यांची बदली बेंगलोरला झाल्याचं लिहून आलं.

मला आनंद वाटला. मुलींच्या शिक्षणा-साठी मला काळजी करायला नको. मोठ्या उत्साहानं मी ह्यांच्याबरोबर बेंगलोरला गेले. मुली नंतर आल्या. सुदैवानं घरही लौकर मिळालं. एकंदर बस्तान चटकन बसलं.

एकदा मी आणि हे गावाबाहेरच्या मॉडर्न कॉलनीत कुणाला तरी भेटायला गेलो असताना एकजण आमच्या समोरच येऊन उभा राहिला. 'हॅलो, हॅलो! ओळखलं का मला सर?' त्यानं आनंदून विचारलं.

आम्ही त्याच्याकडे पहातच राहिलो. त्याची छोटीशी टोकदार दाढी, डोळ्यांवर गॉगल यामुळं चटकन ओळख पटेना. त्याच्याही ते लक्षात आलं असावं. त्यानं डोळ्यांवरचा गॉगल काढल्यावर मी लगेच ओळखलं! 'अरे वा, हा तर खन्ना! सध्या इथं आहे वाटतं?'

'सर, तुम्ही पण इथंच आलात ना? व्हॉट अ कोइनसाइडन्स? मी इथल्या आर. एन. डी. मध्ये पोस्ट झालोय्. इथलं रिसर्च डिपार्ट-मेंट नुकतंच सुरू झालंय्! बिल्डिंग फक्त तय्यार झाली आहे, बाकी काही नाही! बरं, पण माझ्या घरी चलता का? इथंच मॉडर्न कॉलनीत माझं घर आहे!'

'आँ, घर? म्हणजे लग्न कधी झालं?' ह्यांनी विचारलं.

'म्हणजे, तुम्हाला माझं इन्व्हिटेशन मिळालं नाही? कानकिनाऱ्याच्या पत्त्यावर मी पाठवलं होतं. चलता ना माझ्या घरी? तुम्हाला माझी वाइफ चांगली माहीत आहे!' तो म्हणाला.

'अस्सं? ती कशी काय?' मी विचारलं.

'तुम्ही खडकीला अठरा नंबरच्या क्वार्टर्स-मध्ये रहात होता, तिथली हो! रीता मर्चंट! तिच्याशी मी लग्न केलं गेल्या वर्षी!'

'अस्सं होय? आता लक्षात आलं!' मी म्हणाले. आम्ही तिघं चालू लागल्यावर तो सांगत होता, 'कर्नल आणि विशेषत: मिसेस मर्चंटशी माझा इतका स्नेह होता की त्या स्नेहाखातर मी हे लग्न केलं!'

'कर्नल मर्चंट आहेत कुठं सध्या?' ह्यांनी विचारलं.

'ते झांबियाला आहेत. पुढच्या वर्षी ते इकडं म्हणजे भारतात परत येतील!' खन्नानं दुरूनच दाखवलं. 'ते पहा कोपऱ्यावरचं माझं घर!'

□ □

जन्मशताब्दीनिमित्त विशेष लेख

## पौर्वात्य मन असलेला पाश्चात्य कर्मयोगी

# डॉ. अल्बर्ट श्वायत्झर

प्रा. राम बिवलकर

विषुववृत्ताच्या दक्षिणेला पूर्वीच्या फ्रेंच विषुववृत्तीय आफ्रिकेतील गेबन भागातील ओगोळे नदीकाठचे लॅम्बरेने नामक खेडे आज जगविख्यात ठरले असले तरीही अजून ते प्राचीनच वाटते. घनदाट जंगल, सुसाट धावणारी नदी, जमिनीला टेकलेले ढग एकत्र वितळल्यासारखा तो परिसर भासतो. हिरव्या धुक्यातून वाफ उसळत असावी तशी तिथली हवा वर्षभर असते. अजूनही तिथली बहुसंख्य काळी वस्ती सुधारणेपासून खूपच दूर असल्याचे जाणवते.

पण या लॅम्बरेने गावाला डॉ. अल्बर्ट श्वायत्झर नामक एका आधुनिक काळातील संताची कर्मभूमी होण्याचे भाग्य लाभले. डॉ. श्वायत्झर फक्त आपल्या काळातीलच नव्हे तर सर्व काळातील मोठा माणूस होता. तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, संगीत, इतिहास, नीतिशास्त्र अशा विविध विषयांत त्याची बुद्धी अप्रतिहतपणे चाले. वयाच्या तिशीनंतर रंगल्या-गांजल्यांची प्रत्यक्ष सेवा करण्याच्या दृष्टीने हा गृहस्थ वैद्यकशास्त्र आणि शल्यशास्त्र शिकला आणि रुग्णसेवेला त्याने आपले आयुष्य वाहून घेतले. तरीही अनेक विषयांवरील ग्रंथांवर त्याची लेखणी स्रवत राहिली. सतराव्या शतकातील श्रेष्ठ संगीतकारांच्या रचनांचे अंतरंग जसे ती उलगडून दाखवी, तद्वत् जीझस् ही ऐतिहासिक व्यक्ती होती हे संशोधनाने सिद्ध करी. संस्कृतीच्या व सुधारणेच्या इतिहासावर ती प्रकाश टाकी तद्वत् पियानोच्या रचनेवरही अधिकारवाणीने चर्चा करी. दीनदुबळ्यांच्या अपंगांच्या, अनुकंपेने ती भारावून जाई आणि गटेसारख्या गुरुस्थानी मानलेल्या व्यक्तीच्या गुणगानात ती रंगून जाई. धर्मांधर्मांच्या तत्त्वज्ञानाचा ती तुलनात्मक अभ्यास करी आणि आत्मचिंतनातून ती जीवनाचा अर्थ लावी. पियानोच्या पट्टयांना श्वायत्झर यांच्या बोटांचा स्पर्श झाल्याबरोबर स्वर्गीय संगीताची बरसात घुमू लागे.

विलक्षण तरल बुद्धीचा हा माणूस अतिशय संवेदनाशील होता, जिद्दखोर होता म्हणूनच हाती घेईल त्या कामाचा तो ठाव घेई आणि त्यात पारंगत होई. विशिष्ट विषयात ज्यांनी जीवने ओतली होती त्यांच्यापेक्षाही त्या विषयांचे अंतरंग श्वायत्झर यांना समजले होते. त्यामुळे जंगलच्या या डॉक्टराला सौंदर्यशास्त्र समजत असे. विषुववृत्तीय प्राणिशास्त्रातही गम्य असे. शेतीप्रमाणे मानववंशशास्त्रही त्याला ठाऊक होते. तो उत्तम सुतार होता, गवंडी होता, पशुवैद्य होता. जहाजे-होड्या बांधण्याची कला त्याला अवगत होती. तो दंतवैद्य होता. स्त्रीरोगचिकित्सकही होता. इमारतींच्या बांधकामांचे नकाशेही तो काढी. वास्तु-शास्त्रज्ञ म्हणूनही काम करी. यांत्रिकी विद्येप्रमाणे औषधी-उत्पादन आणि बागकाम यांतही हा माणूस प्रवीण होता.

डॉ. श्वायत्झर म्हणजे पृथ्वीतलावर अवतरलेले एक 'नवल'च होते. या 'नवला'ला १९५२ सालचे 'नोबेल पीस् प्राईझ' देऊन जगाने आपला सन्मान करून घेतला! १९५५ साली इंग्लंडने या जर्मन डॉक्टराला 'ऑर्डर ऑफ् मेरिट' अर्पण करून आपले गुणग्राहकत्व सिद्ध केले. १९४९ सालच्या त्याच्या अमेरिकन दौऱ्यात, सारी अमेरिका त्याला डोक्यावर घेऊन नाचली!

१४ जानेवारी १८७५ रोजी फ्रान्स आणि जर्मनी यांच्या सीमावादाच्या कात्रीत सापडलेल्या अलसेस परगण्यातील गनबाश नामक गावी एका ख्रिस्ती धर्मोपदेशकाच्या पोटी डॉ. अल्बर्ट श्वायत्झर यांचा जन्म झाला. प्रकृतीने रोगी, बुद्धीने सामान्य असे हे मूल. लिहिणे, वाचणे शिकायलाही त्याने फार वेळ खाल्ला. श्वायत्झरच्या पुढील आयुष्याच्या पार्श्वभूमीवर हे सारे विचित्रच वाटते. संगीतात मात्र त्याला उपजतच गती होती. वयाच्या सातव्या वर्षीच त्याने एक गाणे रचले आणि पियानोवर ते वाजवायचा प्रयत्न केला. ऑर्गनच्या पेड्ल्सना पाय पोचू लागल्याबरोबर हा ९ वर्षांचा मुलगा चर्चमधील पियानोवादकाच्या गैरहजेरीत त्याची जागा घेऊ लागला!

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण चालू असता ग्रीक, लॅटिन आणि पुढे हिब्रू भाषांवर त्याने प्रभुत्व संपादन केले आणि ही शिदोरी बरोबर घेऊन तो वयाच्या अठराव्या वर्षी स्ट्रासबर्ग विद्यापीठात दाखल झाला. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या ग्रंथामागोमाग कॅण्टच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू झाला. धर्मशास्त्र आणि तत्त्वज्ञान या दोन्ही विषयांत डॉक्टरेट मिळवण्यासाठी हा मुलगा रात्रीचा दिवस करीत होता. या काळात विख्यात ऑर्गनवादक मि. विडॉर यांचा एक कार्यक्रम ऐकण्याची श्वायत्झरला संधी मिळाली. विडॉर यांच्या बोटातील जादुगिरी पाहून श्वायत्झर वेडावून गेला. कार्यक्रमानंतर विडॉरना भेटून तो धीटपणे म्हणाला,

'मी ऑर्गन वाजवून दाखवतो; ऐकाल का?'

'तू ऑर्गन वाजवणार? शिकलास कुठे?'

'घरीच.'

'काय वाजवशील?'

'श्वायत्झर अभिमानाने म्हणाला, 'अर्थात् बाख्!'

१६८५ ते १७५० या काळात संगीतरचनाकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या जर्मन संगीतज्ञाचे नाव या मुलाने घेतलेले पाहून विडॉरना

आश्चर्य वाटले. ते कौतुकाने बाजूला झाले. म्हणाले—' वाजव ! '

श्वायत्झर स्टुलावर बसला. बाखची एक रचना तन्मयतेने वाजवू लागला. त्या मुलाच्या बोटांची ती फिरत, स्वरांचे ज्ञान, विशिष्ट जागा दाखवण्याचे कसब पाहून विडॉर आश्चर्यचकित झाले. त्याची पाठ थोपटून म्हणाले,

' तुला खूपच ' येते; पण आणखी शिकायचे असले तर माझ्याकडे येत जा ! '

' तुम्ही शिकवाल ? '

' जरूर ! '

पुढली सहा वर्षे श्वायत्झर काण्ट वाचीत होता. प्रबंध तयार करीत होता. धर्मशास्त्रावरचीही टिपणे काढीत होता. विडॉर यांचेकडे शिकत होता. पैसे मिळवण्यासाठी ऑर्गनवादनाचे कार्यक्रमही करू लागला होता. दिवसाचे २४ तास त्याला अपुरे पडत. वयाच्या २४ व्या वर्षी, रात्रीच्या रात्री जागून श्वायत्झरचा कांटच्या तत्त्वज्ञानावरील प्रबंध तयार झाला ( १८९९ ). स्ट्रासबर्ग विद्यापीठाने त्याला डॉक्टरेट बहाल केली. ही डॉक्टरेट पदरात पडल्याबरोबर श्वायत्झरने आपले लक्ष धर्मशास्त्रावर केंद्रित करून तोही प्रबंध एका वर्षात पुरा केला ( १९०० ). या प्रबंधाबद्दल विद्यापीठाने श्वायत्झरना ' लायसनशिएट 'ची पदवी बहाल केली. जर्मन विद्यापीठात ती डॉक्टरेटपेक्षा वरची मानली जाई.

श्वायत्झर आता धर्मशास्त्रातील अधिकारी पुरुष बनल्याने त्यांना स्ट्रासबर्गच्या चर्चमधील धर्मोपदेशकाची जागा देण्यात आली. चर्चमध्ये ' सरमन ' देण्याची आवड असल्याने श्वायत्झर यांनी ती जागा मोठ्या आनंदाने स्वीकारली. थोड्याच दिवसांत श्वायत्झरच्या रविवारच्या सरमन्स्ना अलोट गर्दी जमू लागली. धर्मप्रवचनातही हृदय ओतल्याचे ते प्रतीक होते.

१९०३ साली स्ट्रासबर्ग विद्यापीठातील धर्मशास्त्र शिकविणाऱ्या कॉलेजचे प्राचार्यपद त्यांच्याकडे चालून आले. वयाच्या केवळ अठ्ठाविसाव्या वर्षी आपल्याच कॉलेजचा प्राचार्य होण्याचा मान श्वायत्झरना मिळाला. प्राचार्य म्हणूनही ते विद्यार्थीप्रिय आणि प्राध्यापकप्रिय झाले तरी रविवारची सरमन्स् चालूच होती.

बुद्धिजीवी तरुणाला हवे ते सारे तरुणवयात प्राप्त झाले होते. दोन डॉक्टरेटस् पदरी पडल्या होत्या. संगीतज्ञ म्हणून कीर्ती मिळाली होती. कॉलेजचे प्राचार्यपद, नदीकाठी सुंदर बंगला, लठ्ठ पगार, सालस सहकारी, प्रेमळ विद्यार्थी, पूर्ण स्वातंत्र्य, मन मानेल तो व्यासंग करता यावा इतके समृद्ध, प्राचीन अन् भव्य ग्रंथालय हाताशी, बर्लिन आणि पॅरिस येथील विद्वान आणि कलाकार यांच्याशी गाढ मैत्री ! सारी सुखेच जणू हात जोडून उभी होती !

पण या शांत सुखासीन जीवनाचा डॉ. श्वायत्झरनी तीनच वर्षांत त्याग केला. १३ ऑक्टोबर १९०५ रोजी त्यांनी आपल्या प्राचार्यपदाचा राजीनामा विद्यापीठाकडे पाठवून दिला आणि त्याच विद्यापीठातील वैद्यक महाविद्यालयाच्या डीनसमोर एक विद्यार्थी म्हणून ते हजर झाले ! विद्यापीठाच्या दुसऱ्या एका कॉलेजचा प्राचार्य विद्यार्थी म्हणून दाखल होण्याचा अर्ज घेऊन समोर उभा राहिलेला पाहिल्यावर डीनमहाशयही चक्रावून गेले ! तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र या विषयांतील गाढा विद्वान, संगीतशास्त्रातील जाणकार कलाकार वयाच्या तिसाव्या वर्षी, प्राचार्यपद सोडून सहा वर्षांचा वैद्यकीय शिक्षणक्रम पुरा करायला निघाला हा शुद्ध वेडेपणा होता. मित्र, नातेवाईक साऱ्यांनीच श्वायत्झरना मूर्खात काढले; पण श्वायत्झरनी तो निर्णय पूर्ण विचारांतीच घेतला होता. त्यांच्या मनाची घडणच अगदी वेगळ्या प्रकारची होती. अनुकंपा आणि कृतज्ञताबुद्धी यांचे विलक्षण मिश्रण त्यांच्या स्वभावात लहानपणापासूनच मुरले होते. लहानपणी त्यांची आई, आपल्या सर्व मुलांना झोपताना एक प्रार्थना म्हणायला सांगे, ' देवा, सर्व मानवांना सुखाने झोपू दे ! ' पण श्वायत्झर प्रार्थना करी, ' देवा, सर्व जीवमात्रांचे रक्षण आणि कल्याण कर. त्यांना दुरितांपासून दूर ठेव आणि त्यांना शांततेने झोपू दे ! ' घरची सुस्थिती असतानाही, वर्गातील गरीब मुलांच्या अंगावरील रकटी पाहून, श्वायत्झर हळहळे आणि आपणही जुनेपाने फाटके कपडे वापरी. जीवहत्या, पिळवणूक, क्रूरता पाहिली की तो गलबलून जाई. प्राचार्यपदाची सुस्थिती आल्यावर त्यांच्या मनाने घेतले की, ' आपले जीवन हे केवळ आपल्यासाठीच आहे असे आपण मानायचे का ? येशूने जे स्वतः सुखी आहेत त्यांनी इतरांचा दुःखभार कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे म्हटले नाही का ? ज्याला पुष्कळ मिळाले आहे त्याने इतरांना पुष्कळ द्यायला नको का ? ' श्वायत्झर अशा मनःस्थितीत असता, एका मासिकात प्रसिद्ध झालेले पॅरिस कॅथॉलिक मिशनचे एक जाहिरातवजा आवाहन त्यांच्या पाहण्यात आले. " आमच्या आफ्रिकेतील रुग्णालयासाठी डॉक्टर्स हवे आहेत. आमच्या मदतीला कुणी धावून न आल्यास आम्हाला नाइलाजाने रुग्णालय बंद करावे लागेल आणि हजारो निग्रो रुग्णाईत रोगराईला नाहक बळी पडतील ! तेव्हा डॉक्टरांनी धावून यावे. रुग्णसेवा ही परमेश्वराची सेवा आहे ! ' येशूच्या वचनांची व्याख्यानांतून नुसती पोपटपंची करण्यापेक्षा आपण कृती केली पाहिजे, असे डॉक्टरांच्या मनाने घेतले; पण त्याकरता डॉक्टर होणे जरूर होते. ' मनःपूतम् समाचरेत् ' मानून डॉक्टर वयाच्या तिसाव्या वर्षी परत विद्यार्थी बनले !

वैद्यकाचा अभ्यास चालू झाला; पण बायबलवरील संशोधन चालू होते. गुरूची आज्ञा म्हणून, बाखच्या संगीताचे मर्म विशद करणारा ग्रंथ लिहिण्याचे काम, विडॉर यांच्या इच्छेवरून १९०२ पासून चालू होते ते पुरे करायचे होते. आता लठ्ठ पगार नव्हता. मग वैद्यक-शिक्षणाचा खर्च भरून काढण्यासाठी ऑर्गनवादनाचे जलसे करणे क्रमप्राप्तच होते. रात्री परत जागू लागल्या. विषयाच्या तळाशी जाण्याच्या वृत्तीमुळे वाचन संपत नव्हते. ' वर्गातील घोकंपट्टी-क्लबाने परीक्षा पास व्हायचे असेल तर भरमसाठ वाचीत सुटण्यापेक्षा संभाव्य प्रश्नांची घोकंपट्टी केली पाहिजे असा गिल्ला करून मला त्या क्लबात खेचले नसते तर वर्ष पदरात पडणे कठीण होते ' असे श्वायत्झरनी आपल्या दैनंदिनीत लिहिले आहे.

आतापर्यंत तत्त्वज्ञान, इतिहास, धर्मशास्त्र, संगीत अशा विषयांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता; पण तो सारा बुद्धीचा आणि तर्कशक्तीचा खेळ होता. त्यातली कुठलीही प्रमेये, प्रमाणे अगर सिद्धांत सिद्ध करण्याचा प्रश्न नव्हता. वैद्यकात ' प्रत्यक्ष ' प्रमाणांशी गाठ होती. विज्ञानाची एक नवी कक्षा इथे आत्मसात होत होती; पण पंचमहाभूतांच्या अव्याहतपणे चालू असलेल्या व्यापाचा उलगडा

विज्ञानाच्या साहाय्याने झाला, तरी त्याचा तळ गाठणे विज्ञानाने शक्य होणार नाही. मी कोण ? कुठून आलो ? कुठे जाणार आहे ? माझा अन् या विश्वाचा संबंध काय ? या प्रश्नांची उत्तरे विज्ञानाने मिळणार नाहीत अशी याच अभ्यासातून डॉ. श्वायत्झर यांची खात्री झाली. त्यामुळे तत्त्वज्ञानावरची त्यांची निष्ठा दुणावली.

१९०५ ते १९१२ या काळात ही नवी तपःसाधना करून वयाच्या अडतिसाव्या वर्षी श्वायत्झर एम. डी. झाले. आफ्रिकेत जायचे म्हणून लगेच उष्णकटिबंधातील रोगांचाही खास अभ्यास त्यांनी पुरा केला आणि पॅरिसमिशनला आपली आफ्रिकेत जायची तयारी आहे असे कळवले. मिशनकडून पगार न घेण्याचा व हॉस्पिटलचाही सर्व खर्च स्वतः भागविण्याचा विचारही त्यांनी मिशनला कळविला होता; पण मिशनकडून लवकर उत्तर येईना म्हणून डॉक्टर पॅरिसला गेले. तिथे मिशतच्या मौनाचे कारण त्यांना समजले.

बायबल-संशोधनावरील लेखनात 'येशू ख्रिस्त ही ऐतिहासिक व्यक्ती आहे; पण प्रेषिताचे आगमन, सृष्टीचा प्रलय इत्यादी प्रचलित यहुदी मतांना जमेस धरून त्याने आपले उपदेशकार्य केले असल्याने बायबलात अनेक असंभाव्य गोष्टींचा अंतर्भाव झाला आहे' असे मत डॉक्टरांनी प्रस्थापित केले होते. त्यामुळे कॅथॉलिक मतवादी डॉक्टरांवर नाराज होते. पॅरिसमिशन तर कॅथॉलिकांचे ! श्वायत्झर यांच्या प्रामाणिकपणाबद्दल, विद्वत्तेबद्दल मिशनच्या सभासदांना आदर होता; पण अशा माणसाला मिशनतर्फे ते आफ्रिकेत पाठवायला तयार नव्हते ! तेव्हा डॉक्टर सभासदांच्या घरोघरी गेले. 'मी तिथे डॉक्टर म्हणून जातोय. तिथे मी माझ्या मतांचा उच्चारही करणार नाही. धर्मोपदेशही करणार नाही अशी हमी दिल्यावर मिशन तयार झाले !

वास्तविक स्विस मिशन डॉक्टरांना आफ्रिकेत पाठवायला एका पायावर तयार होते; पण डॉक्टर व्हायची स्फूर्ती पॅरिसमिशनने दिली होती. शिवाय रोगग्रस्तांची सेवा करण्यासारखे मानवतावादी कार्य करताना धर्म, देश वा भाषा यांसारख्या बाबी कुणाच्या आड येऊ नयेत असा डॉक्टरांचा आग्रह होता. पॅरिसमिशनची समजूत काढण्यात वरेच दिवस वाया गेले; पण डॉक्टर जिंकले ! डॉक्टर अलसेस प्रांताचे रहिवासी. म्हणजे त्यांचे राष्ट्रीयत्व जर्मन. त्यांची डिग्रीही जर्मन; पण ते आफ्रिकेत ज्या भागात कामासाठी जाणार होते ती वसाहत होती फ्रेंचांची. त्यामुळे त्यासाठी फ्रेंच सरकारची अनुमती आवश्यक होती; पण विडॉरप्रभृती स्नेहीमंडळींमुळे ती फारशी यातायात न करता मिळाली.

मग हॉस्पिटलसाठी आर्थिक निधी जमवण्याच्या कार्याला डॉक्टर लागले. मित्रांनी, चाहात्यांनी स्ट्रॅसबर्गमधील प्राध्यापकमंडळींनी डॉक्टरांच्या मानवतावादी कार्याला मोठ्या प्रमाणावर सक्रिय पाठिंबा दिल्याने आवश्यक तेवढे द्रव्य खूपच लवकर गोळा झाले.

१९१२ सालीच डॉक्टरांचे लग्न झाले. त्यांची पत्नी स्ट्रासबर्ग विद्यापीठातील इतिहास-विभागप्रमुखाची कन्या होती. पतीच्या कार्यात सहभागी होता यावे म्हणून तिने नर्सिंगचा कोर्स पुरा केला. डॉक्टर हॉस्पिटलसाठी औषधे, उपकरणे इतर साहित्य जमवीत होते. पेट्या भरीत होते. त्या बंद करीत होते.

सर्व तयारी झाल्यावर १९१३ साली गुडफ्रायडेच्या दिवशी त्यांनी आफ्रिकेत जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. वाटेत पॅरिसला सेंट सुल्पिस चर्चमध्ये विडॉर यांच्या ऑर्गनवादनाचा कार्यक्रम त्यांनी ऐकला. आफ्रिकेत निबिड अरण्यात आपला नवा मार्ग शोधायला डॉक्टर निघाले होते. तिथे एकांतातील अनेक रात्री त्यांना रातकिड्यांच्या कर्णकर्कश आवाजाच्या सोबतीत घालवायच्या होत्या. जीवनातले संगीत जणू संपले होते. तत्त्वज्ञान वा धर्मशास्त्र यावर बोलायचे नव्हते. मदतीकरता युरोपमधील मित्रांवर अवलंबायचे होते. विद्वान, कलाकारांची संगत तुटणार होती. गुरूच्या सहवासातील ती संगीतमय रात्र म्हणूनच मोठी भाग्यवान होती !

१४ एप्रिल १९१३ या दिवशी, पोर्ट जेंटिल या बंदरावर आपल्या पत्नीसमवेत डॉक्टरांनी आफ्रिकेच्या भूमीवर प्रथम पाऊल ठेवले. जीवनाच्या अंतापर्यंत ते पाऊल तिथेच रोवून ठेवायचे होते. पॅरिसमिशनचे कार्यकेंद्र नदीमुखाने आत पोचल्यावर लागणाऱ्या लॅम्बरेने नामक ठिकाणी होते. त्यामुळे डॉक्टर तडक लॅम्बरेनेला पोचले. तिथे सभोवार निबिड अरण्य होते. नदीकाठच्या थोड्या सपाट जागी एक जुनाट चंद्रमौळी बंगली व त्याच्या शेजारी असलेली बदके ठेवण्याची एक पडकी झोपडी तिथे पूर्वी माणसे राहात होती याची साक्ष देत होती ! अजगर, गोरिला, माशा, भुंगे, तांबड्या मुंग्या आणि इतर किती तरी वन्य पशुपक्ष्यांचे ते वसतिस्थान होते ! नदी सुसरींनी भरलेली होती. या साऱ्यांना हाकलल्याशिवाय, झाडे तोडल्याशिवाय एक इंचही जागा वस्तीसाठी मिळणे दुरापास्त होते. दुसरा कुणी असता तर ती भयाण जागा पाहूनच त्याने तिथून पळ काढला असता; पण डॉक्टरांना नाउमेद होणे ठाऊक नव्हते. निराशा हा शब्दच त्यांच्या कोशात नव्हता !

चंद्रमौळी बंगली दवाखाना झाली. तिथेच सामानाची कोठी, राहाण्याचे बिऱ्हाड, पावसात रुग्णांना ठेवण्याचे वॉर्ड सर्व काही. शेजारच्या झोपडीत ऑपरेशन टेबल बसले. मिशनचे डॉक्टर आले याची आवई आसमंतात घुमली आणि चार दिवसांत त्या ठिकाणी रोग्यांची झिम्मड उडाली. रोग्यांचे कण्हणे, कुंथणे, रडणे, ओरडणे, त्यांच्या रक्ताळलेल्या जखमा, त्यांच्या भेसूर मुद्रा हे सारे पाहून डॉक्टरांचे हृदय पिळवटून गेले. किती दुःख जगात आहे ? इतके दुःख जगात असू शकेल असे त्यांना कधी वाटलेही नव्हते. रोगी तरी किती प्रकारचे ? कुणी हिवतापाने हुडहुडत होता, कुणाला झोपेचा आजार होता, कुणी कुष्ठाने बेजार होता. कुणाची हगवण थांबतच नव्हती. कुणाला अल्सर, कुणाला हत्तिरोग, कुणाला न्यूमोनिया, कुणाला हार्निया, कुणाला हृदयविकार ! प्रत्येक रोगाचे शेकडो रोगी पण त्यांच्यावर उपचार करणारे फक्त दोनच हात !

## आफ्रिकेत निबिड अरण्यात आपला नवा मार्ग शोधायला डॉक्टर निघाले....

डॉक्टर कामाला लागले. पत्नी मदत करीत होती. जोसेफ नावाचा मोडकेतोडके फ्रेंच बोलणारा एक निग्रो वॉर्डबॉय आला. शंभर शंभर मैलांवरून रोगी येत होते. इतक्या दूर यायचे म्हणजे त्यांचा कुटुंबकबिला बरोबर असायचा. प्रत्येक कुटुंब आपापला स्वयंपाक स्वतंत्र करी. कारण या मागासल्या काळच्या लोकांतही जातीपातींचे स्तोम भलतेच होते. कुणीही दुसऱ्या जातीच्या माणसाच्या हातचे जेवायला तयार नसे. विषप्रयोगाची धास्ती वाटे त्याला. इतक्या चिरडीला गेलेल्या संबंधांची ही माणसे सांभाळणे, त्यांचे भांडणतंटे मिटवणे, त्यांना राहायला आणि स्वयंपाक करायला जागा पुरवणे, वेळी शिधा देणे या महाभयंकर समस्या डॉक्टरांपुढे उभ्या होत्या.

रोग्यांची अन् त्यांच्या कुटुंबियांची सोय करण्यासाठी जोसेफला घेऊन डॉक्टर आजूबाजूच्या वस्त्यावस्त्यांवरून फिरले. कुणाला दादाबाबा करून, कुणाला काही भेटवस्तू देऊन, कुणाला तुमच्या वस्तीवर मी कुणाला औषध देणार नाही अशी धमकी देऊन, त्यांनी झोपड्या उभारण्यासाठी झाप, बांबू असे साहित्य मिळवले. मजूर मिळवले. रोग्यांबरोबरच्या धडधाकड माणसांना चुचकारून कामाला लावले. त्यांतून झोपड्या उभ्या झाल्या. रोग्यांची व त्यांच्या बरोबरच्या माणसांची सोय झाली. पुरेशी औषधे त्यांनी बरोबर आणली होतीच.

जंगलातल्या त्या रुग्णालयाला आता आकार येऊ लागला. डॉक्टर सकाळी रोगी तपासणे, औषधे देणे, जरूर त्या शस्त्रक्रिया करणे ही कामे करीत. दुपारी झोपड्या उभारणीच्या कामावर देखरेख करीत. संध्याकाळपर्यंत त्यांचा जीव मेटाकुटीला येई. तरीही रात्रीचे चिंतन, नवनव्या विषयांचे वाचन चालूच असे.

रुग्णालयात येणारे रोगी आणि त्यांच्याबरोबरची माणसे, श्वापदे म्हणावीत अशा अवस्थेची असत. त्यांच्या मूर्खपणापुढे अगदी हात टेकायची पाळी यायची. सार्वजनिक रुग्णालयासारख्या ठिकाणी कसे वागावे हे त्यांच्या गावीही नव्हते! व्यक्तिगत स्वच्छताही त्यांना ठाऊक नव्हती. कानीकपाळी ओरडूनही ही माणसे सांगितल्याप्रमाणे औषधपाणी करीत नसत. कित्येकदा बाहेरून लावायला वा चोळायला दिलेली औषधे ती पिऊन टाकीत आणि पिण्याची औषधे अंगाला चोपडीत! कित्येक वेळा आठवडाभराचे औषध एकदमच पिऊन टाकीत. दुसऱ्याला विषप्रयोग करायला तर प्रत्येकजण टपलेला असे! त्यांची भांडणे म्हणजे डॉक्टरांची डोकेदुखी होती. गैरसमज करून घेण्याची त्यांची वृत्ती भयानक होती. औषधोपचारासाठी फार उशिरा आलेल्या रोग्यालाही डॉक्टर नाकारीत नसत. बिचाऱ्याचे मरते दिवस तरी सुखात जावेत म्हणून प्रयत्नांची शिकस्त करण्याची त्यांची वृत्ती होती; पण त्या लोकांना ह्याचे काय? एकदा एक आसन्नमरण रोगी डॉक्टरांच्या ऑपरेशनटेबलावरच मेला; तर या लोकांना वाटले डॉक्टरानेच त्याला मारले. कुणी तरी अफवा उठवली, 'डॉ. श्वायत्झर म्हणजे माणूस नसून माणसाच्या वेषातील बिबळ्या वाघ आहे!' झाले, साऱ्या आसमंतात ही बातमी पसरली. रोगी पळून गेले. आजूबाजूचे लोक बिबळ्याची शिकार कशी करावी याचा विचार करू लागले. या माणसांचा हा भलता समज दूर करता करता आणि स्वतःचा जीव वाचवता वाचवता डॉक्टरांच्या नाकी नऊ आले!

खऱ्याखोट्याचा विधिनिषेध नसलेली काही माणसे! साध्या कुरापतीतून एकमेकांच्या जिवावर उठत; पण डॉक्टर या साऱ्या प्रकाराकडे क्षमा दृष्टीने पाहात. स्वतःला क्रूसावर चढवून हातापायात खिळे ठोकून मारणाऱ्या मंडळींविषयीही अपार अनुकंपा येशूला वाटली होती. 'परमेश्वरा, या मंडळींना क्षमा कर. आपण काय करतो आहोत याची जाण त्यांना नाही!' असेच तो महात्मा म्हणाला नव्हता का? डॉक्टर त्याच येशूचे अनुयायी होते. अशा भयंकर परिस्थितीतही वर्षअखेरपर्यंतच्या पहिल्या नऊ महिन्यांत डॉक्टरांनी दोन हजार रोग्यांवर उपचार केले! तहान, भूक, आराम, करमणूक या गोष्टी त्यांच्या गावीच नव्हत्या. त्या भागातील धर्मोपदेशक मंडळींना डॉक्टरांची मते अमान्य होती. तरीही डॉक्टरांशी त्यांचा सलोखा निर्माण झाला. युरोपमधून मित्रमंडळी औषधांचा पुरेसा पुरवठा करीत होती.

अशा वेळी पहिले महायुद्ध सुरू झाले!

डॉक्टर जर्मन. रुग्णालय फ्रेंच वसाहतीत! युद्ध सुरू होताच श्वायत्झर पतिपत्नींना फ्रेंच सरकारने त्यांच्या बंगल्यात स्थानबद्ध केले. त्यांनी कुणाला भेटायचे नाही, कुणाशी बोलायचे नाही, रोगी तपासायचे नाहीत. आजूबाजूला अपार दुःख दिसत असता असे निष्क्रिय राहाणे डॉक्टरांना मान्य नव्हते; पण इलाज नव्हता. वैज्ञानिक शोधापायी युरोपात झपाट्याने जे परिवर्तन होत होते त्यातून अत्यंत संकुचित असा राष्ट्रवाद निर्माण होणार आहे आणि त्यातून जग महायुद्धांच्या खाईत फेकले जाणार आहे याची मनाशी खूणगाठ बांधली गेली होती. तिचे प्रत्यंतर आले होते.

तीन महिन्यांच्या या सक्तीच्या सुटीत डॉक्टरांनी 'सुधारणेचे तत्त्वज्ञान' नामक आपला ग्रंथ लिहायला घेतला. स्थानबद्धता तीनच महिने टिकली. कारण डॉक्टरांच्या काळच्या दोस्तांनी आणि विडॉर प्रभृती फ्रेंच मान्यवरांनी त्याकरता खटपट केली होती; पण आता औषधांचा ओघ आटला होता. रुग्णालयातील बरेच लोक लढाईसाठी उचलले होते. डॉक्टरांना आणि त्यांच्या पत्नीला जादा रोगी घेणेही कठीण होते. दुःखात सुख एवढेच की डॉक्टरांनाच लष्करी रुग्णालयाकरता उचलण्यात आले नाही!

युरोपमध्ये होत असलेल्या संहाराच्या बातम्या ऐकून डॉक्टर अस्वस्थ होत. माणसांनी माणसांची अशी कत्तल का करावी? काळी, निरक्षर मंडळी जेव्हा असे प्रश्न करीत—

'ओगांगा (डॉक्टर), तुम्ही गोरे लोक मेलेली माणसे खात नाही ना?'

'नाही. माणसांनी माणसांना खाणे वाईट आहे.'

'मग इतकी असंख्य माणसे तुम्ही मारता तरी का? फुकट अन्नाचा नास!'

तेव्हा डॉक्टरांना मरणप्राय दुःख होई. कसे सांगावे या माणसांना की केवळ दुष्टपणामुळे हा संहार चालला आहे! केवळ आत्मसंमोहातून हे युद्ध आहे. कसे पटवावे यांना की या प्रकारालाच सुधारणा किंवा संस्कृती म्हणतात! या विचारांनी रात्रीच्या रात्री जाग्या राहात. मस्तक विचारांनी भणभणून जाई. लेखन आग ओकी. पॅरिसहून येताना मित्रांनी भेट दिलेल्या छोट्या ऑर्गनवरची बोटे पिसाटपणे धावू लागत!

१९१७ सालच्या पावसाळ्याअखेर डॉक्टरांना व त्यांच्या पत्नीला

युद्धकैदी म्हणून फ्रान्समध्ये हलविण्यात आले. 'सुधारणेचे तत्त्वज्ञान' या ग्रंथाचे हस्तलिपित एका अमेरिकन धर्मोपदेशकाकडे ठेवून डॉक्टर बोटीवर चढले. आपला प्राणदाता आपल्याला सोडून जात आहे म्हणून साऱ्या काळ्या मंडळींनी आकांत केला; पण सोजिरांनी त्यांना हुसकून लावले. बोट दूर निघाली. डॉक्टरांच्या सामानाच्या झडतीत ॲरिस्टॉटलचे 'पॉलिटिक्स' सापडले. कैद्याने राजकारणावरील ग्रंथ जवळ बाळगणे गुन्हा आहे असे मिलटरी पोलिसांना वाटले. डॉक्टर त्यांना म्हणाले,

'हे येशूच्याही जन्मापूर्वी लिहिलेले आहे!'

'येशूच्याही जन्मापूर्वी? इतक्या प्राचीन काळीही लोक राजकारण बोलत असत?'

'हो!'

'येशूच्या जन्मापूर्वीचे राजकारण वेगळेच असेल. हल्लीचे राजकारण वेगळे असते. ठेव ते परत! पण आपल्या तपासणीचा शिक्का मार त्यावर!

फ्रान्समध्ये श्वायत्झर पतिपत्नींना एका वर्षात तीन कॅम्पांवरून फिरवले गेले. खाण्यापिण्याचे हाल झाले. त्यातून डॉक्टरांना डीसेण्ट्रीचा दुःसह विकार जडला. पत्नीही थंडीच्या विकाराने आजारी झाली. दोघेही हैराण झाली होती. युद्ध कुणाचे आणि दुःख कुणाला?

लिहिण्यास बंदी होती; पण कॅम्पवरील भिन्नभिन्न धंद्यांच्या मंडळींशी गप्पा मारता मारता डॉक्टरांनी अनेक धंद्यांचे अंतरंग जाणून घेतले. पुढे लॅम्बरेनेत नवे रुग्णालय उभारताना त्यांना हे ज्ञान खूपच उपयोगी पडले.

युद्ध संपले, कैदी मुक्त झाले. डॉक्टर गनबाशला आले. आपल्या प्रांताची आणि गावाची युद्धापायी झालेली दुर्दशा पाहून डॉक्टरांचे हृदय पिळवटून आले. डीसेण्ट्री त्रास देत होती. स्ट्रासबर्गला जाऊन तिच्यावर ऑपरेशन करावे लागले. जवळ पैसा नाही. उलट लॅम्बरेनेच्या रुग्णालयामुळे डोक्यावर कर्जाचा बोजा चढलेला. प्रकृती अस्वस्थ; पण सुदैवाने स्ट्रासबर्ग नगरपालिकेने डॉक्टर म्हणून त्यांची नेमणूक केली. तिथल्या चर्चमधील क्यूरेटची जागाही त्यांना मिळाली. उपजीविकेचा प्रश्न सुटला. पुढील दीड-दोन वर्षे नोकरी सांभाळून फुरसतीच्या वेळात, जर्मनीतील आपद्ग्रस्त स्नेह्यांसाठी अन्नधान्याची पोती पाठीवर वाहून कस्टमच्या नाक्यावर पोचवण्याचे कार्य डॉक्टर करीत राहिले. सुधारणेच्या तत्त्वज्ञानाची टिपणे आफ्रिकेत राहिली होती. त्यामुळे रात्री भिन्नभिन्न धर्मांचा अभ्यास करण्याचा परिपाठ डॉक्टरांनी अवलंबिला. दि. २३ डिसेंबर १९१९ रोजी स्वीडन युनिव्हर्सिटीत व्याख्यान देण्याचे निमंत्रण अकल्पितपणे आले. डॉक्टरांनी १९२० सालच्या वसंतऋतूत अपसाला येथे जाऊन 'सुधारणेचा नैतिक पाया' या विषयावर ते व्याख्यान दिले. अनेक दिवस मनात घोळत असलेला तो विषय विद्वज्जनांसमोर मांडण्याचा तो मोका मिळाल्याने त्यांचा गेलेला हुरूप परत आला. व्याख्यानापूर्वी डीसेण्ट्रीवरील दुसरे ऑपरेशन करावे लागल्याने आलेला अशक्तपणा कुठल्या कुठे पळाला! स्वीडनच्या आर्कबिशपनी डॉक्टरांच्या ऑर्गनवादनाचे अनेक जलसे त्या देशात घडवून आणले. महायुद्धाची झळ त्या देशाला फारशी लागली नसल्याने जलशांना उत्पन्नही खूप होई; पण डॉक्टरांनी या उत्पन्नाचा बराचसा भाग स्ट्रासबर्गला परतण्यापूर्वी जर्मनीतील आपद्ग्रस्तांसाठी पाठवून दिला होता. दौऱ्याचा ताण पुन्हा भासला. थकवा जाणवू लागला. तरीपण आफ्रिकेतील अनुभवावर आधारित पहिले पुस्तक त्यांनी पूर्ण करून प्रसिद्ध केले. त्या ग्रंथाची अनेक युरोपीय भाषांतून त्वरित भाषांतरे झाली. आफ्रिकेतले हस्तलिखितही परत आले. त्यामुळे आता लेखन, वाचन आणि व्याख्याने यांवर आपली उपजीविका करण्याचे ठरवून एप्रिल १९२१ मध्ये डॉक्टरांनी स्ट्रासबर्गमधील आपल्या दोन्ही नोकऱ्यांचा राजीनामा दिला! 'सुधारणेचे तत्त्वज्ञान' पुरे करण्याकरता ते आता गनबाशला येऊन राहिले.

पण या माणसाच्या नशिबी निवांतपणा लिहिलेलाच नव्हता. आफ्रिकेसंबंधीच्या ग्रंथामुळे आणि स्वीडिश दौऱ्यामुळे त्यांच्या नावाचा सर्वत्र एवढा मोठा गाजावाजा झाला होता, की आता पश्चिम युरोपमधील अनेक विद्यापीठे, सार्वजनिक संस्था आणि चर्चे यांच्याकडून त्यांना व्याख्यानासाठी आणि ऑर्गनवादनासाठी निमंत्रणे येऊ लागली. त्यामुळे पुढली तीन-साडेतीन वर्षे डॉक्टर दौऱ्यावर होते. नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, स्वित्झर्लंड, इंग्लंड, चेकोस्लोव्हाकिया, मोराव्हिया, बोहीमिया—आज इथे तर उद्या तिथे! रात्री प्रवास, दिवसा व्याख्याने, ऑर्गनवादन, विद्वान अन् कलाकार यांच्या भेटी. पुन्हा प्रवास. सारा प्रवास बहुधा तिसऱ्या वर्गाने चाले. एकदा कुणी तरी विचारले,

'डॉक्टर, तुम्ही तिसऱ्या वर्गाने का प्रवास करता?'

'त्याला कारण आहे. अहो, चौथा वर्ग आहे कुठे?'

बहुधा ही व्याख्याने धर्म, नीती, सुधारणा, तत्त्वज्ञान अशा विषयांवर असत. इंग्लंडमध्ये डॉक्टरांचा जवळजवळ सहा-सात आठवडे मुक्काम होता. 'सुधारणेचा ऱ्हास आणि तिचे पुनरुत्थान' या विषयावर ऑक्स्फर्ड येथे 'डेल मेमोरियल' व्याख्यानमाला डॉक्टरांनी गुंफली. काही ठिकाणी ख्रिस्ती धर्मसंशोधनावरही ते बोलत. ही व्याख्याने त्वरित प्रसिद्ध तर होतच; पण अनेक भाषांतही त्यांची भाषांतरे होत. बर्मिंगहॅम येथील, 'ख्रिस्ती धर्म आणि जगातील इतर धर्म' या विषयावरील त्यांच्या व्याख्यानाचे तर इतर अनेक भाषांप्रमाणे जपानी भाषेतही भाषांतर झाले.

परक्या भाषेत तोडकेमोडके बोलण्यापेक्षा परकीयांसमोर भाषण करताना डॉक्टर जर्मन भाषेत बोलत. प्रत्येक व्याख्यान काळजीपूर्वक तयार केलेले असे. सोपे शब्द, छोटी वाक्ये, स्पष्ट शब्दोच्चार यामुळे दुभाष्याला त्यांचे भाषांतर करून श्रोत्यांना त्वरित ऐकवता येत असे.

ऑर्गनवादनाचे कुठलेही निमंत्रण ते नाकारीत नसत; पण ज्या ऑर्गनवर बसायचे त्याची कार्यक्रमापूर्वी कसून पाहणी करायची त्यांची पद्धत होती. कुठे काही थोडाही दोष आढळला तरी लगेच अस्तन्या सारून ते कामाला लागत आणि ऑर्गन दुरुस्त करीत. त्यांच्या काळातील ते ऑर्गनदुरुस्तीतील तज्ज्ञ मानले जात. दौऱ्यातून

**जवळ पैसा नाही, प्रकृती अस्वास्थ्य, डोक्यावर कर्जाचा बोजा....**

उसंत मिळाली की लेखन असेच. त्यामुळे याच काळात सुधारणेच्या तत्त्वज्ञानावरील त्यांचे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले. 'बालपणीच्या, तरुणपणीच्या गोड स्मृती' या पुस्तकाची रूपरेषाही तयार झाली.

दौऱ्यामुळे पत्रव्यवहार बेसुमार वाढला. प्रत्येक पत्राचे स्वतः उत्तर लिहिण्यावर डॉक्टरांचा कटाक्ष असे. वेळ मिळाला की ते काम चाले. त्यामुळे ते नेहमी आपल्याबरोबर जाड कापडाच्या दोन थैल्या नेत. एकीत अनुत्तरित पत्रे असत, दुसरीत उत्तरित पत्रे ठेवली जात. या सर्व धकाधकीच्या काळात डॉक्टरांची प्रकृती उत्तम राहिली.

पंचवीस साल उजाडले. लॅम्बरेनेच्या रुग्णालयापोटी झालेले कर्ज फिटून बराच धनसंचय जवळ जमा झाल्याबरोबर डॉक्टरांना परत आफ्रिकेचे वेध लागले. त्यांनी दौरे थांबवले. प्रयाणाचा दिवस मुक्रर केला. औषधांचा भरपूर साठा खरीदला आणि पेटचा भरायला सुरुवात केली; पण तेवढ्यात धावतपळत स्ट्रासबर्गला जाऊन स्त्रीरोग व दंतरोगचिकित्सा ते आत्मसात करून आले. हॅम्बुर्गला जाऊन उष्णकटिबंधविषयक आरोग्यशास्त्राची खास माहितीही जमविली आणि मग काहीही गाजावाजा न करता ते आफ्रिकेच्या बोटीवर चढले.

साडेसहा वर्षांनंतर डॉक्टर आफ्रिकेच्या भूमीवर परत पाऊल ठेवीत होते; पण पोर्ट जेंटिलच्या धक्क्यावर त्यांना अनेकांनी ओळखले. 'जुने डॉक्टर' आल्याचा आनंद सर्वांना झाला होता. त्या सर्वांची आपुलकीने चौकशी करून डॉक्टर लाँचमध्ये बसले आणि लॅम्बेरेनेला पोचले. सहा-साडेसहा वर्षे जिथे राबता नव्हता तिथे काय असणार? रुग्णालयाच्या बंगलींच्या फक्त भिंती उभ्या होत्या. छप्पर उडून गेले होते. रोग्यांना राहाण्यासाठी बांधलेल्या झोपड्या आणि छपऱ्या पार जमीनदोस्त झाल्या होत्या. सर्वत्र जंगल माजले होते. डॉक्टरांचे तिथले युद्धपूर्व-कार्य जणू पार वाहून गेले होते! पुनश्च हरिः ॐ करून डॉक्टर आजूबाजूच्या वस्त्यावस्त्यांवर फिरले. झाप, बांबू, वासे जमा झाले. माणसे जमली. बंगलीवर छप्पर चढले!

पण सहा वर्षांत ओहोळातून बरेच पाणी वाहून गेले होते. झोपड्या, छपऱ्या परत बांधणे कठीण होऊन बसले होते. युद्धकाळात आफ्रिकेतील लाकडांची निर्यात वाढली होती. त्यासाठी ठिकठिकाणी वखारी उभ्या राहिल्या होत्या. त्यात काम करण्यासाठी आफ्रिकेतील विविध भागांतील अनेक जंगली टोळ्या तिथे येऊन राहिल्या होत्या. पूर्वीच्या निग्रोंपेक्षा हे परकी निग्रो किती तरीच रानटी आणि अडाणी होते. त्यांच्याशी जमवून घेणे महाकर्म कठीण होते.

पण या सर्वांना चुचकारून डॉक्टरांनी कामाला लावले; पण सरळरेषा म्हणजे काय हे ठाऊक नसलेल्या या माणसांकडून बांधकाम करून घेण्यासाठी डॉक्टरांना मनस्वी उरस्फोड करावी लागली. 'कमालीची रोगराई, जंगलातील कृमिकीटकांचा भयंकर उपद्रव, रोगी आणि त्यांच्याबरोबरच्या माणसांचा अडाणीपणा, त्यांच्या घाणेरड्या सवयी, कामचुकारपणा, हाती लागेल ती वस्तू चोरण्याची आदत आणि भांडणे या सर्वांबरोबर माझी आता थकव्याबरोबर झुंज सुरू झाली!' असे डॉक्टरांनी आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवले आहे.

पाच-सहा महिन्यांत पुन्हा घडी बसली. युरोपमधून एक डॉक्टर आणि दोन नर्सेसही मदतीला आल्या. मग सकाळचा वेळ रोग्यांना देऊन दुपारी डॉक्टर मुकादम, इंजिनियर बनत! जंगलातून चालून चालून त्यांचे पाय भेगाळले. त्यातून रक्तस्राव सुरू झाला. तरी काम चालू होते. युद्धकाळात सुतार, लोहार वगैरे कारागीर दुर्मिळ झाले होते. अडाण्यांकडून ती कामे करवून घेणे मोठे त्रासदायक होते. शिक्षणाचा जो थोडाफार प्रसार झाला होता त्यातून पोषाखीपण वाढला होता. त्याचा अनुभव डॉक्टरांनी नेटकेपणाने टिपून ठेवला आहे.

सुतारांच्या अभावी रुग्णालयाच्या आवारात अनेक ओंडके अर्धवट कापून पडलेले होते. एकाएकी पावसाची सर आली. लाकडे भिजू नयेत म्हणून श्वायत्झर आणि एक साथीदार ते ओंडके ओढून आडोशाला न्यायची खटपट करीत होते. समोरच्या झोपडीत रोग्याला भेटायला आलेला स्वच्छ सुटाबुटातला एक निग्रो बसला होता. डॉक्टरांनी त्याला हाक मारली.

'मित्रा, जरा ओंडके ढकलायला ये ना!' अंगावर पाल चढावी तसा दचकून तो म्हणाला,

'मी?'

'हो.'

'मी सुशिक्षित आहे. मी हमालीची कामे करीत नाही!' डॉक्टर म्हणाले—

'गड्या, तू खरा भाग्यवान आहेस! मलाही तुझ्यासारखे सुशिक्षित व्हायचे होते रे; पण नाही जमले!'

याच सुमारास पन्नास-साठ मैलांवरील एका निग्रोवस्तीत कॉलऱ्याची साथ फैलावली. माणसे उंदरासारखी मरत आहेत ही बातमी डॉक्टरांना समजली. श्वायत्झर स्वस्थ कसे बसणार? ते बरोबर साथिदार डॉक्टर घेऊन तिथे धावले. अनेकांना उपचार केले; पण काही मंडळींना रुग्णालयात हलवणे जरूर होते. साथीचे रोगी रुग्णालयात आणणे धोक्याचे होते; पण डॉक्टर डगमगले नाहीत. लाँच करून कॉलऱ्याचे रोगी रुग्णालयात दाखल केले गेले. रुग्णालयाची जागा डॉक्टरांच्या नेहमीच्याच रोग्यांना अपुरी पडत होती. वेड्यांसाठी, कुष्ठरोग्यांसाठी, कर्मचाऱ्यांसाठीही तिथे वेगळी व्यवस्था नव्हती. तिथे ही नवी भर; पण अविश्रांत श्रम करून रुग्णालयाच्या परिसरात डॉक्टरांनी कॉलऱ्याचा प्रादुर्भाव होऊ दिला नाही.

त्यामुळे हॉस्पिटलसाठी विस्तीर्ण आणि सर्व सोयींनी युक्त अशी दुसरी जागा पाहिलीच पाहिजे ही निकड त्यांना लागली. तसे करण्यात वर्षा-सव्वावर्षाची मेहनत फुकट जाणार होती; पण त्याला इलाज नव्हता. लॅम्बरेनेपासून सुमारे दोन मैलांवरील एक विस्तीर्ण जागा डॉक्टरांनी शोधून काढली. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला भेटून त्याच्याकडून ती जागा मिळवली. त्या जागी रान माजले होते. लॅम्बरेनेहून तिथे पोचायला रस्ताही नव्हता. वाटेत दलदलीचा भाग खूपच होता; पण अडचणींवर मात करण्यात डॉक्टरांचे सारे आयुष्य गेले होते. त्यांनी माणसे जमवली. रस्त्याच्या कामाला सुरुवात केली. घनदाट रान तोडले जाऊ लागले. श्वापदे, कृमिकीटक, तांबड्या मुंग्या, अजगरे, सर्प, विंचू, भुंगे यांच्या विरोधाला न जुमानता रस्ता तयार होत होता. रानाला आग लावून 'प्राणिसत्र' करणे डॉक्टरांना पटत नसल्यामुळे विषारी दंशाने पीडित कामगारांवर ते औषधोपचार करीत आणि त्यांना दिलासा देत डॉक्टरांना कामे करून घ्यावी लागत

होती. रुग्णालयाची जागा साफ होताच, दोनशे रुग्णांची सोय होईल अशा पक्क्या विटांची इमारत बांधण्याचा संकल्प करून डॉक्टरांनी तिचे निळे नकाशे काढले. लाकूड, लोखंड, पत्रे, विटा, चुना असे सामान गोळा केले. आफ्रिकेतला दुष्काळ त्यांच्या मदतीला आला. दूरदृष्टीने डॉक्टरांनी पुष्कळसा तांदूळ व अन्नधान्ये साठवून ठेवली होती. ' रेशन 'च्या आशेने मजूर मिळू लागले. रोग्यांबरोबरची धडधाकड माणसेही कामाला लागली. अडाण्यांकडून कामे करून घेण्यात डॉक्टर तरबेज होतेच. युद्धकैद्यांच्या कॅम्पवर असता करून घेतलेली माहिती त्यांना आता उपयोगी पडली. प्रसंगी ते गवंडी बनत. कधी कधी पाथरवट, कधी सुतार, कधी लोहार. डॉक्टर सर्व काही होते. जुने रुग्णालय मदतनीस डॉक्टर आणि नर्सेस चालवीत होत्या. डॉक्टर नवे रुग्णालय उभे करीत होते.

१९२७ च्या जानेवारी महिन्यात नवे रुग्णालय तयार झाले. लॅम्बरेनेतले रोगी डॉक्टरांनी त्वरित तिकडे हलवले. नव्या रुग्णालयात रोगी पोचल्यावर त्यांना जो आनंद झाला त्याची नोंद डॉक्टरांच्या दैनंदिनीतून वाचण्यासारखी आहे.

सतत तीन वर्षे डॉक्टर ही नवी उभारणी करीत होते. घर विसरले होते. व्याख्याने, ऑर्गनवादन, लेखन यावर राख धरली होती. मनस्वी थकवा आला होता. आता घरी जाऊन विश्रांती हवी होती; पण नवे रुग्णालय स्थिरस्थावर होईतो २७ चा जुलै महिना उजाडला. कृतकृत्य होऊन डॉक्टरांनी बोटीवर पाय ठेवला.

डॉक्टर घरी विश्रांतीसाठी आले होते; पण तिथे देशोदेशींची व्याख्यानांची आणि ऑर्गन-मैफलींची निमंत्रणे त्यांची वाट पहात होती.

दौरे सुरू झाले. ऑर्गनच्या मैफलीही झडू लागल्या. आफ्रिकेतील कार्याला मदत करणाऱ्यांना डॉक्टर आवर्जून भेटून आले. थकवा घालविण्यासाठी ' ब्लॅक फॉरेस्ट 'मधील कोइन्सफील्ड येथे विश्रांतीसाठी गेले; पण तिथे रात्ररात्र जागून बरेच दिवस मनात घोळत असलेला ' दि मिस्टिसिझम ऑफ पॉल दि अपॉसल ' हा ग्रंथ लिहून मोकळे झाले. याच सुमारास फ्रँकफुर्ट शहरातर्फे दिले जाणारे ' गटे ' पारितोषिक डॉक्टरांना मिळाले. त्यानिमित्त फ्रँकफुर्ट येथे दि. २८ ऑगस्ट १९२८ रोजी डॉक्टरांचे ' गटे 'वर झालेले व्याख्यान सर्वत्र गाजले. अठराव्या शतकातील स्वतंत्र तज्ज्ञ, बुद्धिमान आधुनिक तत्त्ववेत्ता म्हणून गटे प्रसिद्ध आहे; पण तत्त्वज्ञानात तो व्यवहार विसरला नव्हता. तत्त्वज्ञान जगणारा हा महात्मा खरा कर्मयोगी होता. अनुकम्पेचा पुतळा होता. डॉक्टर त्याला गुरुस्थानी मानीत. त्यामुळेच गटेवर बोलताना त्यांच्या रसवंतीला वेगळी झिलई आली असल्यास नवल नाही.

आफ्रिकेतील कार्याचा पसारा वाढत होता. त्यासाठी जमविण्यात येणाऱ्या सामानाची गनबाशला रीघ लागे. डॉक्टर युरोपात घरी असले की पाहुण्यांचीही वर्दळ बरीच असे . याकरता गनबाशचे घर अपुरे पडे. गटे प्राईझची रक्कम गनबाशला नवे घर बांधण्यात खर्च करायची असे ठरवून डॉक्टरांनी नव्या घराचा नकाशा आखला; पण घरबांधणीचे काम एका इंजिनियर मित्राकडे सोपवून डॉक्टर परत बोटीत बसले. लॅम्बरेनेची ओढ त्यांना लागली होती.

हॉस्पिटल स्वयंपूर्ण व्हावे, कठिण काळातही जगावे या दृष्टीने लॅम्बरेनेच्या रुग्णालयासभोवतालची बरीचशी जमीन, शेती व फळबागा याकरता डॉक्टरांनी राखून ठेवली होती. परत आल्यावर डॉक्टर आता शेतकरी आणि बागवान बनले. युरोपमधून आता बरेच डॉक्टर्स व सहकारी त्यांच्या दिमतीला आले असल्याने त्यांच्या कार्यावर नजर ठेवून डॉक्टर शेती आणि फळबागा जोपासू लागले. त्यात नवनवे प्रयोग करू लागले. निग्रोंच्या मनात या संताबद्दल आदर वसत होता. त्यांची घरगुती भांडणेही ते डॉक्टरांकडे आणीत आणि त्यांचा निवाडा शिरसावंद्य मानीत. इतर धर्मोपदेशकांपेक्षा डॉक्टर उदारमतवादी असल्याने त्यांनी निग्रोंना व त्यांच्या चालीरीतींना कधी उपेक्षिले नाही. ' काळ्या लोकांचे दैन्य दूर करण्यासाठी झटणे हे गोऱ्या लोकांचे कर्तव्य आहे. त्यात खुषीचा प्रश्न नाही. उपकाराची भाषा नाही. आजवर गोऱ्यांनी काळ्या लोकांवर जी जुलूमजबरदस्ती केली त्याचे हे प्रायश्चित्त आहे. आपली सारी शक्ती एकवटून आपण त्यांच्या जखमा पिढ्यान् पिढ्या भरून काढीत राहिलो तरी केलेल्या पापाच्या एक सहस्रांशाचेही क्षालन होणार नाही. ' ही यामागची डॉक्टरांची धारणा होती.

दोन वर्षे लॅम्बरेनेत काढून डॉक्टर परत विश्रांतीसाठी युरोपमधून आले. आता गनबाशचे घर तयार झाले होते. ते त्यांनी रस्त्यालगत बांधले होते. जनसंपर्क न तुटावा ही त्यामागची भावना होती. पाहुणे यायचे असले की एक हातगाडी घेऊन डॉक्टर स्टेशनवर जात. पाहुण्यांना उतरून घेऊन त्यांचे सामान हातगाडीवर टाकून गप्पागोष्टी करीत पाहुण्यांना घरी आणीत. ते गनबाशला असले की घर सदाच गजबजलेले राही; पण डॉक्टरांच्या वागणुकीमुळे पाहुणे, पाहुणे रहात नसत. ते घरचेच होत. कुणी भाजी कापी, कुणी पत्रे टाइप करी. कुणी कागद फाईल करी. कुणी मिसेस श्वायत्झरना स्वयंपाकाला मदत करी. जेवताना आफ्रिकेतील गमतीजमती सांगून डॉक्टर पाहुण्यांना खूप हसवीत. रात्री ऑर्गन वाजवून त्यांची करमणूकही करीत. वेळ मिळाला की वाचन अन् लेखन सुरू.

विश्रांती संपल्यावर दौरे सुरू होत. या वेळच्या युरोप-दौऱ्यास २२ मार्च १९३२ रोजी फ्रँकफूर्ट येथे गटेशताब्दिनिमित्त झालेले त्यांचे भाषणही वर्तमानपत्रातून खूपच गाजले. पुढली इंग्लंडवारीही संस्मरणीय झाली. अनेक ठिकाणी लँबरेनेवर आणि तत्त्वज्ञानावर ते बोलले. ऑर्गनवादनाचे कार्यक्रमही झाले. या वेळी ऑक्सफर्ड आणि एडिंबरो विद्यापीठांनी आपली सन्माननीय डॉक्टरेट त्यांना बहाल केली. नेहमीप्रमाणे हाही दौरा झंजावातीच होता. दुभाषे थकून जात. डॉक्टरही अविश्रांत मेहनत घेत. रात्ररात्र जागून भाषणे तयार करीत. कुणी तरी म्हणाले,



'डॉक्टर, मेणबत्ती दोन्ही बाजूंनी जाळू नये!' त्यावर डॉक्टर लगेच म्हणाले,

'मेणबत्ती आखूड असेल तर नये जाळू; पण ती चांगली लांब असेल तर?'

डॉक्टर गंभीर विचार मांडीत; पण वृत्ती विनोदी होती. गंभीर कठीण समस्या उभी राहिली तरी त्यांची विनोदी वृत्ती त्यांना सोडून जात नसे. स्कॉटलंडमधील एका गावची गोष्ट. डॉक्टरांचे व्याख्यान होते. सभेच्या नियुक्त अध्यक्षाला डॉक्टरांची विशेषशी माहिती नव्हती. त्याने हळूच डॉक्टरांना विचारले,

'डॉक्टरसाहेब, श्रोत्यांना तुमची कशी ओळख करून देऊ?'

श्वायत्झर हसत म्हणाले,

'सांगा त्यांना, की हा कूलीसारखा दिसणारा, माझ्या शेजारी बसलेला गृहस्थच आजचा व्याख्याता श्वायत्झर आहे!'

व्यासपीठावरील हशामध्ये अध्यक्ष लाजून बुडाला!

डॉक्टरांच्या लोकप्रियतेचे कारण जसे त्यांच्या विद्वत्तेत होते, सेवाभावात होते तसे या विनोदीपणातही होते.

१९३५ च्या फेब्रुवारीत ते परत लँबरेनेला गेले.

हॉस्पिटल छान चालले होते. शेती आणि फळबागाही चांगल्या लागवल्या होत्या. यानंतरच्या काळात श्वायत्झर काही महिने लॅम्बरेनेत असत तर काही महिने युरोपमध्ये. ते विनोदाने म्हणत, 'आय् ॲम् ए मायग्रेटरी बर्ड' पण दिगंतरी फिरत असताना ते 'लॅम्बरेने' करता 'चारा' गोळा करीत!

१२ जानेवारी १९३९ ला असेच ते युरोपला यायला निघाले. हिटलरचे जे भाषण त्यांनी रेडिओवर ऐकले त्यावरून काही दिवसांतच दुसरे महायुद्ध भडकणार अशी त्यांची खात्री झाली. म्हणूनच युरोपमध्ये दहा-बारा दिवसांतच हवी तेवढी औषधे व उपकरणे गोळा करून ते लॅम्बरेनेला परत गेले. त्यांच्या अटकळीप्रमाणे ३ सप्टेंबरला दुसरे महायुद्ध उभे राहिलेच!

युद्धकाळात अन्नधान्याची वा फळांची अडचण त्यांच्या शेतीने व फळबागांनीही भासू दिली नाही; पण सरकारने डॉक्टर्स उचलले. नर्सेस नेल्या. एवढ्या मोठ्या रुग्णालयाचा भार परत वृद्ध डॉक्टरांवर पडला. १९४२ साली औषधांचा साठा संपत आला अन् डॉक्टर गडबडले; पण या नेमक्या वेळी अमेरिकेतून आणि सतत बॉंबवर्षावाखाली असलेल्या इंग्लंडमधून डॉक्टरांना औषधाची जी मदत पोचली ती पाहून डॉक्टरांचे डोळे कृतज्ञतेने भरून आले. इंग्लिशांबद्दल वाटलेल्या कृतज्ञतेमुळे सतत झरणाऱ्या डोळ्यांतील अश्रूंनी त्या दिवसांतील डॉक्टरांच्या दैनंदिनीची अनेक पाने भिजून चिंब झाली आहेत!

७ मे १९४५ रोजी महायुद्ध थांबले; पण डॉक्टर्स, नर्सेस, उपकरणे, औषधे मिळून रुग्णालयाचे गाडे रुळावर यायला आणखी तीन वर्षे लागली. या खेपेस या महर्षीला तब्बल सतत दहा वर्षे आफ्रिकेत काढावी लागली. कडक उष्ण हवा आणि युद्धजन्य समस्या यांना तोंड देत ती दहा वर्षे संपली होती. वयाला ७३ वर्षे पूर्ण झाली होती. वृद्ध दिसायला आता हरकत नव्हती; पण उत्साह दांडगा होता.

१९४८ साली डॉक्टर गनबाशला परतले. थकून-भागून; पण एवढ्यात शिकॅगो विद्यापीठाच्या अध्यक्षांकडून डॉक्टरांना निमंत्रण आले. जाणे जिवावर आले; पण अमेरिकेतून प्रथमच निमंत्रण आले होते. युद्धकाळात त्या मंडळींनी मोलाची मदत केली होती. या वेळीही ६१०० डॉलर्सची मदत लॅम्बरेनेकरता देऊ केली होती. नाही म्हणणे कठीण होते. १९४९ च्या जूनमध्ये डॉक्टर अमेरिकेस जाण्यास निघाले!

न्यूयॉर्कच्या बंदरात त्यांचे अमेरिकनांनी जे स्वागत केले त्याला उपमा शोधणे कठीण. प्रेस-फोटोग्राफर्सनी तर त्यांच्यावर हल्लाच चढविला. बरोबरीचे मित्र चिडले; पण डॉक्टर म्हणाले,

'राहू द्या हो. घेऊ द्यात त्यांना माझे फोटो. त्यांच्यामुळे तर अमेरिकेतून एवढी मदत मला मिळाली. हवे तर सारा दिवस इथे बसून मी त्यांना सह्या अन् फोटो देईन!'

शिकॅगोचा कार्यक्रम उरकून कोलोराडोमधील गटे-समारंभाला जाण्याकरता, गाडीची वाट पाहत डॉक्टर शिकॅगो स्टेशनवर उभे होते. मित्रमंडळींशी गप्पा चालू होत्या. एवढ्यात एक वृद्धा आपले अवजड सामान कसेबसे उचलीत प्लॅटफॉर्मवर येताना दिसली. डॉक्टरांनी ते पाहिले मात्र. ते लगेच धावत गेले. त्यांनी तिचे सामान उचलले. हवे त्या जागी नेऊन ठेवले! मित्र चकित झाले; पण त्या प्रसंगाने शिकॅगो स्टेशनवर एकच 'कल्लोळ' उडाला. जो तो तरुण वृद्धाचे सामान अहमहमिकेने वाहून नेऊ लागला! ७४ वर्षांच्या श्वायत्झरनी घालून दिलेला धडा ते गिरवीत होते! कोलोराडोतील ॲस्पन येथील ते व्याख्यानही 'अमेरिकेतील सर्वोत्कृष्ट सांस्कृतिक व्याख्यान' म्हणून गौरविले गेले!

१९५३ सालच्या ऑक्टोबर महिन्यात, १९५२ सालचे नोबेल शांतता पारितोषिक डॉक्टरांना मिळाल्याची बातमी आली. डॉक्टर हॉस्पिटलच्या आवारातील हरणांना भरवीत होते. त्यांचे खोपट झाडीत होते. बातमी ऐकून ते काहीही बोलले नाहीत; पण जगाच्या कानाकोपऱ्यातून पुढील दोन दिवसांत त्यांच्यावर जेव्हा तारा-पत्रांचा पाऊस पडला तेव्हा ते म्हणाले, 'कीर्तीचा अर्थ हा असेल, तर मला ती मृत्यूनंतर मिळाली असती तर बरे झाले असते!'

कुष्ठरोग्यांच्या वेगळ्या रुग्णालयाचे काम चालू असल्यामुळे नोबेल पारितोषिक घ्यायला ऑस्लोला जायला डॉक्टरांना लगेच सवड नव्हती. १९५४ सालच्या नोव्हेंबरात ते काम बव्हंशी संपल्यावर ते ऑस्लोला गेले. नोबेलकमिटीने एखाद्या राजासारखे त्यांचे तिथे स्वागत केले; पण तो राजेशाही पाहुणचार विनोदाने नाकारून ते साध्या पाहुण्यासारखेच तिथे राहिले.

पारितोषिकवितरणसमारंभाचे वेळी त्यांनी जे भाषण केले त्यात त्यांनी विश्वशांतीची मीमांसा इतिहासाच्या पार्श्वभूमीवरून केली. ते म्हणाले, 'औद्योगिक क्रांतीनंतर गेल्या शतकात, विज्ञानाच्या वाढीमुळे जे अनेक शोध भराभर लागत गेले, त्यांच्या साहाय्याने जीवनपद्धती समृद्ध करताना, तिला नैतिक आचरणाचे अधिष्ठान देणे आवश्यक होते; पण ते तसे दिले गेले नाही. आज मानव, पंचमहाभूतांचा स्वामी बनून 'अतिमानव' झाला असला, तरी नैतिकतेच्या अधिष्ठानाभावी, स्वार्थजन्य दुष्प्रवृत्तींची वाढ झाल्याने तो मनाने अत्यंत दुबळा बनला आहे. अंतर्मुख होण्याची त्याला आता भीती वाटू लागली आहे. परिस्थितीवर मात करण्यात पुरुषार्थ मानण्याऐवजी

तिच्या अनुषंगाने आपला जीवनक्रम घडविण्यात तो धन्यता मानू लागला आहे. मानवाचे आत्मबल पूर्णतया नष्ट झाले असून तो आता पूर्ववत युवावस्थेला जाऊन पोचला आहे. स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्ती जागृत होऊन समाजात आत्मबलाची पुन्हा प्रतिष्ठापना होईल आणि सर्वसामान्य माणसाला अंतर्मुख बनण्याची सवय होऊन त्याचे हृदयपरिवर्तन होऊन त्याला खऱ्या शांतीची पिपासा लागेल तेव्हाच विश्वशांती प्रस्थापित होण्याची आशा आहे. एरवी ते शक्य नाही!' आपल्या भाषणाचा शेवट करताना ते म्हणाले,

'विजेती राष्ट्रे, जित राष्ट्रांवर घातलेल्या घावांच्या जखमा जर आपल्या स्वतःच्या हातांनी भरून काढतील, तरच आत्मबलाची पुन्हा प्रतिष्ठा होऊ लागली आहे असे मी समजेन! तसे केल्याने कोणत्याही विजेत्या राष्ट्राचे स्वसंरक्षणसामर्थ्य काडीभरही कमी होणार नाही, उलट ते दुणावेल याचा मला पूर्ण विश्वास आहे.'

डॉ. श्वायत्झर यांची ही घोषणा अभूतपूर्वच होती; पण नव्या जगाचा शोध लागल्यापासून युरोपियनांनी आफ्रिकेतील निग्रोंवर केलेल्या अनन्वित जुलुमांचे अंशतः तरी परिमार्जन करावे म्हणून आफ्रिकेच्या जंगलात जाऊन स्वतःचा देह सतत ४१ वर्षे झिजवीत असलेल्या श्वायत्झरना वरील घोषणा करण्याचा पूर्ण अधिकार होता!

नोबेल पारितोषिकापाठोपाठ इंग्लंडचे ऑर्डर ऑफ मेरिटही श्वायत्झरना प्राप्त झाले. ८० वर्षांच्या विद्वानाचा, त्याच्या कर्तृत्वाचा, त्याच्या विचारांचा जगाने आदर केला होता. उर्वरित आयुष्य गनबाशला जाऊन सुखेनैव व्यतीत करण्याचा खरा तर त्यांना अधिकार होता; पण श्वायत्झर परत आफ्रिकेत गेले. त्यांचा ८० वा वाढदिवस साऱ्या युरोप–अमेरिकेत मोठ्या उत्साहाने साजरा झाला. तारा, पत्रे, देणग्या यांचा वर्षाव झाला. एका मित्राने श्वायत्झरना लिहिले, 'डॉक्टर, वाढदिवसानिमित्त भेट म्हणून मी आपल्याला काय देऊ?'

श्वायत्झरनी उत्तर पाठविले–

'काय देतोस? जनतेच्या प्रेमामुळे मला हव्या त्या सर्व गोष्टी मिळाल्या आहेत; पण एक गोष्ट शक्य असेल तर पाठव! वेळाने काठोकाठ भरलेला एक सुंदरसा कुंभ मला हवा आहे. मला माझ्या कार्यार्थ वेळ, अधिक वेळ हवा आहे!'

मिळालेल्या वेळाचा क्षण अन् क्षण रंजल्या–गांजल्यांच्या सेवेत झिजवीत, वयाच्या ८९ व्या वर्षी ४ सप्टेंबर १९६४ रोजी हा जंगल–तत्त्वज्ञ, कर्मयोगी आपल्या कर्मभूमीतच आत्मस्वरूपी विलीन झाला! त्याच्या जन्मशताब्दिनिमित्ताने वाचकांना त्यांची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न हीच माझी त्याला श्रद्धांजली!!

## समाप्त

**डॉ. अल्बर्ट श्वायत्झर यांची ग्रंथसंपत्ती**

१ : अ ट्रीटाईझ ऑन रिलिजस फिलॉसॉफी ऑफ काण्ट १८९९
२ : अ ट्रीटाईझ ऑन जॉन सेबॅस्टियन बाह्क्स् १९०८
३ : पॉल अँण्ड हिज् इण्टरप्रीटर्स १९१२
४ : ऑन दि एज् ऑफ प्रायमाव्हियल फॉरेस्ट १९२१
५ : क्वेस्ट ऑफ हिस्टॉरिकल जीझस् १९२२
६ : दि मॉयथॉलॉजिकल किंगडम ऑफ गॉड १९२५
७ : दि फिलॉसॉफी ऑफ सिव्हिलिझेशन १९२५
८ : दि मिस्टिसिझम ऑफ पॉल दि अॅपॉसल १९३१
९ : मोअर फ्रॉम दि फ्रायमाव्हियल फॉरेस्ट १९३१
१० : माय लाइफ अँण्ड थॉट १९३३
११ : इंडियन थॉट अँण्ड इट्स् डेव्हलपमेंट १९३६
१२ : फ्रॉम माय आफ्रिकन नोटबुक १९३९
१३ : आउट ऑफ माय लाइफ १९४९

## पुस्तके

# इतिहास....

अमळनेरच्या प्रताप कॉलेजमधील इतिहासाभ्यासी प्राध्यापक श्री. दि. के. देशपांडे यांनी गेल्या काही वर्षांत लिहिलेल्या दहा ऐतिहासिक लेखांचा हा संग्रह आहे. यातील पहिले दोन लेख तात्त्विक स्वरूपाचे असून, त्यात इतिहाससंशोधन आणि त्याचे स्वरूप मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात विशद करून सांगितले आहे. मराठी इतिहासकारांच्या कार्याची यथार्थ ओळख करून देण्यात श्री. देशपांडे यांची निखळ ऐतिहासिक दृष्टी चांगली प्रत्ययास येते. १८५७ च्या उठावासंबंधीचे दोन माहितीपूर्ण लेख लिहिताना त्यांनी अशीच निर्विकार दृष्टी वापरली आहे. तथापि या उठावाचे स्वरूप वर्णिताना आणि फलश्रुतीची मीमांसा करताना ठामपणे भूमिका घेणे त्यांना जड गेल्याचेही स्पष्ट दिसते. सत्तावनी प्रकरणाला कोणत्या नावाने संबोधावे हा विचार केंद्रबिंदू मानल्यामुळे, लेखकाची भूमिका थोडी डळमळल्यासारखी वाटते. पुढल्या लेखात एक इग्रजी प्रवासी डॉ. हेंडरसन याने रणजितसिंगाच्या काळात पंजाब, काश्मीर, हिमालय इत्यादी भागात कसा रोमांचकारी व संकटमय प्रवास केला त्याची हकिकत आहे. ती वाचून त्या साहेबाविषयी अपार कौतुक वाटते.

रियासतकार सरदेसाई आणि प्राच्यविद्यापंडित डॉ. अ. स. अळतेकर यांच्या जीवनकार्याची ओळख देणारे दोन लेख श्रद्धांजलिस्वरूपाचे वाटतात. कै. डॉ. अळतेकर यांनी महाराष्ट्राबाहेर राहून, प्राचीन भारतीय इतिहास-संस्कृतीविषयी जे अनमोल संशोधन इंग्रजीतून केले त्याची महाराष्ट्रास अजूनही नीट ओळख झालेली नाही याचे वाईट वाटते. शिवरायांसंबंधीचा देशपांडे यांचा लेख त्यांचे धावते चरित्र सांगून जातो; पण शिवरायांच्या भारतीय स्तरावरील सर्वांगीण थोरवीचे ठसठशीत दर्शन त्यात पुरेसे घडत नाही. १७१४ मधील अहमदाबादच्या हिंदू-मुसलमान दंग्याची हकिकत आठव्या लेखात आहे व ती खचित नवीन आणि उद्बोधक आहे. संग्रहातील शेवटचा लेख दौलताबाद किल्ल्याचे वर्णन करणारा असून त्यातील वर्णन इतिहासाभ्यासी लेखकाला साजेल असेच सर्वांगपरिपूर्ण उतरले आहे. प्रा. देशपांडे यांचे हे सर्व लेख वाचताना आपली ऐतिहासिक आणि विवेचक दृष्टी वर्ण्यविषयावरून ढळू न देण्याची ते फार काळजी घेतात हे सहज जाणवते आणि त्यामुळे त्यांचा हा ऐतिहासिक लेखसंग्रह वाचकाच्या मनात विचारतरंग उमटवील अशी खात्री वाटते.

**—म. श्री. दीक्षित**

**इतिहास—विचारतरंग—**
लेखक व प्रकाशक दि. के. देशपांडे
टिळकरोड, अमळनेर
पृष्ठे ११२
मूल्य ८ रुपये ◻

# जरा नेतो....

[ अखिल भारतीय ग्रंथालय सप्ताहानिमित्त महाराष्ट्र ग्रंथालय संघाकडून आलेला लेख. ]

पुस्तकाकरिता पैसे खर्च करावे लागतात हे अनेकांना जणु माहितीच नसते. दुसऱ्याचे पुस्तक कायमचे चातुर्याने हस्तगत करणे व त्याचा ते स्वतःचेच असा उपयोग करणे ही एक कला हे लोक उत्तम जाणतात. हे लुच्चे केवळ ग्रंथवाचकच नव्हेत तर 'पुस्तक-चोरच होत.' सरळ मनाने पुस्तक देणाऱ्यांना असे पुस्तकचोर नेहमी भेटतात.

अनातोल फ्रान्स हे फ्रान्समधील एक सुप्रसिद्ध लेखक आपल्या आत्मचरित्रात ह्यासंबंधी लिहितात, 'आपणा प्रत्येकास आश्चर्य वाटेल तो स्वतः पुस्तकचोर होता. स्वतःचा अनुभव म्हणून स्वत.चे पुस्तक कोणी मागितल्यावर देणाऱ्यांना त्याने एक सल्ला दिला आहे. तो म्हणतो—

'स्वतःचे पुस्तक कोणीही मागितल्यावर देऊ नका. माझा पुस्तकसंग्रह परिपूर्ण म्हणावा असा आहे. देशातील विद्वान तो पहाण्यास येत असतात. ह्या संग्रहात मोठ्या संख्येने ज्येष्ठ-श्रेष्ठ ग्रंथकारांचीही पुस्तके होती. ही सर्व पुस्तके मी मित्रांकडून वाचायला आणलेली होती; परंतु नंतर ती मी कधी परतच केली नाहीत. मित्रांच्या पुस्तकमागणीकडे लक्षच दिले नाही. त्यांच्या येरझाऱ्या झाल्या. त्यांना मी फक्त वायदे केले. मग भांडणे झाली. आपसातील तेढ वाढली. उलट मी कोणाकडून एकदा हस्तगत झालेले एकही पुस्तक परत केले नाही.'

सर वॉल्टर स्कॉटच्या मित्राने स्कॉटचे एक पुस्तक वाचावयास मागितले. मित्र घनिष्ठ संबंधाचा होता. स्कॉटला पुस्तक द्यावे लागले. काही दिवसांनी पुस्तक परत येत नाही असे पाहून त्याने मित्राला त्याबाबत स्मरणपत्र पाठवले. त्यात ह्या वृत्तीवरचे सूचक पण आकर्षक वाक्य त्याने असे योजलेले होते, 'बुक-कीपिंग—( हिशोबा ) च्या कामात आमचे मित्र किती तरी कच्चे असतील; परंतु बुक-कीपिंग ( पुस्तक दडवून ठेवण्या ) च्या कामात फारच तरबेज दिसतात.'

महाराष्ट्रातील एक थोर साहित्यिक काका गाडगीळ यांचा एक किस्सा आहे. त्यांच्याजवळ भारी किमतीचे कायद्याचे एक पुस्तक होते. ते एका वजनदार विद्वान, घनिष्ठसबंधी मित्राने वाचण्यासाठी मागून घेतले. बरेच दिवस गेले. पुस्तक परत येईना. काकासाहेबांनी निरोप, चिठ्ठ्या पाठविल्या; पण उपयोग झाला नाही. काकासाहेब स्वतः त्या मित्राला भेटले तेव्हा उत्तर मिळाले—'तुमचे पुस्तक कोठे ठेवले आहे ते सापडत नाही.' काही महिन्यांनंतर काकासाहेबांना तेच पुस्तक एका रद्दीवाल्याच्या दुकानात दिसले! एकदा खरीदलेले स्वतःचेच पुस्तक त्यांना दुसऱ्यांदा खरीदावे लागले!

हिंदी भाषेतील साहित्यिक कन्हैयालाल मिश्र 'प्रभाकर' यांचा अनुभव तंतोतंत असाच आहे. दिल्लीतील एका पुस्तकविक्रेत्याने घनश्यामदास बिरलांनी लिहिलेले 'बापू' या नावाचे पुस्तक ओळखीमुळे मिश्रजींना उधार दिले. दिल्लीहून मिश्रजी रेल्वेने निघाले. डब्यात ते 'बापू' वाचू लागले.

इतक्यात त्यांचा एक सार्वजनिक कार्यकर्ता जुना मित्र तेथे आला. मिश्रजींचा थोडासा डोळा लागला असताना हे मित्र पुस्तक वाचू लागले. मित्राला मेरठला उतरावयाचे होते. तेथे उतरताना 'बापू' ला सरळ रीतीने स्वतःच्या पिशवीत कोंबीत ते म्हणाले, 'मिश्रजी, काही बोलू नका, पुस्तक खरोखरच चांगले आहे. पुरे व्हायचे आहे. कोणाबरोबर तरी पाठवून देईन. नाही तर आपण इकडे आलात तर स्वतःच घेऊन जा !'

पंधरा दिवसांनी मिश्रजींचा दुसरा एक मित्र मेरठला जात होता. त्याला त्यांनी त्या मित्राकडून 'बापू' आणण्यास सांगितले. ते मित्र 'बापू' साठी त्याचेकडे गेले; पण त्याने पुस्तक दिले नाहीच. वर निरोप दिला— 'मिश्रजी जेव्हा माझ्या घरी येतील तेव्हा पुस्तक त्यांनाच मिळेल !' तीन महिन्यांनंतर मिश्रजी स्वतः तिकडे गेले. मेरठचे मित्र प्रामाणिकपणे म्हणाले, 'हे घ्या पुस्तक.' आणि मिश्रजींनी पाहिले की, आपल्या पुस्तकावर २७ असा एक ग्रंथालयक्रमांक मित्राच्या मुलांनी त्यांच्या ग्रंथालयाचा म्हणून चिकटवलेला आहे !

संपन्न अमेरिकेतील एका श्रीमंत नागरिकाचे उदाहरण असेच आश्चर्याचे आहे. त्या नागरिक वाचकाने एका ग्रंथालयातून एक पुस्तक घेतले. ते घेऊन तो चीनमध्ये गेला. त्याने ते तेथे विकून टाकले. पुढे दुसऱ्या एका अमेरिकन प्रवाशाने ते पुस्तक हाँगकाँगमधील एका रद्दीवाल्याच्या दुकानात पडलेले पाहिले. त्याने ते विकत घेतले व अमेरिकेतील त्याच ग्रंथालयात स्वतः पोच केले !

मेजर वसू यांचा ग्रंथसंग्रह प्रयाग येथील हिंदी साहित्यसंमेलनाला दान करण्यात आला. त्या संग्रहात प्रयागमधील सार्वजनिक ग्रंथालयाचे एक पुस्तक आहे. हे पुस्तक कधी तरी कै. वसूंनी वाचनाकरिता केव्हा तरी घेतलेले परत करावयाचे राहून गेले असावे. आता हे पुस्तक संमेलनाच्या पुस्तकखान्यात पडलेले आहे.

वाचावयास मागून आणलेले पुस्तक परत न करण्याची कारणे पाहू जाता धूर्तता, मूर्खपणा, निष्काळजीपणा, बेपर्वाई, आळस इत्यादी दिसून येतात. संस्कृतच्या नीतिकारांनी अगदी स्पष्ट सांगून टाकले आहे की, दुचाकी, झरणी व पुस्तक एकदा दुसऱ्याच्या हातात गेले की, बहुधा कधीच परत येत नाहीत आणि जर का आले तर ते खराब होऊनच येते. डॉ. सहांचा अनुभव असाच आहे—

डॉ. महादेव सहा यांनी आपल्या मित्राकडून एक पुस्तक वाचावयास घेतले. त्यांना लगेचच कारागृहात जावे लागले. घरी आलेले त्यांचे मित्रच ते पुस्तक वाचू लागले. जेव्हा डॉ. सहा कारागृहातून परतले तेव्हा त्या पुस्तकाची दुर्दशा झाली होती. डॉ. सहा यांनी दुकानातून नवीन प्रत आणून ज्याचे पुस्तक होते त्याला परत केले !

लो. टिळक एकदा मुंबईहून पुण्याकडे येत होते. त्यांनी ताजे वृत्तपत्र वाचण्यासाठी विकत घेतले. त्यांनी हेड लाइनही वाचली नसेल तोच एक सज्जन म्हणाले, 'मधले पान द्याल का ?' टिळकांनी खिशातील एक आणेली काढून त्यांच्या हातावर ठेवीत म्हणाले— 'आपण दुसरा अंक घ्या. मला शांतपणाने वाचू द्या !'

एक तर पुस्तकांचा संग्रहच करू नये. केला तर तो लोकाना न दिसेल अशा जागी असावा. डॉ. सहा यांच्यासारखे वाचक प्रामाणिक आहेत असे समजून पुस्तक देण्यास हरकत नाही किंवा दिलेले पुस्तक परत मिळणार नाही अशी खूणगाठ बांधूनच द्यावे. सर वॉल्टर स्कॉटसारखे पत्र पाठवून उपयोग होणार नाही. अनातोले फ्रान्सप्रमाणे न देण्याच्या निर्धारामुळे वाईटपणा आला तरी पुस्तक देऊ नका. हे सर्व ध्यानी घ्यावे. नाही तर लो टिळकांसारखा वळण देणारा स्पष्ट व कडक 'नकार' देता आला पाहिजे !

—प्रा. गो. म. दिंडोरकर

# फ्रॉम रशिया विथ लव्ह

Through the mesh, the thick twilight
We cannot see the sun, and the land floats away

ह्या पृथ्वीवर रोज उगवणाऱ्या सूर्याचा प्रकाश पक्ष्यांसाठी आहे, प्राण्यांसाठी आहे, माणसांसाठी आहे. सूर्यप्रकाशावर कुणाचे स्वामित्व नाही. सूर्य तर आपली दौलत उधळत जातो आहे. जितकी लुटायची तितकी लुटा; पण काहींच्या नशिबात सूर्याच्या प्रकाशाचा एक किरणही नसतो. एक कवडसाही नसतो. सूर्य रोज उगवतो. सूर्य रोज मावळतो; पण त्यांच्या आयुष्यात अंधार असतो. फक्त अंधार! अख्खं आयुष्यच अस अंधारकोठडीत चाललेलं.

**ओसिप मँडलस्टाम** नावाच्या रशियन कवीच्या आयुष्यात असाच अंधार होता त्यानं उगवत्या सूर्याची, भन्नाट, सैरावैरा सूसाट धावणाऱ्या ताऱ्यांची, अवखळ वाहणाऱ्या झऱ्यांची फक्त स्वप्नं पाहिली. वास्तवात ह्या गोष्टी त्याच्यासाठी राहिल्या नव्हत्या


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**

त्याला तर कारावासात जखडून ठेवलं होतं.

रशियन कवितेत काही स्थित्यंतरं झालीत. सिंबॉलिझम्‌नंतर ॲक्मिस्ट चळवळ आली. ह्या चळवळीचे पुरस्कर्ते कवितेतील फक्त नादमाधुर्यावर न जाता आशयघन कविता करण्याकडे वळले होते. मॅंडेलस्टाम ॲक्मिस्ट चळवळीच्या पुरस्कर्त्यात आघाडीवर होता. ॲना आख्मातोव्हाही ॲक्मिस्ट होती.

पण कुठं तरी ह्या कवीला स्टॅलिनची री ओढता आली नाही. आवाजात आवाज मिळवता आला नाही. कविता पोलाद आणि कोळशाचे प्रोग्रेस रिपोर्ट द्यायला वापरता आली नाही. पंचवार्षिक योजनेसाठी राबवता आली नाही. कविता हा मूळातच एक व्यक्तिवादी अन्‌ संवेदनशील आविष्कार. त्यावर मर्यादा टाकता येणार नाही; बंधन घालता येणार नाही; पण बंधनं आलीत. सत्तेचा अंकुश आला. स्वतःच्या काळाचं वर्णन करताना कवी म्हणतो–

My age, my beast, who will be able
To look into the pupils of your eyes–
And with his own blood cement
The vertebrae of two centuries?
...This age of the infant earth
Is like a babie's tender cartilage,
And once again the cranium of life
Has been sacrificed like a lamb.

स्टॅलिनच्या काळात एका कवीनं एवढं धैर्य दाखवावं अन्‌ त्याच्या बंद्यांनी चूप राहावं अशी परिस्थिती नव्हती. त्याला कारावासात पाठवण्यात आलं (१९३२). तिथं त्यानं पाच वर्षं यातना भोगल्या. मोठी कुलुपं, जाड साखळदंड, दंडुकेधाऱ्यांच्या बुटांची खाडखाड ह्या परिचित गोष्टी. सूर्यप्रकाश कुठे ? कुणासाठी ? तो म्हणतो–

'Earth cost us as much as ten heavens'

स्वतःच्या मायभूमीवर स्वतंत्र म्हणून श्वास घ्यायलाही त्यांना स्वतःच्या आयुष्याची जिवंतपणी आहुती द्यावी लागली. स्वातंत्र्यात जिवंतपणी मरण भोगावं लागलं.

कारावासातून १९३७ मध्ये त्याची सुटका झाली. तो मास्कोला परतला अन्‌ एका कवितेनं पुनः त्याच्यावर सत्तेचा रोष झाला. स्टॅलिन मिशांतल्या मिशांत थरथरला. त्याच्या डोळ्यांत अंगार दाटून आला–

Each thick finger, a fattened worm, gesticulates
And his words strike you like they were many pound weights.
His full cockroach moustache hints a laughter benigning
And the shafts his boots; always spotlessly shining.
And the gaug of thick skinned leaders near hin obeys;
Semi humans are at his disposal always.
...He possesses the broad chest, a Georgion perfection
And each new death for him is a berry confection.

कवीची हिम्मत किती बघा ! त्यानं जिवंत हुकुमशहावरच व्यंगपूर्ण कविता लिहिली ! अन्‌ त्याला विशेषणंही किती समर्थ बहाल केलीत ! त्याची जाड बोटं फुगीर अळीगत, त्याचे शब्द पौंडापौंडाचं वजन, त्याच्या झुरळागत भरीव मिशा, अन्‌ त्याच्यासाठी कुणाचं मरण म्हणजे त्यानं जिभेवर घोळावी जशी पेपरमिंटची गोळी!

स्टॅलिनच्या अमदानीत प्रत्यक्ष त्याच्यावरच प्रहार करणारं लेखन हे पहिलं आणि शेवटचंच असावं ! शब्दांनी माणूस मारता येतो हे कवीनं सिद्ध केलं आहे.

स्टॅलिननं त्याची रवानगी यातनाशिबिरात केली. तिथं त्याची स्थिती खूपच खराब झाली. कदाचित तिथल्या यातनांमुळं असेल. तो जवळजवळ वेडयागत झाला. रशियाचा एक महान कवी, एका काव्यचळवळीचा पुरस्कर्ता, एका दूरच्या अज्ञात यातनाशिबिरात आपल्या आयुष्याचा भयंकर विचित्र काळ कंठित होता. इतर कैदी त्याला वेडयात काढायचे. काहीबाही बोलायचे. त्याची वाढली दाढी, जीर्ण फाटकी लक्तरं, तारतार झालेले, डोक्यावरचे केस, विहिरीगत खोल डोळे अन्‌ ओठांवर बेधडक नीडर हसू–वेडयाचं. इतकं जोरात, खळखळून शुद्धीवर, ताळ्यावर असताना त्याला त्याच्या देशात हसता आलं नव्हतं ना ? एक दिवस त्यानं त्याला दिलेली भाकर घ्यायचं नाकारलं. त्याला वाटायचं कुठं त्याला त्या हुकुमशहाचे बगलबच्चे भाकरीत विष टाकून तर देत नसतील ना ? आपल्याला मारतील, पाठलाग करतील ही भीती त्याला वाटायची. मग तो इतरांची भाकरी हिसकून खावू लागला. कैद्यांत भांडणं झाली. इतर कैद्यांनी त्याला बेदम मारलं. त्याचा दोष कुठं होता ? तो तर केव्हाचाच संपला होता. त्याला वेड लागलं होतं. पर्सिक्युशन मॅनिया झाला होता. आपण कोण आहोत हे तो केव्हाच विसरला होता.

आणि भयंकर कारुण्यपूर्ण, दयनीय अवस्थेत यातनाशिबिरातच १९३८ साली वयाच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी त्याला मृत्यू आला.

A creature, as long as it has enough
Life left, must carry its backbone;

आपली सगळयांची नियती ह्या 'क्रीचर' (प्राणी)चीच आहे ना ?

–झिरो–झिरो–सेव्हन


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. २२।११।७५ ते २८।११।७५

**मध्यवर्ती व महाराष्ट्र मंत्रिमंडळात बदल संभवतात**

भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी या कर्कराशीतील शनिप्रवेशापासून जास्त सामर्थ्यवान बनणार आहेत हे माझे भविष्य आता तंतोतंत खरे ठरले आहे. या आठवड्यात रवी अकरावा आहे. हा रवी जागतिक राजकारणात व भारताच्या अंतर्गत कारभारात काही महत्त्वाचे बदल घडवून आणणार आहे. महाराष्ट्र व मध्यवर्ती मंत्रिमंडळात बदल संभवतात. मेष, कुंभ, मकर, कर्क या राशींच्या सत्तास्थानांवरील व्यक्तींना मोठे व महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे. सिंहराशीला साडेसाती आहे. त्यामुळे अशा व्यक्तींचे स्थानांतर व काहीशी पदाची अवनती होऊ शकेल. जागतिक राजकारणात भारताचे स्थान एकदम उंचावणार आहे. चीन व पाकिस्तानला भारताबरोबरच्या संबंधात बदल करण्याची आवश्यकता वाटेल. आर्थिक बाबतीत बाजाराचे स्वरूप काही प्रमाणात मंदीचे राहील. भाव उतरूनदेखील माल उठणार नाही. कापडगिरण्यांच्या बाबतीत एखादी इशारेवजा सरकारी योजना जाहीर होईल. भ्रष्टाचारी लोकांवर अधिक कडक कारवाई होईल. सिनेव्यवसायिकांना मंदीचा तडाखा जाणवेल.

---

### मेष : परदेशप्रवास

या आठवड्यात रवी हा एकमेव ग्रह आपणास जास्त अनुकूल आहे. अष्टमात असला तरी तो तुम्हाला तेवढासा वाईट नाही. अनेक दिवस तुमच्या मनात असलेली परदेशी प्रवासाची इच्छा अचानक पुरी होईल किंवा त्यासंबंधी महत्त्वपूर्ण असा पत्रव्यवहार होईल. तुमच्या मनात निराशा थैमान घालते आहे व मनःस्थिती काहीशी अस्थिर आहे; पण त्यामुळे डळमळ होणार नाही. नोकरीत सर्वसामान्य जमवून घेण्याकडे धोरण ठेवा व वरिष्ठांवर टीका करणाऱ्यांची संगत टाळा. आर्थिक परिस्थिती बरीच सुधारेल. लॉटरीत धनलाभ संभवतो. तिकिट घ्या. रविवार, मंगळवार व गुरुवार महत्त्वाची कामे होतील. महत्त्वाच्या व्यक्ती भेटतील. महिलांना घराच्या अगर स्थावराच्या कामात भाग घ्यावा लागेल. माहेरच्या पत्राने अगर निरोपाने मन प्रसन्न राहील. विद्यार्थ्यांना केवळ चैनबाजी करता येणार नाही. काही तरी काम करावे लागेल. मंगळवार चांगला दिवस आहे.

### वृषभ : अपेक्षित घडेल

तुम्ही साडेसातीतून मुक्त झाला आहात याचे प्रत्यंतर तुम्हाला येत आहेच. सध्या रवीमुळे तुमची बाजू बरीच बळकट झाली आहे. संसारात थोडीफार खटकाखटकी झाली तरी आठवडा अनुकूल घडवून जाणार आहे. राजकारणात तुमची उपेक्षा आता संपली असून जे तुम्हाला घडावे असे वाटते तेच अचानक घडून येईल. तुमची प्रतिष्ठा वाढेल. आशाआकांक्षा उंचावतील. उच्चपदस्थ व्यक्तीचा कृपाशीर्वाद मिळेल. सोमवार व गुरुवार मुद्दाम लक्षात ठेवा. या दिवशी महत्त्वाच्या घटना घडणार आहेत. नोकरीच्या दृष्टीने काही प्रतिकूल घडणार नाही. तुमच्या मागण्यांबद्दल, पगार अगर प्रमोशनबद्दल वरिष्ठांबरोबर वाटाघाटी करायला आठवडा अनुकूल आहे. तुमची बेकारी या वेळी संपल्याची तुतारी तुम्हाला ऐकू येईल. पहाटेच्या वेळी एखादे सुंदर स्वप्न पडून मन आनंदी राहील. व्यापार अगर इतर स्वतंत्र धंदा प्रगतीच्या नव्या वाटा चोखाळील. महिलांना नोकरीचे प्रयत्न करायला अनुकूलता आहे. स्वतंत्र धंदा नको. विद्यार्थ्यांनी नाटकसिनेमाच्या क्षेत्रात गुण दाखवण्याचे प्रयत्न करू नयेत. तुम्हाला शुक्रवार चांगला असतो.

### मिथुन : नोकरीत सुधारणा

मंगळाचे सामर्थ्य अजून तुमच्या पाठीशी आहे. त्यामुळे अजून तरी कोणत्याच क्षेत्रात तुमची प्रगती रोखून धरली जाणार नाही. सहावा रवी स्पर्धकांना व विरोधकांना घायाळ करील. या आठवड्यात तुमच् आशाआकांक्षांना तेज चढेल. नवे काही त करण्याची स्फूर्ती मिळेल. धनिक व रा कारणातील उच्चपदस्थ व्यक्तीचे सहका लाभून अनेक महत्त्वाचे फायदे पदरा पडतील. नोकरीतील तुमची अनिश्चित किंवा अनेक अडचणी दूर होऊन तुमच् कार्यक्षमतेचा प्रभाव पडेल. रविवार ते बुधवार प्रमोशन-बढतीसंबंधीची बोलणी, वाटाघाटी करायला अनुकूलता आहे. जुने ये वसूल होईल. वकील, व्यापारी व लहा धंदेवाले प्रगतीकडे वाटचाल करतील. महिलांनी नोकरीत प्रयत्न करावेत. त्यांना चालू नोकरीत समाधान वाटावे असे का घडेल. विद्यार्थ्यांना वाङमयीन क्षेत्रात स्फूर्ती मिळेल. त्यांना पैशाची मदत होईल. शनिवार चांगला आहे.

### कर्क : अडचणीवर मात

चौथा राहू जरी मानसिक त्रास वाढवत असला तरी या आठवड्यात तुम्ही अनेक क्षेत्रात तुमचा पराक्रम गाजवणार आहात. आर्थिक अडचणी व राजकारणी लोकांचा होणारा त्रास यावर तुम्ही सहज मात करू शकाल. तुमच्यापैकी ज्यांना नोकरी अगर स्वतंत्र उद्योगाचे काही प्रयत्न करावयाचे असतील त्यांनी या आठवड्यात अवश्य करावेत. परदेशी जाण्याचे तुमचे स्वप्न या वेळी बरेच सफल होऊ शकेल. तुम्ही जर राजकारणात भाग घेणार असाल तर तुम्हाला सहज प्रवेश मिळेल. आर्थिक बाजू तशी कमकुवत राहणार नाही; पण पैसा मिळाला तरी तो खर्च करताना काळजी घ्यावी. स्थावराचे वाद या वेळी कोर्टात नेऊ नका. सोमवार ते बुधवार तब्बेत सांभाळा. नवे वाहन हळूहळू हाका. महिलांना घर अगर राहायला जागा मिळेल. माहेरची प्रॉपर्टी मिळू शकेल. विद्यार्थ्यांनी स्मरणशक्तीवर विसंबून राहू नये. अभ्यास करावा. सोमवार शुभकारक आहे.

### सिंह : महत्त्वपूर्ण घटना

तुम्हाला साडेसाती सुरू आहे याची जा ठेवा. कारण शनी केव्हा धडा शिकवील कळू शकणार नाही. या आठवड्यात रा कारणातील उच्चपदस्थ व्यक्तींना स्थित्

तराचा कुयोग आहे. 'खाली' यावे लागेल. विरोधक फायदा घेतील. उठाव करतील. नोकरीत असणाऱ्यांनी डोळ्यांत तेल घालून आपले काम करावे. ऑफिसमध्ये ठरलेल्या वेळी जावे. नाही तर उगाच एखादे लफडे पाठीशी लागण्याची शक्यता आहे. ज्याची सर्व्हिस पुरी होत आली आहे त्यांनी इष्ट देवतेची मनोभावे उपासना करावी. त्यामुळे त्यांना फायदा होईल.बेकारांना या वेळी थोडे-फार आश्वासन मिळण्यापलीकडे फारसे काही मिळणार नाही. व्यापारी लोकांना मंदीचा त्रास जाणवेल; पण नुकसान मात्र होणार नाही. महिलांनी स्वतंत्र उद्योग करावा. धार्मिक कार्यात त्यांचे मन रमेल. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आठवडा विशेष महत्त्वाचा नाही. त्यांना जवळपासचा प्रवास घडेल. रविवार शुभ आहे.

**कन्या : अनपेक्षित फायदा**

मंगळाचे तुम्हाला वरदान आहेच. तिसरा रवी एखादी प्रतिष्ठा वाढवणारी संधी आणणार आहे. तुम्ही राजकीय क्षेत्रातील व्यक्तीबरोबर संबंध जोडू शकाल. त्यामुळे तुमची कीर्ती व प्रतिष्ठा वाढेल. स्वतंत्र उद्योग सुरू करावयाचा असल्यास त्याला अनुकूल असे वातावरण आहे. श्रीमंतवर्गाचे साहाय्य मिळू शकेल. लेखक, पत्रकार, कलावंत यांना फायदा होईल असे काही तरी घडेल. लेखकांना बक्षीस अगर प्रवास घडू शकेल. नोकरीत तुमचे वजन वाढेल. वरिष्ठांच्या मनात आदर निर्माण होईल. सोमवार ते शुक्रवार अपेक्षित लाभाचे योग आहेत. महत्त्वाच्या घटना घडू शकतील. महिलांनी संशयाच्या आहारी जाऊ नये. त्यांना माहेरची माणसे भेटतील. शुक्रवारी त्यांनी उपास करावा. विद्यार्थ्यांना या वेळी शिकता शिकता कमावता येईल. निर्यात करून पैसे मिळवता येतील. शुक्रवार उत्तम.


# आपले गुप्त रोग

जर आपण आपले यौवन आणि शक्ती गमावून शक्तीहीन झाला असाल, स्वप्नदोष, लघवीतून साखर जाणे इत्यादी रोगाने पीडित असाल तर न संकोच करता आमचा मोफत सल्ला घेवून आपली गमावलेली शक्ती व तारुण्य परत मिळवा. थोड्याच दिवसांत आपणास आमच्या सल्ल्याबद्दल खात्री पटेल. त्वरा करा व लिहा. आपला सर्व इलाज गुप्त ठेवला जाईल.

**PREM TRADING CO. (S. N.)**
M. P. D. Katri Sarai, (Gaya)


**तूळ : अनपेक्षित स्थित्यंतर**

चंद्राबरोबर राहू व हर्शलचा सुखसंवाद चालू असतानाच रवी दुसरा झाला आहे. मंगळ तर तुम्हाला इतका उत्तम आहे की या वेळी राजकारण व उद्योग यात अनपेक्षित असे तुमचे स्थित्यंतर घडले तर आश्चर्य मानू नका. तुम्हाला काही आश्वासने मिळाली होती; पण राहु-केतूमुळे त्यात अडचणी येत होत्या. आता तुमचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या वेळी तुमची गाडी प्रगतीच्या दिशेने वेगाने झेपावू लागेल. नोकरीची परिस्थिती फारच उत्तम राहील. बढती-प्रमोशनची केस मार्गी लागेल. सार्वजनिक कामात मानाचा योग आहे. बेकारांनी प्रयत्न केल्यास त्यांना अनपेक्षित उद्योग वा मदत मिळेल. रविवार ते मंगळवार महत्त्वाचे आहेत. महिलांनी धार्मिक कार्यात स्वतःला पुढाकार घ्यावा. त्यांना मोठा मान मिळणार आहे. विद्यार्थ्यांना नोकरी करावयाची असेल तर त्यांची इच्छा पुरी होईल. मंगळवार उत्तम आहे.

**वृश्चिक : महत्त्वाकांक्षा उंचावतील**

राशिस्वामी मंगळ आठवा असला तरी तुमचे काही प्रतिकूल करणार नाही. तात्पुरता थोडाफार शारीरिक त्रास संभवतो; पण इतर बाबतीत तुमच्या प्रगतीची सूत्रे एकट्या रवीच्या हाती आहेत. तो तुमच्या महत्त्वाकांक्षा उंचावणार असून त्या पुऱ्या करण्याच्या दृष्टीने मदत करणार आहे. तुमचा पिंड राजकारणी नाही तरी पण तुम्ही त्यात अचानक ओढले जाल व एखादे महत्त्वाचे पद तुमच्या पदरी पडेल. नोकरी प्रामाणिकपणे करत असाल तर तुम्ही 'ऑफिसर' होणार आहात. चार माणसे हाताखाली वागवायची संधी तुम्हाला मिळणार आहे. सरकारी किंवा इंजिनिअरिंगसारख्या उद्योगातील नोकरीत हा अनुभव येईल. जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात नफा व भरपूर फायदा होऊ शकेल. आर्थिक बाजू मात्र सुधारणे सध्या तरी अशक्य दिसते. बेकारांच्या अपेक्षा पूर्ण होतील. महिलांनी लहान प्रमाणात व्यापार करावा. चालू नोकरीत अधिकाराची जागा त्यांना मिळू शकेल. विद्यार्थ्यांना शेती अगर व्यापार यात लक्ष घालून तो आत्मसात करण्याची संधी मिळेल. मंगळवार शुभकारक आहे.

**धनु : त्रास असला तरी प्रगती**

राहूने बारावे स्थान सोडल्यापासूनच तुमचा खरे तर त्रास कमी झाला आहे. मनाची साशंकता आणि हृदयाची धाकधूक कमी झाली असून तुम्ही जास्त धीट बनला आहात. असे असले तरी सातव्या मंगळाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेषतः कौटुंबिक जीवनात काही ना काही कटकटी चालू राहणार आहेत. कुठे मुलांना आजार तर कुठे तुम्हाला आजार; पण दवाखाना चालू राहण्यापलीकडे फारसे काही प्रतिकूल घडणार नाही. आर्थिक परिस्थिती आता नक्कीच सुधारणार आहे. मेहरबान, आपण लॉटरीचे तिकीट घेता की नाही ? घेत नसल्यास मुद्दाम घ्या. बारावा रवी राजकारणी लोकात तुमचे वजन वाढवणार आहे. त्यासाठी तुम्ही हौसेने पैसेदेखील खर्च करणार आहात. नोकरीच्या दृष्टीने वरिष्ठांबरोबर झकापकी झाली तरी तुमच्यावर ते खूष राहतील. दुय्यम उद्योगाला दिवस चांगले आहेत. शनिवार, मंगळवार व शुक्रवार उद्योगाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. महिलांना चालू नोकरीत लाभ होईल. पगारवाढ, भत्ता असे काही तरी असेल. विद्यार्थ्यांनी वागण्यावर बंधने ठेवावी. शुक्रवारी कोणतेही काम करा. यश मिळेल.

**मकर : संयमाने वागा**

अंतरिक्षातील ज्या राशी आजच्या घडीस फार बलवान झाल्या आहेत, त्यात मकर ही रास आहे. मंगळ, शनी, रवी असे सारेच महत्त्वाचे ग्रह अनुकूल आहेत. या वेळी तुम्ही जे म्हणाल तेच होईल. म्हणूनच या वेळी

तुम्हाला खरी गरज आहे ती संयमाने वागण्याची. तुम्ही जर राजकारणात वरच्या जागेवर असाल तर हाताखालच्या लोकांबरोबर आपुलकीने वागा. सत्तेवर असाल तर संयमाने व प्रेमाने वागण्यामुळे तुमचा फायदा होणार आहे. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा तुम्हाला भाग्याचा ठरणार आहे. तुमच्यापैकी कुणी जर सेवानिवृत्तीच्या काठावर असेल तर त्याला मुदतवाढ मिळणार आहे. कार्यक्षमता वाढून तुमचा प्रभाव पडणार आहे. आर्थिक परिस्थिती सुधारण्याची प्रक्रिया सुरू होईल. चार पैसे मनासारखे खर्च करू शकाल. बेकारांच्या मागचा वनवास आता संपला आहे. मंगळवार ते शुक्रवार उद्योगाच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटना घडतील. महिलांना स्वतःच्या उद्योगात मनाप्रमाणे योजना आखता येतील. नोकरी नसल्यास ती मिळेल. विद्यार्थ्यांना प्रभाव पाडण्याएवढे सामर्थ्य प्राप्त होणार आहे; पण त्यांनी शांततेने वागावे. सोमवार व शुक्रवार बरा आहे.

**कुंभ : राजकारणात सरशी**

राजकारणात विशेष काही तरी गाजवणे हे तुमच्या राशीचे मुख्य वैशिष्टय आहे. वृश्चिकेचा दशमातील रवि व मिथुनेतील पांचवा मंगळ या वेळी तुमच्या साऱ्या महत्त्वाकांक्षा सफल करणार आहे. सत्ता व राजकारण यांत तुमचे प्रयत्न कमालीचे यशस्वी होतील. विरोधक कितीही कारवाया करोत त्यांना धडा शिकवण्यात तुम्हाला मोठे यश मिळणार आहे. तुमच्या यशाने या वेळी अनेकांना आश्चर्याचा धक्काच बसेल. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने विचार करायचा तर नोकरीत फार मोठे स्थित्यंतर घडणार आहे. महत्त्वाकांक्षा पुरी होईल. तुम्ही मोठे अधिकारी बनणार आहांत. बदली व बढती असे दोन्ही या वेळी घडू शकेल. इंजिनियरिंग उद्योगातील लोकांना शुभवार्ता कळेल. चालू नोकरीत पगारवाढ व सवलती मिळतील. व्यापारी लोकांना भांडवल वसूल झाल्याचे समाधान मिळेल. पदवीधर तरुणांनी या वेळी नोकरीचा प्रयत्न करावा. महिलांना परदेशप्रवासाचा योग आहे. नोकरीत अधिकाराच्या जागेवर बदली होईल. विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होईल. त्यांना शिक्षणासाठी चार पैसे कष्ट करून मिळवता येतील. शनिवार शुभकारक.

**मीन : नोकरीच्या दृष्टीने अनुकूल**

राशितील गुरूच्या हाती तुमच्या प्रगतीची सारी सूत्रे असून शनीबरोबर त्याचा नवपंचम योग झाला आहे. त्यामुळे तुम्ही काळजी करण्याचे कारण नाही. तुम्हाला जर नोकरीबद्दल साशंकता वाटत असेल तर ती साशंकता तुम्ही या आठवड्यापासून मनातून दूर करा. तुमची नोकरी कायम होईल. गंडांतर येण्याची तुम्हाला जर भीति वाटत असेल तर तसे काही घडणार नाही. बेकारांना यापुढे जास्त काळ वाट पहायला लागणार नाही. त्यांच्या प्रयत्नांना, या वेळेपासून अनुकूल साथ मिळू लागेल. तुम्ही पत्रकार, लेखक, कवी, प्रकाशक असाल तर हे दिवस अनुकूल आहे. सरकारी मदत, बक्षीस असे काही तरी मिळू शकेल. तुमची प्रतिष्ठा वाढेल. व्यापारी, स्टेशनरी दुकानदार, राजकारणी इत्यादींना शुभकारक आहे. सोमवार ते गुरुवार कोणत्याही कामात यश मिळेल. नवा उद्योग अगर योजना आखू शकाल. प्रवासाचा योग आहे. उच्च पदावर लोकांना विदेशी जाण्याचा योग आहे. लॉटरीत बक्षीसही मिळू शकेल. महिलांनी नोकरीत विशेष गुण दाखवावे. त्यांना अधिकाराची जागा मिळेल. विवाहेच्छू तरुणींचा विवाह ठरेल. विद्यार्थ्यांना शैक्षणिक संशोधनात महत्त्वाचे स्थान मिळेल. गुरुवार शुभकारक.

□ □

## महाराष्ट्र शासन आणि आदिवासी विकास उपयोजना

पृष्ठ ३ वरून

स्वरूप नुसते अनुदान स्वीकारणाऱ्या संस्थांसारखे नसणे अगत्याचे आहे. आश्रमशाळा, पाड्यापाड्यावरील सायंशाळा चालविण्यात ह्या संस्था फार मोलाची कामगिरी करू शकतील. प्राथमिक, माध्यमिक पातळीवरील शिक्षण देण्याची जबाबदारी अशा संस्थांकडे सोपवावी.

तसेच आदिवासींच्या विकासाची एक प्रभावी गरज म्हणून वयोगट १४ ते २० वर्षांतील मुलामुलींना शिक्षण देण्यासाठी अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविणे. अशा संस्था काढण्याची व चालविण्याची जबाबदारी अशा या संस्थाकडे सोपविणे आवश्यक आहे. प्रचलित शिक्षणव्यवस्थेत या मुलांच्या शिक्षणाची सोय नाही. याशिवाय प्रौढ शिक्षणाची जबाबदारी अशा संस्थांनी स्वीकारणे योग्य ठरेल. आदिवासी नेतृत्व तयार करणाऱ्या शैक्षणिक संस्थांची जबाबदारीही मुख्यतः या सामाजिक संस्थांनीच घ्यावी. तसेच आदिवासी बोलीतून पाठ्यपुस्तके व अन्य प्रौढवाचन-साहित्य तयार करणे, त्यांच्या बोलीतून सुरुवात करून ग्रांथिक मराठीकडे त्यांना कसे व कोणत्या पातळीवर नेता येईल यासारख्या प्रश्नांवर संशोधन करणे, अशा संशोधनसंस्था काढणे, चालविणे ही जबाबदारी अशा बिगरसरकारी संस्थांनी स्वीकारावी. त्यांना प्रोत्साहन दिले जावे.

तसेच अशा संस्थांवर वा संस्थेच्या सहकार्याने गाव, तालुका व जिल्हापातळीवर नियोजनाच्या प्रायॉरिटीज ठरविणे, त्यांचा तपशील ठरविणे आदी बाबतीत अशा संस्थांचे सतत सहकार्य घेत राहणे अगत्याचे आहे. नियोजनामधील जनतेचा सहभाग वाढीस लावण्यासाठी हे अगत्याचे आहे.

बिगरसरकारी संस्थांना अंमलबजावणीच्या कामात सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने ही मते मांडली आहेत. नुसते सल्लामसलतीच कार्य त्यांच्यावर सोपविणे पुरेसे नाही. आशा आहे की या मतांचा विचार होईल.

□



कपडे म्हणजे
शरीराची शान
ही शान
दिवसभर...
दिवसें दिवस
कायम रहावी
शान
शरीराची?
व्यर्थ बडबड
फुकाची!
कपड्यांच्या टिकाऊ
डौलदारपणासाठी
'टेबिलाइज्ड' छाप बघून घ्या
टेबिलाइज्ड कापड म्हणजे प्रमाणित सुरकुतीरहित कापड. म्हणूनच ते चुरगळलेले दिसत नाही किंवा त्याला चुण्याही पडत नाहीत. अर्थात् त्याचा डौलदारपणा सर्वत्र, सर्वदा कायम रहातो. जगप्रसिद्ध 'टेबिलाइज्ड'चा विश्वसनीय छाप आपण आपल्या पसंतीच्या सर्व कापडांवर बघाल.
अरविंद, बॉम्बे डाइंग, डी.सी.एम; मफतलाल, श्री अंबिका, टाटा आणि ठाकरसी सारख्या प्रख्यात भारतीय मिल्समध्ये बनवलेले कापड 'टेबिलाइज्ड' छापाचे असते. प्रत्येक मिटरवर 'TEBILIZED' हा छाप पाहूनच कापड खरेदी करा.
TESTED CREASE RESISTANCE
TEBILIZED®
MINIMUM IRONING • DURABLE GOOD LOOKS
TEBILIZED® कापड
दीर्घ काळपर्यंत डौलदार दिसणारे.
प्रमाणित सुरकुती-रहित कापड.
ट्रेडमार्कचे मालक :
मेट्टूर बियर्डसेल लि., पो. ओ. बॉक्स नं. ७, मद्रास ६०० ००१
Sista's-MBT-336-R/75-G-Mar